Regd-N. No150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

[ वर्ष ५१ ] आकोला--सोमवार तारीख ३ माहे डिसेंबर सन १९१७ ई० [ अंक ४८


## लक्षांत ठेवा.

की येथें आमचेकडे कमिशनचे (अडतीचे) काम चालत असून आम्ही येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान, दळण्याच्या गिरण्या जीन व प्रेसचें सामान वगैरे वगैरे सर्व प्रकारचा माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठवितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारें सर्व सामान मोटारचे व बांडे गाडीचे गाद्यांचे कापड, व दुसरें लागणारे सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरें विजेचे समान, स्वांपस् वगैरे तेल पुरवितो. एकवेळ आरडर देऊन कामाचे चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स

पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट मुंबई नंबर २

नो. नं. ३९८

४० रोगावर एकच जालीम औषध

### सुधासंजीवनी



यानें अजीर्ण, खोकला, दमा, संधीवात, प्रमेह, प्रदर, धुपणी, संग्रहणी, अतीसार वगैरेवर तात्काल गुण येतो. याची एक बाटली जवळ ठेवणारास वैद्याची गरज राहणार नाहीं. एकदाच खातरी करा किंमत रु. १ टपाल खर्च निराळा. नमुना ।- अनुपान पत्रकसोबत. गांवोगांव एजंट पाहिजेत. भरपूर कमीशन. आमच पत्र लिहा.

संजीवनी ऑफिस

खामगांव (वऱ्हाड)

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशाच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हा रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें मगवड, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगानें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विका

## जाहिरात

मुंबई न्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर यांच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

ता १ जुलै पासून पुढें आणखी प्रसिद्ध होईपर्यंत व्याज दरसाल दर शेकडां ४ रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची श्री कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं निरनिराळ्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मेकतील.

मुंबई ब्यांक आकोला ११९१०१७ नो नं १ | Lyon Scott एजंट

## अनुभवानें खात्री



परेल !! जर आपणास आपले हारमोनीयम अगदीं वाईट स्थितीतील नव्या प्रमाणें माफक दरांत दुरुस्त करून घेणें असल तर आमच खालीं लिहिलेल्या पत्यावर व्यवहार करा. अनुभवानें खात्री पटेल. शिवाय नव्या पेट्या आमचे जंगी कारखान्यांत ऑरडर प्रमाणें अडव्हान्स आल्यास तयार मिळतात. त्याचे दर–हात पेटी सिंगल रीड २० ते २५

" डबल रीड ३० ३५-४०-६०

तीनलाईनी क्वाझरेल सुराची किं. रु. ९५.

पाय पेटी सतक ३। ६० ते ८० रु.

" " " ३॥ ८५ ते ९५ रु.

" " " ३॥ १०४-११५ रु)

" " " ३॥ तीन लाईनी क्वाझरेल सुराची १८० ते २१० रु.

पत्ता—रामचंद्र बोसनला हार्मोनियम मेकर व रिपेअरर नांदुरा जि० ( बुलढाणा)

नो. नं २८४

तावडतोब दूर होतात किं रु. १८.

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०३

बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुनखी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला सं. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

Dr. H L. Batliwala Sons & Co. Ltd.

N. N. 6 Dadar Bombay

### कागदी बादाम

सर्वोतम ४१० गिरी जर्दालू ४५, जर्दालु ४४ कागदी अक्रोड ४३, गरी अक्रोट ४४, अंगुरी हिंग रु. २। आणि शाहजिरें १। रत्तल, सुरेख कस्तुरी रु. ३५, सुर्मा मर्मारा,२ पवित्र केशर १॥ आणि शुद्ध शिलाजित ४५ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५

नो. नं. ४७७

## ५०० फोटो १ रु. त!

निरनिराळ्या साधु– संतांचे, नांव गांवासह व पाहतांच ओळख पटण्या इतके हुबेहुब ३०० फोटोंचे; सुंदर दहा चित्रपट! किं० रुपये २॥; १।; व ४१० आणि लोकोत्तर चमत्कार, जगांतील आश्चर्यें, चौऱ्यांशीं आसनें, सुंदर-सुंदर स्त्रिया आणि मनोविकार व प्रेम इ. २०० फोटोंचे सहा चित्रपट! किं० रु० १॥; ४१२ व ४६ ( सोळा चित्रपटांवर ५ हजार वर्षांचें क्यालेंडर बक्षिस! )

श्री० वा० नगरकर, नाशिक.

नो० नं० ४७८

## जाहीरखबर

मौजे वाकी ता० अकोला येथें माझा चार जीनचा कारखाना आहे. तो मला विकावयाचा आहे. ज्यास घ्यावयाचा असेल त्यानें खाली लिहिलेल्या पत्त्यावर भेटावें. कळावें ता० २२।११।१७ सही

वासुदेव देवराव

C० श्रीगणेश कंपनी

राममंदिराजवळ अकोला

नो. नं. ४८९

## जाहीरखबर

आमचा कसबे आकोले येथील रजपुत पुऱ्याचे दक्षिणेकडील मळा विकावयाचा आहे. या मळ्यांत एक मोठी चार मोटी चालण्यासारखी विहीर असून एक मोठा बंगला आहे. शिवाय नौकर लोकवगैरे राहण्याकरितां घरेंही आहेत. बगीच्याही आहे. ज्यास विकत घेण्याची इच्छा असेल त्यांनीं खालील पत्त्यावर भेटावें म्हणजे बोलणें चालणें करूं. ता. सही

देवराव विनायक

C/o श्रीगणेश कंपनी

राममंदिराजवळ अकोला

नो. नं. ४८०

## सत्योदय.

( सत्यशोधक मताचें मासिक पुस्तक. )

जेणें करून विवंचित मागासलेल्या जातींची उन्नति होईल अशा प्रकारचे निरनिराळे विषय व सणसणीत लेख साध्या व सोप्या भाषेंत दर महिन्यास नियमितपणें प्रसिद्ध होत असतात. गरीब गुरिबांस ही घेतां यावें म्हणून बारा महिन्यांची वर्गणी व्ही० पी० सुद्धां फक्त ४१२ आणे.

संपादक

कृ० क० चौधरी

करजगांव ( उमरावती )

नो० नं० ४८१

## वऱ्हाडांतील.

( प्रसिद्ध देवतांचे व संतांचे फोटो )

श्री बाला साहेब देऊळगांव राजा व वाशिम

श्री दत्तात्रय गाणगापूर

श्री अंबाबाई उमरावती

श्री द्वारकानाथ द्वारका व बेट

श्री रंगनाथ महाराज ( जालना )

श्री हरीहर महाराज शेवली

श्री गजानन महाराज शेगांव

श्री वासुदेवानंद उर्फ टेंबे स्वामी

श्री शिवणेकर आबा साहेब

श्री गुलाबराव महाराज उमरावती

श्री नारायण महाराज केडगांवकर

श्री देवोबा बोवा

श्री उदासी महाराज चिखली

श्री घोत्रेकर महाराज

श्री भगवान —उंब्रज (सातारा)

ह्या शिवाय लो. टिळक व इतर देशभक्तांचे फोटो— वरील सर्व फोटो क्याबिनेट साइजचे असून किंमत प्रत्येकी १० आणे पडेल. पो० ख० निराळा फोटो एन लार्जमेन्टस् १२-१० फक्त सात रुपये.

नी० डब्ल्यु० शिंदोरे

फोटो आर्टीस्ट अकोला वऱ्हाड

नो० नं० ४८२

## नोटीस.

रा. रा. गणपत वा। चाहादू दांदडे रा० कीनखेड ता० आकोट

यांसः—

खालीं सही करणार संपत वा। गणपत चव्हाण रा० कीनखेड ता० आकोट यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मजला ता० २९।१०।१७ रोजीं पोस्टमार्फत नोटीस दिली ती पावली त्यांत तुह्मी जो शेतासंबंधीं मजकूर लिहिला आहे तो सर्व खोटा आहे. तुह्मी मजला ता० ९।६।१७ रोजीं शेताचें खरीदीखत रुपये १२०० चे स्वसंतोषानें करून देऊन नोंदून दिलें आहे व त्या प्रमाणें मी तुह्मास भरणाही दिला आहे, शेताचा कबजा २ वर्षांचा संपत वा। गणु याचा पटयाचा हक्क संपल्यावर घ्यावा असें ठरलें आहे, भरणा रुपये ४०० चारशेचा हवाला गाहणाचा घेतला होता त्यांत हिशेबानें ३४३ तीनसे त्रेचाळीस दिले बाकी रुपये ५७ सत्तावन तुमचे शिल्लक आहे ते मी देण्यास कबूल आहे. असे असून गावांतील फंदफितुरी लोकांच्या संमतिनें विनाकारण खोट्या नोटीसा तुह्मी मजला पाठवितां हें बरोबर नाहीं तरी या प्रमाणें पुन्हां नोटीस करूं नये व पुढें तुह्मी दावा वगैरे केल्यास तुमचे कोर्ट खर्चाबद्दल मी कोणतेही प्रकारें जबाबदार नाहीं. कळवे ता० १७-११-१७ इ

दस्तुर त्रिंबक बळवंत पी. रा. आकोला

संपत गणपत चव्हाण द० खु०

नो० नं० ४६८

---

## जाहिरात

सर्वत्र लोक रा. कारंजा ता. मुर्तिजापूर व इतर ठिकाणचे लोक यांना या जाहिरातीवरून कळविण्यांत येत आहे कीं, हल्लीं माझा सख्खा भाऊ नामे माहादु हा वारला आहे. त्याची व माझी कारंजा येथील स्थावर जंगम इस्टेट एकाच ठिकाणीं आहे. व त्याचे मरणानंतर स्थावर जिनगीचा मी पूर्ण मालक आहे. करितां सवत्रास जाहीर करण्यांत येत आहे कीं, माझी भावजय नामे तुळशी मर्द महादु इजपासून कोणी गहाण किंवा फरोक्त किंवा बक्षीस वगैरे घेऊं नये. घेतल्यास जाहीरातीनें रद्द समजावे. तारीख २८ माहे नवंबर सन १९१७ इ०

सही

नि॥ अंबू वा। आपाजी याचा आंगठा

नो० नं० ४६९

---

## नोटीस.

ति. रा रा. बापु वा। केशव पाटील तुकाराम वा। बापु पाटील रा. बोंडगांव पो. शेगांव ता. खामगांव जि. बुलढाणा

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यात येते कीं, आपण ता. १२।५।१९१७ इ. रोजीं रा. रा. नागो पाटील राहणार इसापूरकर व रामु झाली रा. बोंडगांव या दोघांच्या समक्ष तुह्मी आमचे हिस्सेवाटे बरोबर करून दिले. त्याप्रमाणें मी माझी हिश्याची जमीन वहीत करून पेरणे वगैरे मी केलें. व आतां माल वगैरे आणण्यास जातो तर आपण मला जाऊं देत नाहीं. तरी मी माझे उत्पन्नाचे किंमतीबद्दल ५०० पांचशे रुपयाचे नुकसान भरून घेईन. हे आपणास आगाऊ कळविले आहे. तरी पंधरा दिवसाचे आंत माझा काहीं तरी निकाल करावा. न केल्यास दिवाणींत दावा करून तह्मा दोघा कडून रकम वसूल केली जाईल. कळावे ता २६।११।१७

सही

किसन वा। बापु पा. द. खुद रा. बोंडगांव

पो. शेगाव

नो० नं० ४७०

---

## नोटीस

रा. रा. रामु वा। बापुन्या भोई रा. राहित प्रगणे पिंजर ता. आकोला

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून तुह्मास पिसें लागण्यास सुमारें तीन वर्षे झालीं आहेत. तरी मी तुमचे नांवानीं कोठपर्यंत बसावें हें मला कळत नाहीं, तुमचे पिसें केव्हां जाईल हे मला सध्या काहीं सांगतां येत नाहीं, करितां तुह्मास या नोटिशीनें कळविण्यात येते कीं ही नोटिस पावल्यापासून तुह्मी पंधरा दिवसाचे आंत शुद्धीवर आल्यास मी तुमची बायको नाहींतर आणखी महिनाभर वाट पाहून दुसऱ्याशी गंधर्व करीन. मग तुमची मी कोणतेही तऱ्हेची तक्रार ऐकणार नाहीं. व तुह्मी पिसा झाला त्यामध्यें मला शंका आहे तुह्मी मला पोशित नाहीं. ह्मणून मी दोन वर्षापासून माझे आईबापाचे येथें आहे. कळावें ही विनंती ता. २६-११-१७

सही

धिंधी मर्द रामु भोई नि. आंगठा

खुद रा. पो. पातुरनंदापूर ता.

आकोला

नो० नं० ४७१

---

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं खालीं सही करणार यांचे दुकानीं कोर्टाचे वगैरे कामावर किसनसा गोविंदसा रामचंद्र रगनाथ तुकाराम नंनु निंबाजी तेतारम व पुंजजी माधो वरोड रा० मलकापूर या ९ इसमास तारिख १४।७।१९ रोजीं कुलमुखत्यार नेमून मुखत्यार पत्र रजिष्टर करून दिले होते परंत त्या ९ इसमापैकीं पुंजजी माधो वरोड यास तारीख २३।१०।१७ रोजीं कांहीं कारणामुळें कामावरून दूर केलें असून फक्त त्याचे एकट्याचे नांव मुखत्यार पत्रांतून कमी केलें आह त्याचा आतां आमचे दुकानशी काहीं एक संबंध राहिला नाहीं. तरी त्याशीं आमचे दुकानचे नावानें कोणी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करूं नये केल्यास त्याबद्दल आह्मी जबाबदार नाहीं कळवें तारीख २०-११-१७ इ.

सही

गोविंदसा विष्णुसा सावजी द० खु०

नो० नं० ४७२

---

## नोटीस.

नोटीस बेशर्मी तुळशी मर्द माहादू जात लिंगाइत म्हाली रा. कारंजा तालुका मुर्तिजापूर जि० आकोला.

इ:—

खालीं सही करणार याजकडून नोटिशीनें कळविण्यांत येत आहे कीं हल्लीं माझा भाऊ नामे माहादू वारला आहे त्याची व माझी स्थावर जंगम इस्टेट एकाच ठिकाणी आहे. हल्लीं तो मयत झाल्यावरून सर्व इस्टेटीचा मालक मी झालो आहे. तुजला अन्नवस्त्राची पूर्ण मलकी आहे त्याचे स्थावर जंगम इस्टेटीवर तुझा हक्क कोणतेंं प्रकारचा नाहीं. कारंजा येथील स्थावर जंगम इष्टेट कोणास गहाण किंवा फरोक्त किंवा बक्षीस देऊं नये असें तूं समजावें. कोणास तुह्मी लिहून दिल्यास या नोटिशीनें रद्द आहे. करीतां या नोटिशीनें जाहीर केलें आहे. कळावें ता. २८ माहे नोव्हेंबर सन १९१७ इ.

सही

नि॥ अंबू वा। आपाजी याची आंगठा खुद

नो. नं. ४७३

---

## विनंती.

रा. र. रामराव कृष्णाजी देशमुख पाटील व देवराव लक्ष्मण पटवारी रा. राहित प्रगणें पिंजर ता. आकोला

यांसः —

खालीं सही करणार इजकडून विनंती करण्यांत येते कीं, माझा नवरा रामु वा। बापुन्या भोई हा सुमारें तीन वर्षापसून पिसा झाला आहे. हे तुह्मास माहीतच असेल. हा केव्हा शुद्धीवर येईल हें सध्या मला सांगतां येत नाहीं. आपणांस विनंती हीच कीं, हा खरा पिसा आहे किंवा कांहीं ढोंग आहे. हें आपण कृपा करून कळविण्याची मेहेरबानी करावी. कळावें ता० २६।११।१७ इ.

सही

धिंधा मर्द रामु भोई नि० आंगठा खुद्द

नो. नं. ४७४

---

## नोटीस

नोटीस बेशर्मी मारोती वा। कोंडजी आंध गुहाडे रा० मौजे वई प्रगणे अनसिंग ता० वाशीम जिल्हा आकोला

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून लग्न झाल्यास आज सुमारें १०-१२ वर्षेपर्यंत तुह्मी मला चांगलें वागविलें. व हल्लीं ३ वर्षापूर्वी माझे भावानें मला तीलसंक्रांतीचे सणाकरितां माहेरी आणलें तेव्हांपासून तुह्मी मला नेण्यास आले नाहीं याबद्दल मी व माझे भावानें तुह्मास पुष्कळ वेळा सांगून पाठविलें कीं तुह्मी मला घेऊन जा मी नांदण्यास तयार आहे. परंतु तुह्मी साफ सांगितलें कीं मी तुला नांदवीत नाहीं त्यास आज सुमारें तीन वर्षें झालीं आहे. मी तुमचे नांवानें राहिले व तुह्मी सभ्य व इज्जतवान यास्तव मी माझे भावाचे सेजारी राहून तुमचे नावावर सावकाराचे दरसाल १०० शंभर रुपये प्रमाणें तीन वर्षांत सुमारें ३०० रुपये कर्ज काढून खाल्ले व आतां मला कोणी सावकार कर्ज देत नाहीं व तुह्मी ही मला घेऊन जात नाहीं व तुह्मी गेल्या सालीं लग्नाची बायको दुसरी करून खुशाल संसार करितां आहां तेव्हां आतां आनायाचेंच तुह्मास मला नेण्याची अगर नांदविण्याची आशा नाहीं असें समजतें. तरी या नोटीसीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं नोटीस पावल्यापसून पंधरा दिवसाचे आंत वरील सावकार यांचे सर्व व्याजासुद्धा कर्ज देऊन मला घेऊन जावे मी नांदण्यास तयार आहे. असे न केल्यास मी दुसरा घरठाव हीच फारकत समजून करीन व वरील कर्जाबद्दल व या नोटिसीचे खर्चाबद्दल व यापुढें जो खर्च येईल त्याजबद्दल तुमचेवर दिवाणींत दावा करून खर्चासुद्धां रक्कम घेतली जाईल व मग माझेवर तुमचा नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. सबब या नोटिशीनें अगाऊ कळविलें आहे नोटीस दिली सही ता० १७-११-१९१७ इ० द० जिनासा चंदनसा लाड राहणार अडगांव ता० पुसद पो० खंडाळा

सही

१ सही नि० पुंजी मर्द मारोती गुहाडे आंध रा. वाडी महारी ता. कळमनुरी जि परभनी इ. मोगलाई हल्लीं मु. आडगांव ता. पुसद इचा आंगठा असे द. लि.

नो० नं० ४७५

---

## नोटीस

सक्सेशन मु० नं० १२ सन १९१७

विद्यमान सबजज्ज साहेब कोर्ट खामगांव

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं खामगांव ता० खामगाव जि० बुलडाणा येथें मोरेश्वर रामचंद्र कोठारे हे तारीख २०-७-१७ इसवी रोजी मैत झालेल्यास वारस.

१ शामराव मोरेश्वर रा. खामगांव
२ सुंदरराव मोरेश्वर ”
३ गजराबाई मर्द मोरेश्वर ”
४ गजानन रामचंद्र ”
५ विनायक रामचंद्र रा० मुंबई
६ आनंदराव लक्ष्मण ”
७ रामराव लक्ष्मण ”
८ मंजुळा मोरेश्वर अ. पा गजराबाई रा. खामगांव
९ सुशीला मोरेश्वर ”
१० उषा मोरेश्वर ”
११ ताराबाई मोरेश्वर ”

येणें प्रमाणें वारस असून यापैकीं शामराव मोरेश्वर व सुंदरराव मोरेश्वर यानीं मैताचे कर्ज वसूल करण्याकारितां अर्ज दिला असून त्याचे चौकशीची तारीख १२-१-१८ इ. ची नेमली आहे करितां वरील अर्जदार यास सार्टिफिकेट देण्याबद्दल कोणाची हरकत असल्यास त्यानें वरील तारखेस हजर राहावे कळावें तारीख २८-११-१७ इ.

सही

R. M. Wathodker
Sub Judge
Khamgaon

N. N. 476

वऱ्हाडसमाचार

कार्तिक वद्य ५ पिंगल संवत्सर १८३९

## ख्रिस्ती मिशनरी आणि हिंदी राजकारण.

ख्रिस्ती मिशनरींच्या मध्यवर्ती नॅशनल कौंसिल नांवाच्या संस्थेनें हिंदुस्थानच्या सध्याच्या राजकीय स्थितींत हिंदुस्थानांतल्या मिशनरींनीं पडावें कीं नाहीं व पडणें झाल्यास किती मर्यादेपर्यंत भाग घ्यावा या संबंधानें एक अनावृत्त पत्र काढून तें सर्व मिशनरींकडे पाठविलें आहे. या पत्राच्या आरंभींच एक विधान केलेलें आहे त्याची यथार्थता आह्मास शंकनीय वाटते. 'सध्याची हिंदुस्थानची राजकीय स्थिति अनेक प्रसंगीं मोठी काळजी उत्पन्न करणारी आहे' असें या पत्रांत ह्मटलें आहे. हें विधान करतांना पत्रलेखकाचा उद्दिष्ट अर्थ कोणता होता तें कळत नाहीं. हिंदी लोकांच्या मनांत आपल्या नैसर्गिक हक्कांविषयीं जागृति उत्पन्न होऊन त्यांच्या महत्वाकांक्षा अर्जांच्या द्वारें स्टेटसेक्रेटरी साहेबांपुढें मांडल्या जात आहेत व त्यांच्या मागण्यांना हिंदुस्थानांतल्या युरोपियन समाजाकडून निष्कारण विरोध होत आहे, अशावेळीं मि. मांटेग्यु यांच्या व नंतर पार्लमेंटच्या अखेरच्या निकालावर हिंदुस्थानचें भवितव्य अवलंबून आहे हेंच काळजी वाटण्याचें कारण असेल तर वरील विधान अगदीं बरोबर आहे. पण हिंदी लोकांनीं आपल्या न्यायाच्या मागण्या पुढें करून आतांपर्यंतच्या व्यवस्थेंत घोटाळा माजविला आहे असें ह्मणण्याचा त्यांचा उद्देश असेल तर मात्र पत्रलेखकाचें मन युरोपियन पत्रकर्त्यांच्या दुराग्रहग्रस्त लेखांनीं कलुषित करून ठेविलें आहे व त्यामुळें हिंदुस्थानांतल्या सद्यःस्थिती संबंधाचा त्यांची गैरसमजूत झाली आहे असें ह्मणणें भाग आहे. सदर पत्रांत उत्तम राज्यव्यवस्थेला अवश्यक कोणकोणत्या गोष्टी आहेत त्यांचें विवेचन केलें आहे. पण सध्याकालीं तो विषय अप्रस्तुत आहे. कारण कीं आज हिंदी लोक उत्तम राज्यव्यवस्था मागत नसून स्वराज्याची त्यांची मागणी आहे. मिशनरींनीं राजकारणांत पडण्यास कौंसिलकडून हरकत नाहीं ही संतोषाची गोष्ट आहे. पण त्यांच्या प्रयत्नाचा सगळा रोख हिंदी लोकांना राज्य चालविण्याचे कामीं समर्थ करण्याकडे असला पाहिजे व देशाच्या कल्याणार्थ करण्या लागणाऱ्या गोष्टींचा भार उचलण्याची त्यांची तयारी होईल व तशी इच्छा ही त्यांचे ठायीं उत्पन्न होईल असे प्रयत्न मिशनरींनीं करावेत असें ह्मटलें आहे. पत्रका हल्लींच्या स्थितींत हिंदुस्थानचे लोक राज्यकारभारांतील जबाबदारीचीं कामें करण्यास पात्र नाहींत, व देशकल्याणाच्या गोष्टी करण्याची त्यांची सिद्धता नाहीं, व त्या करण्याची त्यांची इच्छा ही नाहीं असें जें ध्वनित केलें आहे तें अत्यंत आक्षेपार्ह व वस्तुस्थिती संबंधानें गैरसमज उत्पन्न करणारें आहे असें आह्मांस वाटतें. सर्वांना समबुद्धीनें वागवून सर्वांना सारखा न्याय देण्यासाठीं परमेश्वरी इच्छेनेंच सध्याचे आमचे राज्यकर्ते हिंदुस्थानांत आले आहेत वगैरे वगैरे गोष्टी आतां शिळ्या झाल्या आहेत. ही परमेश्वरी इच्छा अधिकारी लोकांच्या वर्तनांत किती प्रमाणांत प्रतिबिंबित झालेली दिसत आहे व त्यांत कांहीं न्यून असल्यास गेल्या पन्नास साठ वर्षांत तें कां निघून गेलें नाहीं व हिंदुस्थानचे लोकांत असंतुष्टता कां उत्पन्न झाली आहे या गोष्टी वस्तुतः कौंसिलानें विचारांत घ्यावयास पाहिजे होत्या, व ईश्वरी इच्छा पूर्णांशानें सफल होईल असे उद्योग धैर्यानें व एकनिष्ठपणानें अधिकाऱ्यांच्या राजीनाराजीची पर्वा न करतां करण्याविषयींची प्रेरणा मिशनरीस करावयास पाहिजे होती. पण कौंसिलच्या पत्रांत तसें कांहीं एक नाहीं, व एकंदरीनें अधिकारी वर्ग हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या मागणीला विरोध करतांना ज्या प्रकारचा बुद्धिवाद करीत असतात त्याच प्रकारचा उपदेश या कौंसिलानें आपल्या ख्रिस्तशिष्यांस केला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

## आर्यन ब्रदरहुडचें कॉन्फरन्स.

ज्ञातिबंधन तोडण्याच्या उद्देशानें स्थापन झालेल्या आर्यन ब्रदर हुडचें यंदाचें कॉन्फरन्स ना० गोकुळदास पारख यांच्या अध्यक्षत्वाखालीं नुकतेंच पार पडलें. आज तीन वर्षें हें कॉन्फरन्स भरतें, ठराव होतात, आणि श्रीखंडपुरीच्या मेजवानींत त्याचा कार्यक्रम गोड रीतीनें पार पडतो. पण ज्ञातिबंधन तोडण्यासंबंधांत लोकांचीं मनें वळविण्याचा प्रयत्न सदरहुडच्या सभासदांनीं कोणता केला व त्याला किती फळ आलें ते सांगण्याचें स्मरण कोणालच राहत नाहीं. उलटपक्षीं जाती जातींचे स्वतःची उन्नति करून घेण्याचे अलग अलग प्रयत्न मात्र सफळ होत असलेले प्रत्यक्ष दिसत आहेत. कित्येक जातीमध्यें गरीब विधवांच्या साह्यार्थ फंड आहेत; कित्येक विद्यार्थ्यांसाठीं फंड उभारून स्कॉलरशिपा देत आहेत; कित्येकांनीं आपल्या जातीच्या विद्यार्थ्यांच्या धार्मिक शिक्षणाच्या तजविजी केल्या आहेत. पण जातिबंधन तोडण्याच्या बल्गना करणारे मात्र मौन धरून बसतात ते पुढच्या कॉन्फरन्सच्या वेळीं पुनः तोंड उघडतात. अशा स्थितींत ब्रदरहुडाविषयीं लोकांचा ग्रह अनुकूळ न झाला तर त्यांत लोकांकडे तरी काय दोष आहे? थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे हीं कॉन्फरन्स सोशल कॉन्फरन्सची जातिभेद नष्ट करण्यापुरती दुसरी आवृत्ति आहे आणि सोशल कॉन्फरन्समुळें देशाच्या सामाजिक स्थितीवर फारसा बरा वाईट कांहींच परिणाम गेल्या तीस वर्षांत कांहींच झाला नाहीं, तसाच या ही कॉन्फरन्सचा होण्याची भीती समाजाला वाटावयाला नको.

## महायुद्धाची प्रगति

गेल्या आठवड्यांतील युद्धासंबंधाची अतिशय मोठी गोष्ट ह्मणजे क्यांब्रेसमोर ब्रिटिश लोकांनीं हिंडेनबर्गची फळी मोठ्या शिकस्तीनें व हिकमतीनें फोडून मिळविलेला विजय ही होय. मागें आंक्रे येथें ब्रिटिश लोकांनीं अशीच फळी फोडून जर्मन लोकांची दाणादाण केली होती. आतांच्या प्रसंगीं शत्रूच्या तोफा व कैदी ही कागीज करण्यांत आले, पण जरी त्यांची संख्या असली तरी त्या गोष्टीचें येवढें महत्व नाहीं. जीं ठाणीं शत्रूला अभेद्य वाटत होतीं तीं ब्रिटिशांनीं घेतलीं यांत ही या गोष्टीचें येवढें महत्व नाहीं; किंवा सेंट क्वेंटिन व उत्तरेकडचा प्रदेश यांच्या मधला शत्रूचा मोठा रस्ता अडवून त्यांची चळवळ बंद पाडली ही ही गोष्ट येवढी महत्वाची नाहीं. महत्व जें आहे तें या गोष्टींत आहे कीं आपण निर्भय आहों असें समजून शत्रूनें कोणत्याही भागाकडे दुर्लक्ष करतां नये; केल्यास आरास व सेंट क्वेंटिन यांच्यामध्यें जो फजीतवाडा या खेपेस उडाला, तसा पुनः उडेल ही गोष्ट जनरल बिंग यांच्या या विजयानें शत्रूला उत्तम रीतीनें शिकविली यांत आहे. आतांपर्यंत शत्रूला एक प्रकारची निर्भयता वाटून ते इटलीकडे धुमाकूळ घालण्यास जात होते. आतां स्वतःचेच पाय भक्कम रोविले गेलेले नाहींत अशी खात्री झाल्यावर इटलीकडची त्यांची गडबड अर्थातच थोडी थंड पडेल. जनरल बिंग यांनीं आपण काय करीत आहों याचा शत्रूला सुगावा बिल्कूल लागूं न देतां एकाएकीं छापा घातला. जर्मन लोकांनीं आपल्या तोफा व विमानें यांचा मोठा भरंवसा वाटत होता. पण तोफखान्याच्या साह्यावांचून ब्रिटिश लोक एकाएकी चढाई करून येतील हीं त्यांची कल्पनाच झाली नाहीं. इंग्रजांचें नवें ट्यांक नांवाचें घातयंत्र याप्रसंगीं फार कामास आलें. जर्मन सैन्याला विमानांचा उपयोग होईल तितका काटकसरीनें करण्याचा हुकूम होता. तोच यावेळीं त्यांच्या घातास कारण झाला कारण, त्यामुळें हीं घातयंत्रें बरींचशीं इंग्रजांनीं एक ठिकाणीं गोळा केलीं आहेत याची खबर शत्रूला लागली नाहीं, आणि हीं यंत्रें एकदां आपल्या कामाला लागल्यावर सपासप शत्रूचे लोक कापीत चाललीं. ट्यांक्स हीं एखाद्या प्रसंगीं कशीं घात करतात याची कल्पना इतके दिवस जर्मन लोकांना चांगलीशी नव्हती, ती आतां झाली आहे.

## विमानांची काटकसर.

जर्मन सेनापतींनीं तरी विमानांची येवढी काटकसर करण्याचा हुकूम देण्याचें कारण काय? असा प्रश्न साहजिकच कोणी करील व या प्रश्नाला ही एक प्रकारचें महत्व ही आहे. या प्रश्नाचें उत्तर हें आहे कीं यापुढें लवकरच स्वरूप पालटून तोफा किंवा घोडेस्वार यांच्यापेक्षा विमानानाच ज्यास्त महत्व प्राप्त होणार आहे. इंग्लंड, फ्रान्स व विशेषतः अमेरिका यांचें लक्ष विमानांची तयारी ठेवण्याकडे विशेष लागलेलें आहे. अमेरिकेंत नवीं विमानें बांधण्यासाठीं जंगी रकम सरकारनें मंजूर केली आहे. या सगळ्या गोष्टीचा दूरवर विचार करून विमानांचा उपयोग काटकसरीनें करण्याचे हुकूम जर्मन सेनापतींनीं सोडले होते. पण तेच याप्रसंगीं त्यांना घातक झाले.

## पश्चिम रणक्षेत्र.

या रणक्षेत्रांत जनरल बिंग यांनीं मिळविलेल्या जंगी विजयाचा उल्लेख वर आलाच आहे. या विजयानंतर बुर्लान नांवाचें एक महत्वाचें ठिकाण ही त्यांनीं काबीज केलें त्यामुळें त्या विजयाची विशेषच तारीफ केली पाहिजे. या विजयाचे वेळीं ट्यांक्स नांवाचा घातयंत्रें फार उपयोगीं पडलीं. त्याच्या खालोखाल घोडेस्वारांच्या पलटणींचा मोठा उपयोग झाला. या विजयाचें मुख्य रहस्य गुप्तपणाच्या तयारींत होतें. ब्रिटिशांची अशी तयारी चालली आहे ही खबर शत्रूला अगोदर लागती तर सगळेच बेत फसत असें सर डगलस हे आपल्या खलित्यांत ह्मणतात. क्यांब्रे येथील जंगी विजयाबद्दल पंचमजॉर्ज बादशहाकडून सर डगलस हेग, जनरल बिंग व सैनिक यांचें अभिनंदन करण्यांत आलें आहे. म्यूज नदीच्या उत्तर तीरावर ब्रिटिशांनीं जीं ठाणीं काबीज केलीं त्यांची मजबुती चालली आहे. येथें तोफखान्यांकडून जंगी भाडिमार सुरू आहे.

## इटलींतली स्थिति.

इटालियन लोकांची विरोधशक्ति दिवसेंदिवस वाढत असल्यामुळें मित्रराष्ट्रांची चिंता हळूं हळूं कमी होत चालली आहे. टासन येथें इटालियन सेनापति अलपिनो यानें शत्रूकडील सैन्याचा धुव्वा उडविला, आणि शत्रूचे २०० लोक कैद केले. इतर ठिकाणीं ही शत्रूचे अनेक हल्ले इटालियनांनीं यशस्वी रीतीनें परतविले. इटालियन लोकांना आपण बहुतेक चिरडून टाकिलें आहे अशी घमेंड जर्मन शत्रूला वाटत होती, पण ती अगदीं पोकळ होती असें आतां त्यांचें त्यांनाच वाटूं लागलें आहे. जर्मन लोकांच्या तीन डिव्हिजन इटालियनांनीं बहुतेक नामशेष केल्यामुळें त्यांतल्या उरल्या सुरल्या लोकांना त्यांनीं दुसरीकडे नेलें आहे. इटालियन लोकांमध्यें अद्याप इतकी शक्ति उरली आहे अशी शत्रूला कल्पना नव्हती. तोफखान्याच्या मदतीवांचून इटालियनांची खोड मोडणार नाहीं ह्मणून जर्मनांनीं तोफांची मदत मागविली आहे व तिची ते अत्यंत उत्कंठेनें मार्ग प्रतीक्षा करीत आहेत.

## रशिया.

रशियांत जर्मन दरवेशाच्या हातांत अस्वलाप्रमाणें होऊन राहिलेल्या म्याक्सि मालिस्ट पक्षाचें वर्चस्व झालें असून लवकर तह घडवून आणण्याची त्यांची खटपट भारीनें सुरू आहे. गेल्या आठवड्यांत या गोष्टीचा विचार करण्यासाठीं मित्रराष्ट्रांच्या प्रतिनिधींची सभा पेट्रोग्राड येथील इंग्रजांच्या वकिलातींत भरली होती. त्यावेळीं सदर प्रतिनिधींनीं असंदिग्धपणानें आपलें ह्मणणें कळविलें. रशियन लोकांना तह करणें असेल तर त्यांनीं तो खुशाल करावा, पण तसें त्यांनीं

केल्यास युरोपियन राष्ट्रांकडून त्यांच्यावर बहिष्कार घालण्यांत येईल असें सर रॉबर्ट सेसिल यांनीं सांगितलें. हा बुद्धिवाद रशियन लोकांना पटण्याचा व घातुक मार्गापासून ते परावृत्त होण्याचा संभव फार कमी दिसतो. रशियांतले कारखाने बंद पडले, सर्पणाची दुर्मिळता झाली असल्यामुळें येत्या हिंवाळ्यांत गोरगरिबांचे मनस्वी हाल होतील हें स्पष्ट दिसत आहे; मजुर रिकामे पडले आहेत, धान्याचे दुर्भिक्ष आहेच; अशा स्थितींत एकंदर युरोपियन राष्ट्रांनीं बहिष्कार घातल्यावर रशियाची स्थिति काय होईल याचा विचार तेथील सध्याच्या सरकारला स्पर्श सुद्धां करीत नाहीं हें केवढें आश्चर्य!

---

## राष्ट्रोपनिषद्.

(राजकीय महाविष्णूची प्रार्थना)

दिल्ली येथें सोमवार ता. २६ नोव्हेंबर १९१७ रोजीं सकाळीं ११ वाजतां इंडियाच्या स्वराज्य संघातर्फे श्रीमती बिझांट देवी आणि श्रीमान टिळक साहेब यांनीं रेशमी मानपत्राच्या दोन सुवर्ण प्रती प्रत्येकी डौलदार नकशीच्या मौल्यवान व सुंदर अशा रेशमी झोळण्यांत घालून व तो झोळणा हस्तीदंती शृंगाकृती करंडकांत घालून, अनुक्रमें नामदार व्हाइसराय व नामदार भारतमंत्री यांस अर्पण केल्या आणि पुष्पहारांनीं त्या दोन्ही अधिकारी पुरुषांस अलंकृत करून त्यांनीं इंडियाचा संदेश श्रीमान चक्रवर्ती बादशहाकडे त्यांच्या द्वारा धाडून दिला. या इंग्रजी मानपत्रांतील विचार त्या प्रतिभाशाली थोर मुत्सद्यांच्या हातून इतके सर्वोत्कृष्ट उतरले आहेत कीं या पुढें ध्येयाच्या दृष्टीनें हें मानपत्र म्हणजे इंडिया राष्ट्राचें प्रातःस्मरणीच होय. याच कारणामुळें त्याचें रूपान्तर आम्ही वाचकांस सादर करीत आहों आणि त्याच्या परिशीलनानें राष्ट्राचा राजकीय मार्ग अधिक प्रकाशित, सुरळीत व विस्तृत होत जाईल. या कल्याणमय राष्ट्रोपनिषदाला मराठी शब्दांत आम्ही येणेंप्रमाणें मूर्तरूप देतों:—

हिंदुस्थानांतील स्वराज्य संघाच्या बावन हजारावर असलेल्या सभासदांतर्फे येथें आम्ही आलेलों—मध्यवर्ति प्रांतिक अधिकारी —अहो नेक नामदार व्हाइसराय साहेब आपल्या मुलाखतीस येऊन अहो स्टेट सेक्रेटरी महाराज आपल्या आगमनास्तव आपले स्वागत करितों. चक्रवर्ती बादशहा व ब्रिटिश पार्लमेंट याजकडून साम्राज्यांतर्गत स्वराज्य—थोडक्यांत स्वराज्य किंवा आमच्या घरच्या कारभारावरची सत्ता—यासंबंधींच्या आमच्या मागणीचा सहानुभूतिपूर्वक विचार होईल असा आम्हास दृढ विश्वास आहे. कांग्रेसची योजना आमच्या ध्येयाची मोठी प्रगति करील अशा अर्थानें आम्ही ती योजना स्वीकारली आहे. लढाई नंतरच्या पुनर्घटनेंत स्वराज्य उपभोगणाऱ्या वसाहतींप्रमाणें हिंदुस्थानास दर्जा प्राप्त व्हावा आणि ब्रिटिश राष्ट्र संघामध्यें इंडिया हें स्वतंत्र व स्वायत्त राष्ट्र असावें अशी कॉंग्रेसची व मॉसलेम लीगची मागणी आहे व त्याच मागणीचें आम्ही दृढीकरण करितों.

"प्रजेच्या इच्छेस अग्रस्थान देणें हें पुनर्घटनेंतील मुख्य तत्व आहे याचा अर्थ हाच कीं युरोपांतील वाद विषयक प्रदेशाबद्दल दोस्त राष्ट्रांनीं जें तत्व स्वीकारलें आहे तेंच उष्ण कटीबंधांतील प्रदेशांसही सारखेंच लागू करण्यात येईल" ही मुख्य प्रधानांची प्रतिज्ञा चक्रवर्ती सरकार पूर्ण करील अशी आम्हांस उमेद आहे.

वरील शब्द जरी अंतस्थ कारभारास अनुलक्षून योजिलें नव्हते तरी त्यांतील तत्वाची व्याप्ती सर्वत्र आहे. आमची अशी खात्री आहे कीं ग्रेटब्रिटन आपल्या दोस्त राष्ट्रांच्या मदतीनें जी लोकसत्ता इतरत्र चहोंकडे लढून प्रस्थापित करीत आहे ती लोकसत्ता हिंदी लोकांस देण्यास ग्रेटब्रिटन माघार घेणार नाहीं; तसेंच ग्रेटब्रिटन व दोस्त राष्ट्रें हिंदुस्थानच्या सैन्यबळावर व हिंदी पैशाच्या मदतीनें जी दडपशाहीची व बेजबाबदारीची शासनपद्धती जगांतून नष्ट करून टाकण्यासाठीं लढत आहेत तीच शासनपद्धती हिंदुस्थानांत ग्रेटब्रिटन अशीच चालूं ठेवणार नाहीं. ब्रिटिश सरकार आमच्या मागण्याचा सहानुभूतीपूर्वक पूर्ण विचार करील व हिंदुस्थान सरकारचें त्यांनी पूर्वीच दाखविल्याप्रमाणें या ब्रिटिश भावनेशीं पूर्ण तादात्म्य आहे असा आम्हांस भरंवसा वाटतो. आणि म्हणूनच आम्ही स्वराज्याची मागणी करीत आहों. तें स्वराज्यांतील सरकार प्रांतिक कौंसिल व वरिष्ठ कौंसिल—राष्ट्रीय पार्लमेंट—या दोहोंतील हिंदी राष्ट्राच्या लोकनियुक्त प्रतिनिधींना जबाबदार राहील; परंतु या ध्येय प्रप्तीची पहिली पायरी म्हणून संक्रमणावस्था पतकरण्यास आम्ही कबूल आहों; मानपत्राबरोबर जोडलेल्या परिशिष्टांत विस्तृत केलेल्या कॉंग्रेस लीगच्या योजनेंत ही संक्रमणावस्था निर्दिष्ट केलेली आहे. या योजनेअन्वयें निम्मे सरकारी व निम्मे लोकनियुक्त—लोकनियुक्त हिंदीच असले पाहिजेत—सभासद असलेलें कार्यकारी कौंसिल आणि चार पंचमांश लोकनियुक्त व एक पंचमांश सरकारनें नेमलेले सभासदांचें कायदे कौन्सिल, अशीं दोन कौन्सिलें राहतील. कायदे कौन्सिलचा खजिन्यावर पूर्ण ताबा राहील. कां कीं ज्या वेळीं कायदे कौन्सिल व कार्यकारी कौन्सिल यांच्या मध्यें विरोध उत्पन्न होईल तेव्हां तेव्हां त्या वादांत दोन्ही पक्षांना हार कोठे घ्यावी व सरशी कोठे करावी याचा चांगला धडा मिळेल आणि शेवटीं लोकनियुक्त प्रतिनिधींच्या बहुमताच्या हातीं थैलीचें तोंड बंद करण्याची सत्ता राहिल्यामुळें तीच गोष्ट, वाद निकालाला लावण्याला श्रेष्ठ कारण होत जाईल. पण राष्ट्राच्या संरक्षणासाठीं लागणारा जो लष्करी खर्च त्याला मात्र ही गोष्ट लागूं नाहीं. या कांग्रेसच्या योजनेला कांहीं कलमान्वयें प्रतिषेधाचा अधिकार कार्यकारी मंडळाच्या हातीं दिला आहे. या प्रतिषेधामुळें कायदे कौंसिलच्या उतावळेपणाच्या गोष्टीवर योग्यसा दाब राहील. जेव्हां साम्राज्याची पुनर्घटना विचारांत घेण्यांत येईल तेव्हां कांग्रेस लीगचें असें मागणें आहे कीं इंडियाला स्वराज्य चालविणाऱ्या वसाहतींच्या बरोबरीला नेऊन ठेवण्यांत यावे म्हणजे इंडियाचीं सरकारें कायदे कौन्सिलांना जबाबदार राहत जातील.

हल्लीं इंग्रजी दडपशाहीची शासनपद्धती अंमलांत आहे ती बदलून तेथें इंडियन अल्प जनांच्या हातीं राजसत्ता देण्यांत यावी असें आम्ही म्हणत नाहीं. आम्हाला जबाबदार सरकार पाहिजे आणि त्याबरोबरच मतदार मंडळ उत्तरोत्तर वाढते पाहिजे. आम्ही सरकारच्या कायदे कौंसिलापासून प्रत्यक्ष कारभार चालवणारी मंडळी वेगळी करूं करतों आणि कार्यकारी मंडळामध्यें सिव्हील सर्व्हिसच्या मंडळींना आम्ही मज्जाव करीत आहों फक्त हा प्रतिबंध कांहीं विशिष्ट स्थळीं ठेवण्यांत येणार नाहीं. आमची हरकत मुख्य पद्धतीसंबंधानें आहे ती चालवणाऱ्या लोकाबद्दल इतका आमचा आक्षेप नाहीं.

या योजनेविरुद्ध जे आक्षेप घेण्यांत येतात त्यांपैकीं एकही सयुक्तिक नहीं हें आम्ही विनयपूर्वक सादर करीत आहों. जनसमुह अशिक्षित आहे ही तक्रार सन १८३२ च्या रिफार्म बिलाच्या वेळीं ब्रिटिशजनतेला जितकी लागू होती त्यापेक्षां विशेष लागूं पडत नाहीं. लोक अशिक्षित आहेत ही गोष्ट हिंदुस्थानास स्वराज्य मिळेपर्यंत विशेषशी सुधारण्याचा संभव नाहीं. इंग्लंडांत ही शिक्षणाचा विषय नेटानें हातीं घेण्यांत आला नाहीं आणि ही गोष्ट सन १८६७ चें दुसरें ग्रेट रिफार्म बिल पास होईपर्यंत चालली होती. प्रारंभीं मतदार मंडळ पूर्णपणें समाधान कारक अशीं प्रस्थापित होणें शक्यच नव्हतें. ग्रेट रिफार्म बिल पास होऊन आज ८५ वर्षें लोटलीं तरी ग्रेट ब्रिटन मध्येंच या बाबतींत मोठा वाद चालू आहे व मत देण्याचा अधिकार कसा कसा विभागला जावा हा विषय मुख्य वादांत पडला आहे. पाश्चत्य राष्ट्रांत जेथें राजकीय पद्धति अद्याप पूर्णत्वाला पोहोंचली नाहीं तेथें इंडियांत तशी राजकीय पद्धति असली पाहिजे असें म्हणणें विचाराला सोडून होईल. इंडियांतील राजकीय पद्धति सुधारावयाची सत्ता इंडियाच्याच हातीं ठेवण्यांत आली तर ती क्रमक्रमानें सुधारून सुसंकृत होत जाईल.

दुसरीं राष्ट्रें जसा आपल्या संकृतीचा नगारा आपला आपणच वाजवितात तसा इंडियाला क्रमाक्रमानें आपला आपणच वाजवावा लागेल. दुसऱ्या राष्ट्रांच्या हातीं ही जशी सत्ता आहे, तशीच सत्ता इंडियाला ही मिळाली पाहिजे. इंग्लिश लोकांनीं हिंदुस्थानावर आपलीच इंग्रजी पद्धति पूर्णपणें लादावी असें इंडियाला आतां नको आहे तर त्याला हिंदी पद्धतीच पाहिजे व ती हळूं हळूं त्यानेंच चालू केली पाहिजे. स्वराज्य चालविणाऱ्या वसाहती जशा स्वतंत्र आहेत तसेच इंडियाला ही स्वतंत्र करावे एवढीच ग्रेटब्रिटन जवळ याचना आहे. म्हणजे ब्रिटिश साम्राज्या खालीं इंडिया आपलें ध्येय आपले आपणच संपादन करील.

(अपूर्ण)

---

## घातुक तडजोड.

सध्या हिंदुस्थानचे लोक पूर्ण स्वराज्याचे ध्येय पुढें ठेवून राज्यकारभारांतला बराचसा वाटा हक्कानें मागत आहेत, आणि युरोपियन लोक महत्त्वाचे अधिकार आपले हातीं ठेवून शोभेचा दिखाऊ भाग तेवढा हिंदी लोकांचे तोंडावर टाकून हिंदुस्थानांतली असंतुष्टता नाहींशी करा असा सरकारास उपदेश करीत आहेत. अशा दोन टोकांचा संयोग घडून येणें अगदीं अशक्य गोष्ट आहे. पण बंगालमधील कित्येक मेळ्या शंकरांना ती गोष्ट शक्य वाटून त्यांनीं तडजोडीच्या तत्त्वावर युरोपियनांशीं संगनमत करण्याचें आरंभिलें आहे. या दोघांच्या मतानें सुधारणेची तयार झालेली योजना मोठी गमतीची आहे. एकाच वेळीं दोन प्रकारची पद्धति सुरू ठेवावयाची. एकींत लेजिस्लेटिव्ह कौन्सिलाचा ताबा एक्झिक्युटिव्ह आफिसरावर चालवावयाचा. या पद्धतीखालीं थोडीं व किरकोळ खातीं असतील. दुसरींत हल्लींचीच व्यवस्था राहून तिच्या खालीं सगळीं महत्त्वाचीं खातीं राहणार. या दुसरींत लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचा अधिकार केवळ उपदेश देण्यापुरता असावयाचा; फार तर नामदार सभासदांनीं टीका करून तोंडाला शीण द्यावा. पण त्या टीकेचा परिणाम कांहीं व्हावयाचा नाहीं. किरकोळ खात्यांतून मोठाल्या जागा हिंदी गृहस्थांना कांहीं अधिक प्रमाणांत मिळावयाच्या, पण रेव्हेन्यु सारखीं खातीं युरोपियनांच्याच हातीं राहणार. ही योजना हिंदी लोकांच्या वाढत्या आकांक्षा पुरविण्याला अगदीं अपुरी आहे. इतकेंच नाहीं तर मि. मांटेग्यु यांनीं पार्लमेंटांत जाहिर केलेल्या सुधारणांच्या धोरणाला ही विरोधी आहे कारण मि मांटेग्यु यांनीं सांगितल्याप्रमाणें सर्व खात्यांत हिंदी लोकांची संख्या वाढविणें व स्वराज्याचें ध्येय धोरण पुढें ठेवून महत्त्वाच्या अधिकाराचा पहिला हप्ता देणें हें सरकारनें धोरण ठरविलें आहे पण या योजनेप्रमाणें शुष्क अधिकार तेवढे हिंदी लोकांच्या पदरांत पडावयाचे आहेत व ते ही कांहीं किरकोळ खात्यांत!

---

## एक अपूर्व संस्था

हिंदुस्थानची राज्यपद्धति लांकडासारखी कठीण व नवीन वळणाचा स्वीकार करण्यास अपात्र झाली आहे अशी टिका मि. मॉंटेग्यु यांनीं मेसोपोटेमिया कमिशनवरच्या चर्चेच्या वेळीं केली होती. तिची यथार्थता वारंवार दिसून येते. त्रावनकोर, बडोदें, म्हैसूर, इंदूर, ग्वालेर वगैरे संस्थानांतून प्रजेच्या कल्याणासाठीं निरनिराळ्या दिशांनीं काम करणाऱ्या संस्था निघतात व त्यांना त्यात्या संस्थानिकांकडून पूर्ण द्रव्यसाह्य व सहानुभूति मिळते. ब्रिटिश हिंदुस्थानांत जी पद्धति पंनास वर्षांपूर्वीं एकदा ठरली ती आपली कायम ठशाची होऊन बसली आहे! म्हणून बडोद्यांत लायब्रऱ्यांची त्रावणकोरांत स्त्रीशिक्षणाची, म्हैसुरांत औद्योगिक व ग्वालेरसंस्थानांत व्यापारविषयक चळवळीकडे त्या त्या संस्थानिकांचें जसें लक्ष आहे तसें ब्रिटिश हिंदुस्थानांत दिसत नाहीं. इंदूर संस्थानांत यंदा शुचिर्भूतपणा ठेवणारी संस्था नगररचनेच्या विषयांतले तज्ज्ञ प्रो. गीडीज यांच्या प्रेरणेनें स्थापन झाली आहे व तिला श्रीमंत होळकर सरकारांनें ६ हजार रुपये दिले आहेत. दिवाळीसारख्या सणाचे

वेळीं शहरांत स्वच्छता ठेवण्याकडे ही रकम खर्च व्हावयाची आहे. या संस्थेकडून गेल्या एकादशीचे दिवशीं प्लेगासंबंधाची जंगी थाटाची मिरवणूक काढण्यांत आली. या मिरवणूकीचें वर्णन मल्हारिमार्तंड विजय पत्रांत आले आहे तें फार वाचनीय आहे. लोकांच्या मनावर स्वच्छतेचें महत्व चित्रविण्यासाठीं एक मोठा उंदिर, प्लेगरूपी राक्षस, अतिशय गलिच्छ घर, व त्यांच्याच मागून सफाई करणाऱ्या भंग्यांची पलटण, नमुनेदार स्वच्छ घर, बागबगीचे, आगविझविण्याचा बंब, फळपुष्पांनीं सुशोभित पृथ्वी देवी, धनधान्याची समृद्धि करणारी लक्ष्मी देवी, व हिशेबाच्या वह्या भराभर उलटणारे व खणखण रुपये वाजविणारे लक्ष्मीपुत्र, वगैरेंची मिरवणूक लोकांना अतिशय बोधप्रद झाली असली पाहिजे. अशा मिरवणूकी वारंवार काढल्यानें अशिक्षित प्रजेच्या मनावरही स्वच्छतेचा परिणाम हळूहळू घडल्या वांचून राहणार नाहीं. देशी संस्थानांतच अशी संस्था निघून तिला सरकारांतून द्रव्यसाह्य मिळणें शक्य आहे. ब्रिटिश मुलखांत हें शक्य नाहीं.

## गुलदस्त

( दिल्लीच्या मानपत्रांचे पत्ते )

निःस्वन मेघ खरी वृष्टि करितो, निर्वात विद्युद्दीप अधिक उज्वल जळतो, किंवा निश्चळ मन खरें स्वराज्य करितें त्याप्रमाणें मौनव्रती राजश्री (राजश्री मांटेग्यु किंवा लार्ड चेम्सफर्ड) हे लोकांचे परम ध्येय क्रियेच्या रूपांत घालतील तेव्हांच चक्रवर्तीचा खरा जाहिरनामा प्रसिद्ध करितील. सध्या इतकें निश्चित आहे कीं स्वराज्याचा सिद्धांत काँग्रेसवाल्यांनीं व होमरूलवाल्यांनीं एवढ्या वीरश्रीनें व निर्भिडपणानें सिद्ध केला आहे कीं ही स्वराज्याची लाट राजकीय समुद्रांत नेहमीं वरवर उसळती राहील आणि तिला प्रतिरोध करणारी विचारमाला उलथी पालथी होऊन रसातळीं बुडून जाईल. महायुद्धांत ब्रिटिश साम्राज्याचा विजय आणि इंडियाचें स्वराज्य हीं दोन्ही परस्परावलम्बी ही आहेत आणि ईश्वरी नेमानेमानें कालच्या एकाच नालावर दोन्हीं दृश्य सृष्टींत उतरतील असें भविष्योत्तर पुराण सांगतें. ब्रिटिश साम्राज्यानें मानवी संस्कृतींत जे कृत्रिम राक्षस उभे केले आहेत ते परमेश्वराच्या अनंत हस्तांनीं आपोआप लुप्त होतील आणि सहकारित्वानें व समसमानतेनें सर्वत्र स्वातंत्र्य, प्रेम व आनंद हीं नांदूं लागतील असें भावी मन्वन्तराचा अरुणोदय जगास विदित करीत आहे. या संहाराच्या कालचक्राच्या गर्भांत ईश्वरी प्रसादाचीं रत्नें किती तरी दडून राहिलीं आहेत बरें! तेव्हां राजकीय खेळांत तल्लीन झालेल्या खेळगड्यानीं गुलदस्त्याचा आशावृक्ष असाच फलपुष्पांनीं समृद्ध होईपर्यंत आपल्या खेळाची लगट, कार्यकौशल्य व धैर्य चें शिखरदर्शन यांस तिलमात्र विसरतां कामा नये.

## दिल्लीच्या गप्पा

श्रीमान टिळक हे दिल्लीस गेले पण त्यांच्या तोंडाला सरकारी कुलूप होतें त्यामुळें त्यांच्या दर्शनानें पावन होणाऱ्या हजारो लोकांच्या श्रोतृसमाजापुढें लोकांच्या या मांटेग्यु साहेबांनीं नामदार दादसाहेब खापर्डे यांस व्हाइसराय बनविलें होतें. त्यांनींच हिंदी भाषेत लोकांच्या जागृत ध्येयांस अंकुरित केलें.

श्रीमान टिळक म्हणजे लोकांच्या ध्येयांची देवमूर्तीच होय. स्थळोस्थळीची पुष्पवृष्टि व सार्वजनिक समारंभ पाहून दिल्लीला या गोष्टी बंद ठेवाव्या लागल्या होत्या तरी कर्नल बिडन यांनीं त्यांस कळविलें कीं आपण परततांना दिल्ली स्टेशनावरून जाऊं नये म्हणजे उतारूंच्या गैरसोयीच्या तक्रारी येणार नाहींत आणि पंजाबमेल आपणासाठीं दिल्ली जवळच्या सदर स्टेशनावर उभी करण्याचा हुकूम आम्ही करितों. फार नामी! कोण ही सर्वांगसुंदर पुतना मावशी व तिचें लोकांच्या सौख्याबद्दल वात्सल्य!

**सुखसंवाद**—श्रीमान टिळक, गांधी, बेझंट, सुरेंद्रनाथ, मुधोळकर इत्यादिकांच्या खाजगी मुलाखती झाल्या. तेथील आनंदवर्धक आशाश्री उत्पन्न करणारे सुखसंवाद उभयपक्षीं गुप्त आहेत तेव्हां चित्रगुप्ताकडे तारा करून मनोमय विद्युत्प्रवाह चालू करावेत म्हणजे तेथील मौजा कल्पनेला गम्य होतील. कर्टिस स्कीमचा भोपळा मात्र जिकडे तिकडे तरंगत होता.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—कडक थंडी, व सूर्याचें तिपेऊन, नवी रुचिकर धान्यें, गोड उदक इत्यादि गोष्टी आरोग्याला संवर्धक आहेत मग प्लेगाचा प्रसार कां बरें होतो?

**प्लेग**—१७ नोव्हेंबर अखेरीच्या सप्ताहांत प्लेगाने मृत्यु आकोला, उमरावती, बुलडाणा व येवतमाळ या जिल्ह्यांतून अनुक्रमें १०७,४८-४१ व २० असे झाले. यंदा प्लेग सार्वत्रिक होत चालला आहे पण सध्या उंदीर मोठ्या प्रमाणावर बळी पडत आहेत. नागपूर म्युनिसिपालिटीनें मूषक संहाराचें सत्रच आरंभिलें आहे. असला प्रतिबंधक उपाय करण्यापेक्षां शहरें व गांवें निराळ्या ठिकाणीं वसविण्याला प्लेग सांगत नाहीं काय?

रा. रा. शहा महमद अब्दुररहीमान तहशिलदार चांदूर यांस ६ आठवड्यांची हक्काची रजा देऊन त्यांच्या जागीं तेथील नायब तहशिलदार रा. रा. अनंत लक्ष्मण गडबोले यांस तहशीलदार नेमिलें आहे.

रा. रा. कृष्णाजी बापूजी साठे एल. एल. बी. यांस ॲक्टिंग मुन्सफ आकोल्यास नेमण्यांत आलें.

रा. रा. दुर्जनसिंग डेप्युटि पोलिस सुपरिंटेंडेंट आकोला आणि रा. रा. जहीर-उल-हुसेन रिझवी यवतमाळ यांस रायपूर व नागपूरकडे बदलण्यांत आलें.

रा. रा. बाळकृष्ण बंधूजी चौबळ सबार्डिनेट जज हे मद्रास्यास रुजू होण्याला गेल्या मंगळवारीं जाण्यापूर्वी त्यांच्या सन्मानार्थ येथील वकील मंडळींनीं एक मोठी मेजवानी दिली आणि त्यांच्या सेवेच्याचा सुगंध किती मनोहर झाला होता हें मुग्ध वक्तृत्वानें सांगितलें. सरकारी काठीवर उभी असलेली ही आमची विद्वान मंडळी आपल्या एकतारीचें गाणें सोडून थोडे चौफेर पाहतील तर याईक वृत्ती परिकडील मनुष्याच्या चतुरंग स्वभावाची चांगली खुलावट होईल असा आम्हांस विश्वास आहे. उपरी अधिकाऱ्यांच्या दयार्द्र कटाक्षांवर ज्यांची भिस्त आहे ते लोकादरास किती पात्र होतात हें राजश्री चावळांच्याच गौरवावरून सिद्ध होतें.

रा. रा. सखाराम रामचंद्र सुकळीकर असिस्टंट सुपरिंटेंडेंट निरत पुलीस इन्स्पेक्टर जनरल यांस डेप्युटि सुपरिंटेंडेंट वर्ग ४ चे नेमण्यांत आलें आहे हें कळविण्यास आनंद वाटतो.

दारव्हाचें तहशीलदार यांस रिक्रुटींग आफिसर तेथेंच नेमून रा. रा. उटीरकर तहशीलदार यांस पुसदाहून दारव्हा येथें बदललें.

रा. रा. रामकृष्ण अमृत देशपांडे तहशिलदार यांस पुसद येथें आकोट्याच्या स्पेशल ड्युटीवरून पाठविण्यांत आलें.

रा. ग. धात्रक तहशीलदार, उमरावती यांस तेथेंच रिक्रुटींग आफिसर नेमण्यांत आलें.

**रिस्लेबंदी**—अलिशान सर बेंजामिन यांच्या विनंतीला मान देऊन विद्यार्थी कालेजांत व हायस्कुलांत परत गेले तेव्हां १९१२० मुल्य विद्यार्थ्यांची कॉलेजी हक्कालपट्टी रद्द करण्यांत येईल अशी उमेद आहे.

**कापूस**—१ ल्या सप्टेंबर पासून २४ नोव्हेंबर अखेर ६६९८६ कापसाच्या गाड्या वऱ्हाडांत आल्या. तेथें गेल्यासालीं १॥ लक्ष गाड्या आल्या होत्या. यंदाचें पीक फार कमी असून त्याचें प्रमाण स्थलभेदानें ४ आण्यापासून १२ आण्यापर्यंत आहे.

आकोला जिल्हा बोर्डानें शाळा मास्तरांचे पगार जसे वाढविले आहेत तसे आतां म्युनिसिपालिटीलाही वाढविले पाहिजेत शिक्षकांची स्थिती जितकी सुधरेल तितकी चांगली.

**शिक्षक समाज**—आकोला जिल्ह्यातील प्राथमिक शाळांच्या शिक्षकांची वार्षिक परिषद येत्या शुक्रवारापासून ४ दिवस येथें भरणार आहे. अर्थात् १२ तारखेच्या राष्ट्रदिनाच्या उत्सवांत ही साहजीकच भर पडेल.

## नोटीस.

वि. सेकंड. सबजज साहेब कोर्ट अकोला
कि. अ. नं. ९ सन १९१७
चौ. ता. ८-१२-१७

अर्जदार

भागेथी मर्द गणपत जगताळ कुणबी रा. आकोट

बीन अर्जदार

१ तुकाराम बनसिंग कुणबी रा. आकोट
२ मोतीराम संपत कुणबी रा आकोट

सर्वत्र लोकांस या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं, वरील अर्जदार भागेथी मर्द गणपत इ० यांनीं कोर्टांत गणपत ता. १२-१-१७ रोजीं मयत झाल्यामुळें याचे वारस असल्याबद्दल सक्सेशन सर्टिफिकीट मिळण्याबद्दल अर्ज केला आहे. त्याची चौकशी ता. ८-१२-१७ रोजीं नेमली आहे. तरी ज्या कोणास वरील मयताचे वारस असल्याबद्दलची तक्रार करणें असेल त्यानें वरील तारखेस सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टांत आपले जवळ असलेल्या पुराव्यानिशीं हजर राहावें. बरप्रमाणें न झाल्यास अर्जदार यांस वरील मयताचे वारस समजून सर्टिफिकेट दिले जाईल कळावें. ता. ३०-११-१७ इ.

सही
V. S. Deo
II Sub Judge Akola

N. N. 479

## जाहिरात

वऱ्हाडप्रांत, वर्धा व नेमाड जिल्ह्याचे शेतकीचे वार्षिक संमेलन व प्रदर्शन "Our Day" (आवर डे) चे प्रदर्शन ज्या ठिकाणीं होणार आहे त्याच ठिकाणीं भरविले जाणार आहे. शेतकीचें प्रदर्शन ता. १२ ते १६ डिसेंबर सन १९१७ पावेतो उघडे राहील. तें मोफत पाहण्यास सर्वांस मोकळीक आहे. ता. १६ डिसेंबर सन १९१७ रोजीं शेतकीचें वार्षिक संमेलन भरेल त्यांसही सर्वत्रास येण्यास मोकळीक आहे. कळावें. ता. ६ नोव्हेंबर सन १९१७

सही
D. R. Dongere
For Deputy Commissioner

## नोटीस.

नोटीस वेशमी तुक्या वा देम्या महार रा. कंझार ता. मंगरूळपीर

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुम्ही पुन्हा एक दुसरी बायको मोहतरनें केली आहे. मला तुम्ही लग्न झालेवर एक वेळच आपले घरी लहान असतांनाच नेले होते त्यावेळीं तुम्ही मला २ महिने आपले घरी ठेवल्यानंतर मला माझा बाप नेण्याकरितां आल्यामुळें त्याचे बरोबर मला रवाना केले. पुढें तुम्ही मला नेण्याकरितां आले नाहीं मी तुम्हास बरेच वेळ घेऊन जाण्याबद्दल निरोप पाठविले परंतु आपण कांहीं मला नेले नाहीं पुढें दोन तीन वर्षे मी आपल्या बापाचे घरी राहिले परंतु आपण कांहीं मला नेण्याकरितां आले नाहीं. मीच स्वतः बरोबर एक रोजाचा मनुष्य घेऊन तुमच्या घरी नांदण्याकरितां आले त्यावेळीं तुम्ही मला ११२ दिवस ठेऊन घेऊन विनाकारण मारहाण करून मला घरांतून काढून दिले व सांगितले कीं मला तुम्ही नक्की नाहीं पुढें मी जं० स० डी० साहेब बहादूर यांचे कडे फिर्याद तारीख १८|६|१९१३ रोजीं केली नंतर तुम्ही साहेब बहादूर यांचेसमोर जबाब दिली कीं मी वागविण्यास तयार आहो नंतर तुम्ही मला ताबडतोबच कचेरी वरून आपले घरी घेऊन गेले. व मला दोन तीन दिवस ठेऊन घेऊन मारहाण करून काढून दिले तेव्हांपासुन मि आपले बापाचेच घरीं आहे तरी तुम्हास

नोटिशीनें कळविण्यांत येते कीं माझे बापाला माझे अन्न वस्त्राबद्दल रुपये ४०० शे खर्च आला आहे. तरी तुह्मी हा नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत रुपये आणून देऊन मला घेऊन जावे. त्याप्रमाणें तुमचे कडून न झाल्यास हीच फारकती समजून मी दुसरा नवरा करीन मग तुमचा मजवर नवरेपणाचा बिलकूल हक्क संबंध राहिला नाहीं ही नोटीस दिली सही ता. ३०-१०-१७ दस्तुर गणपतरावे कृष्णराव जमादार रा० वाशीम.

सही.

तुळशी मर्द तुक्या महार रा० वाशिम इचे हातची निशानी बांगडी असे.

नो० नं० ४७६

---

## नोटीस

नोटीस रा. रा. बिंदराम कुंजीलालजी मारवाडी दुकान आकोला ताजनापेठ मालक रामधन बिंदराम मारवाडी

यांसी:—

खालीं सही करणार गोदावरीबाई जवजे देवीलालजी व सुंदरबाई जवजे जगन्नाथजी साहु दुकान केळीवेळी ता. आकोट तर्फे मुखत्यार वामन हनवती यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुमचे खाते आमचे दुकानांत आहे. त्याखात्यांत तुमचे नांवें आमची रकम १०९५८।।।-।। दहाहजार नवसे अठ्ठावन रुपये साडेतेरा आणे व शिवाय व्याज आज मित्तीस घेणें निघत आहे. व शिवाय तुह्मी आमचे मालका करितां रा. रा. गुलाबराय हरदयाल मारवाडी दुकान आकोला मालक गुरुप्रताप गोविंदराम यांजपासून तुमचे जवळ आमचे मालकांची असलेली रकम यांतून दहाहजार रुपयांची हुंडी मित्ती वैशाख वद्य ३० तारीख २१-५-१९१७ इसवी रोजीं ६१ एकसष्ट दिवसाचे मुदतीची लिहून घेतली आहे व ती तुमचे जवळच आहे. त्या हुंडीची रकम मुदत पुरी झाल्यावर मागण्यास गेले असतां गुलाबराय हरदयाल यांनीं दिली नाहीं. त्याच प्रमाणें वर लिहिले रकमे बद्दल रा. रा. मंगणीरामजी देवीलालजी मेहेकरवाले व रा. रा. जगन्नाथ पेमराज गोंदियावाले असें मिळून मागणी केली परंतु तुह्मी वरील रकम दिली नाहीं. हल्लीं या नोटिशीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत या नोटिशीचे खर्चासह तुमचे स्वतःचे खात्यांतील सर्व रकम व्याजासह आणि तुह्मी आपले मारफतीनें व जबाबदारीवर गुलाबराय हरदयालजी यांचेकडून तुह्मी लिहून घेतलेली हुंडी तिचे खर्च व मुदत पुढील व्याज अशी सर्व रकम आह्मास देऊन आमची रसीद घेऊन जावी या प्रमाणें आपण सदर्हु मुदतींत व्यवस्था न केल्यास तुमचे खायाचे रकमेबद्दल आणि हुंडी नग १ रुपये दहाहजारांची गुलाबराय हरदयाल यांजवर तुह्मी लिहून घेतलेली तिचे रकमेबद्दल तुह्मी सदर्हू व्यवहार आपले मारफतीनें केला ह्मणून जबाबदार आहांत सबब तिजबद्दल प्रतिवादी करून तुह्मावर दावा केला जाईल. विनाकारण आपल्या सारख्यांनीं कोर्टांत जाण्याचा प्रसंग आणावा हें उचीत नाहीं. शिवाय खर्चांत दोहोपक्षांनीं खराब व्हावें हें ही बरोबर नाहीं तरी या गोष्टीचा पूर्ण विचार होऊन दिलेले मुदतींत निकाल करावा कळावें. तारीख २८-११-१७

सही

गोदावरीबाई जवजे देवीलालजी व सुंदरबाई जवजे जगन्नाथजी मारवाडी साहु तर्फे मु. वामन हनवती पा. सपकाळ दु. केळीवेळी दस्तुर खुद

नो. नं. ४७७

---

## नोटीस.

नोटीस रा. रा. गुलाबराय हरदयालजी मारवाडी दुकान आकोला ताजनापेठ मालक गुरुप्रताप गोविंदराम

यांसी:—

खालीं सही करणार गोदावरीबाई जवजे देवीलालजी व सुंदरबाई जवजे जगनाथजी मारवाडी दुकान केळीवेळी ता आकोट तर्फे मुखत्यार वामन हनवती यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मास आह्मी रा. रा. रामधन बिंदराज दुकान आकोला यांचे मारफतनें हुंडी नग १ रुपये १०००० दहाहजाराची मिती वैशाख वद्य ३० ता २१-५-१७ इसवी रोजीं तुह्मी लिहून रामधन बिंदराज यांचे स्वाधीन केली तिची मुदत ६१ दिवसांची होती ती मुदत पुरी होऊन बराच काळ झाला तुह्मास मुदतीवर व त्यानंतर अनेकवेळां हुंडीचे रुपये व शिवाय मुदती पुढील व्याज असें रा. रा. जगनाथ पेमराज गोंदियावाले व मी असें मिळून मागितले असतां दिले नाहींत. करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, ही नोटीस पावल्या बरोबर आठ दिवसांचे आंत आमचे हुंडीचे रुपये व व्याज हिशेबाअंतीं जे होईल ते आह्मास देऊन आमची रसीद घ्यावी. सदर्हुप्रमाणें दिलेले मुदतींत आपण व्यवस्था न केल्यास आपणावर व रामधनजी यांचेवर योग्य कोर्टांत दावा केला जाईल. आणि नोटिशीचे खर्चा सुद्धां सर्व रकम भरून घेतली जाईल. विनाकारण खर्चांत दोहो पक्षांनीं खराब होणें हें आपले सारख्यास बरोबर नाहीं कळावें. तारीख २८-११-१७

सही

गोदावरीबाई जवजे देवीलालजी व सुंदरबाई जवजे जगनाथजी मारवाडी साहु तर्फे मु. वामन हनवती पा. सपकाळ दु. केळीवेळी द. खु.

नो० नं० ४७८

---

## पाहिजे.

दिवाणी, फौजदारी, व मुलकी कोर्टाच्या कामाकरितां अनुभवीक व इंग्रजी जाणणारा असा मनुष्य पाहिजे. खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा अगर समक्ष भेटावें.

सही

गुलाबराय गोविंदराम

दुकान-आकोला (वऱ्हाड)

नो० नं० ४५३

---


गरीबांस फुकट

# रामबाण मलम

( कोणत्याहि त्वग्रोगावर )

गुणकारी किं० ६ आणे.

# केशनाशक पूड.

( ९ आणे )

(क्याटलॉग फुकट) पत्ता. व्ही. आर मुळे नांदूरा. G. I. P.

नो० नं० ३७०

---

## रोल्डगोल्ड सोन्याचे

### कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. ३-४; गोट जोडी २-२॥; पाटल्या जोडी २-२॥; वज्रटीका ३-४; ठुशी ३. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४-५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सगाची २-३-४; अंगठी १; मले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २-२॥. सरी ४

### केंस काळे करण्याचा साबण.

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाक्सची किं. १॥ रु.

पत्ता— मगनलाल के आणि कंपनी गिरगांव— मुंबई

नो० नं० ५

---

ॐ नमः श्रीगणेशाय.

# आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

## मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलत गर्भासंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मुत्रमार्ग व नेत्र याचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक कार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व मद्यान्न भरपूर पचूं लागतें यात उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नमून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करिता गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. सका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६९ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तीडक, मुत्रांची काळा, संकोच, पुयस्त्राव, रक्तस्त्राव इत्यादि विकार पथ्य नसत ात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें ठवू.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें हित याशिवाय मोठमोठे रागांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० ० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमा कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो० हर्णै, जिल्हा रत्नागिरी

नो० नं० २२


---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-N. No 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१ ] आकोला—सोमवार तारीख १० माहे डिसेंबर सन १९१७ ई० [ अंक ४९


### जाहिरखबर

आमचा कसबे आकोले येथील रजपुत पुऱ्याचे दाक्षिणेकडील मळा विकावयाचा आहे. या मळ्यांत एक मोठी चर मोटी चालण्यासारखी विहीर असून एक मोठा बंगला आहे. शिवाय नौकर लोकवगैरे राहण्याकरितां घरेंही आहेत. बगीच्याही आहे. ज्यास विकत घेण्याची इच्छा असेल त्यांनी खालील पत्त्यावर भेटावें म्हणजे बेलगे चाकणें करूं. ता. सही

देवराव विनायक

C/o श्रीगणेश कंपनी

राममंदिराजवळ अकोला

ने. नं. ४८०

## सत्योदय.

( सत्यशोधक मताचें मासिक पुस्तक. )

जेणें करून विद्येंत मागासलेल्या जातींची उन्नति होईल अशा प्रकारचे निबंध व सणसणीत लेख साध्या व सोप्या भाषेंत दर महिन्यास नियमितपणें प्रसिद्ध होत असतात. गरीब गुरिबांस ही घेतां यावें म्हणून बारा महिन्यांची वर्गणी व्ही० पी० सुद्धां फक्त ४१२ आणे.

संपादक

कृ० क० चौधरी

करजगांव ( उमरावती )

नो० नं० ४८१

### वऱ्हाडांतील.

( प्रसिद्ध देवतांचे व संतांचे फोटो )

श्री बाला साहेब देउळगांव राजा व वाशिम
श्री दत्तात्रय गाणगापूर
श्री अंबाबाई उमरावती
श्री द्वारकानाथ द्वारका व बेट
श्री रंगनाथ महाराज ( जालना )
श्री हरीहर महाराज देवली
श्री गजानन महाराज शेगांव
श्री वासुदेवानंद उर्फ टेंभे स्वामी
श्री शिवणेकर आबा साहेब
श्री गुलाबराव महाराज उमरावती
श्री नारायण महाराज केडगांवकर
श्री डेबोजी बोवा
श्री उदासी महाराज चिखली
श्री धोत्रेकर महाराज
श्री भगवान—उंब्रज (सातारा)

या शिवाय लो. टिळक व इतर देशभक्तांचे फोटो— वरील सर्व फोटो क्याबिनेट साइजचे असून किंमत प्रत्येकी १० आणे पडेल पो० ख० निराळा फोटो एन लार्जमेन्टस् १२-१० फक्त सात रुपये.

जी० डब्ल्यु० शिंदे रे

फोटो आर्टीस्ट अकोला वऱ्हाड

नो० नं० ४८२

## ५०० फोटो १ रु. ता!

निरनिराळ्या साधु— संतांचे, नांव गांवासह व पाहतांच ओळख पटण्या इतके हुबेहुब ३०० फोटोंचे; सुंदर दहा चित्रपट! किं० रुपये २॥; १।; व ४१० आणि लोकोत्तर चमत्कार, जगांतील आश्चर्यें, चौऱ्यांशीं आसनें, सुंदर-सुंदर स्त्रिया आणि मनोविकार व प्रेम इ. २०० फोटोंचे सहा चित्रपट! किं० रु० १॥; ४१२ व ४६ ( सोळा चित्रपटांवर ५ हजार वर्षांचें क्यालेंडर बक्षीस! )

श्री० वा० नगरकर, नाशिक

नो० नं० ४७८


विक्री संबंधी

## जाहीरात.

( आकोला प्रांत वऱ्हाड येथील मौल्यवान स्थावर जिनगी संबंधानें विक्री. )

विद्यमान नामदार हायकोर्ट ऑफ जुडिकेचर मुंबई.

ओ. ओ. सी. जे.

दिवाणी दावा नंबर ३१२ सन १९१४

१ जेमशेटजी होरमसजी बिलीमोरीया

पक्षी

२ हरमसजी जमशेटजी बिलीमोरिया

पार्शी

३ मकनजी जगजीवन हिंदू

तीघेही भागीदारीनें मर्चंट्स् व्यापारी व कमिशन एजंटस् म्हणून व्यवहार करणारे असून त्यांच्या पेढीचें नांव जे. एच् बिलीमोरिया आणि को. दुकानचा ठिकाण अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

वादी

विरुद्ध

१ टीकमदास सदाराम

२ फोजमल गरुडचंद

३ रामगोपाळ, बिहारीलाल

सर्वजण हिंदू असून मर्चंट व आडत्ये असून त्यांच्या व्यवहाराची दुकानें विठ्ठलवाडी; मुंबई येथें टीकमदास तेजमल या नावानें आकोला येथें टीकमदास तेजमल या नांवानें, आणि खामगांव येथें श्रीराम रामगोपाळ या नांवानें आणि या शिवाय इतर ठिकाणी निरनिराळ्या भिन्न नांवांखालीं.

प्रतिवादी

वरील दाव्यांतील वादींनी दिलेल्या अधिकारान्वयें खालीं सही करणार यांजकडून शनीवार ता० २२ डिसेंबर १९१७ रोजीं १ प्रहरीं ४॥ वाजतां ( स्टँडर्ड टाइम ) मुंबई येथील मेडो स्ट्रीट मधील नंबर ९२ येथें असलेल्या लिलावाच्या कचेरीमध्यें लिलाव करण्यांत येईल.

वऱ्हाडांतील आकोला तहसिलींतील आकोला येथील मौजे ताजनापेठ येथें असलेला बंगला, आॅट हौसेस इत्यादि मौल्यवान पुढें वर्णन केलेल्या स्थावर जिनगींत वादीचा व प्रतिवादींचा जो हक्क, मालकी व हितसंबंध असेल तो विकावयाचा आहे. नामदार हायकोर्ट ऑफ जुडिकेचर मुंबई यांनी तारीख १ आक्टोबर १९१४ रोजीं वरील दाव्यात जो कॅसेंट हुकूमनामा दिला आहे त्यांत दिलेल्या अधिकारान्वयें वादी ही विक्री घडवून आणीत आहेत.

### विक्रीच्या जिनगींचे वर्णन.

मौजे ताजनापूर ता० आकोला जि० आकोला येथें जी जमीन किंवा जमिनीचा भाग हा सर्वे नं. ९ चा असून अदमासें २८३१ क्षेत्रफळ आहे. त्यावर असलेला बंगला, इतर इमारती व इतर उभे असलेले इमले यासुद्धां याची चतुःसिमा येणेंप्रमाणें.—

पूर्वेस किंवा पूर्व भागाला—सार्वजनीक रस्ता

पश्चिम किंवा पश्चिमेच्या भागाला मोर्णा—नदी

दक्षिणेस किंवा दक्षिणेच्या भागाला—नार्थ कोट जीनींग फॅक्टरी.

उत्तरेस किंवा उत्तरेच्या भागाला—सरकारी जमीन व मोर्णा नदीला जाण्याचा रस्ता.

विक्री संबंधानें आणखी जास्ती माहिती व शर्ती ज्यांस पाहिजे असतील त्यांनी खालीं सही करणार यांच्या आफीस रूम्स नंबर ९१ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई येथे किंवा वादी तर्फेचे अटर्नी मेसर्स क्रॉफ अँड दिनशा यांच्याकडे त्यांच्या ऑफिसांत नं. ३७९ हार्नबीरोड, फोर्ट, मुंबई येथे चौकशी करावी.

मुंबई ता. ६-१२-१७ } गांधी अँड को लिलाव करणार

नो. न. ४९०

### नोटीस.

नोटीस बेशमी केशव रावजी नानोटी ब्राह्मण रा० कसबे कुरणखेड ता० आकोला जि० मजकूर यांस:—

खालीं सह्या करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं आम्ही सर्वत्र गांवकरी लोक मिळून श्री सिद्धेश्वर महादेवाच्या कंपाउन्डच्या भिंती बांधावयाच्या आहेत तरी या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुमचे जवळ वरील संस्थेचे मुद्दल रुपये सातशे व आज तारखे पावेतो व्याज मिळून जी रकम असेल ती एकंदर व्याज व मुद्दल मिळून १९ दिवसाचे आमचे जवळ दावे म्हणजे आम्ही वरील कामास सुरवात करूं करितां वरील रुपये व्याजा मुद्दलासनेत वरील मुदतींत न दिल्यास तुमचे वर दावा करणें भाग पडेल व नोटीतीचे खर्चापासून अखेर निकाला पावेतो जो खर्च लागेल तो तुम्हास देणें भाग पडेल कळावें ता० २६-११-१७ इ.

सह्या

१ आपाजी सिताराम देशपांडे
१ बळीराम खुशालजी दे. दं. खुद
१ गोपाल बालकृष्ण सिंगणापूरकर
१ बाजीराव बलवंतराव दे.
१ सुंदर भगवंत पटवारी
१ रामकृष्ण यशवंत देशपांडे द. खुद
१ व्यंकटराव विठोबा देशमुख द. खुद
१ कृष्णाजी राणोजी देशमुख द. खुद
1 V. M. Deshpande
1 B. B. Pande
१ अमरसिंग मारुतीराव देशमुख द. ख.

नों. नं. ४९१

### नोटीस

नोटिस बेशमी बाळाराम धनुशेट मारवाडी रा. बोरजवळ ता. खामगांव जि. बुलढाणें यांस:—

मी खालीं सही करणार या नोटिशीनें कळवितो कीं, तुम्ही मजला ता. २९।११।१७ इसवी रोजीं पिंपळगांवराजा येथें नेऊन मजजवळून मौजे बोरजवळ येथील सर्वे नंबर एकर १४ गुंठे आकार रुपये १६ आजमासे ताळाचे शेत नामें मळा आंब्याचे झाडासह विश्वास घातानें दिड रुपया शेकड्याप्रमाणें व्याज देत जा असें म्हणून बाराशे रुपयाचे खरेदीखत लिहून घेऊन नोंदून घेतलें. त्यांत भरणा अता दिला आहे कीं, झांगोराव रामभाऊ देशमुख वाडीकर यांचे गहाणाबद्दल रुपये ६७५ सहाशे पंचाहत्तर व तुझे स्वतःचे खात्याबद्दल व चिल्लर लोकांचे देण्याबद्दल ३२५ तीनशे पंचवीस व वि. स. र. समक्ष रुपये २०० एकुण बाराशाचे भरण्यांत खरेदीखत करून घेतलें. व लागलीच भालेगांवचे यात्रेस जाऊं असें म्हणून तावडतोब माझे जवळचे दोनशे रुपये परत घेतले. वरून या नोटिशीनें तुम्हला कळविण्यांत येते कीं, तूं लिहून घेतलेले सावकारांचे कर्ज व गहाणाचे कर्ज देऊं नये. कारण तुझे खरेदीखत लिहून नोंदून घेतलें ते पोकळ आहे. त्यांत मजला भरणा मुळींच मिळाला नाहीं. ज्येव्हां तूं मजला पिंपळगांवास नेले होते त्यावेळेस मी दारू प्यालेला असून त्वां माझे निशेत असा दगलबाजपणा केलास. हल्लीं माझा मळा चार हजार रुपये किंमतीचा आहे, करितां या नोटिशीनें तुम्हला कळविण्यांत येते कीं मझे मळयाचे करून घेतलेले खरेदीखत या नोटिशी वरून रद्द असे. मात्र त्वां खरेदीखतास लावलेला खर्च जो योग्य रितीचा झाला असेल तो घ्यावा. क ता. ४-१२-१७

सही

भिकु मारोती माळी दस्तुर खुद

नो. नं. ४९२

# अमृतबहार.

(२०० रोगांवर चालणारी एकच औषधी)

ही हजारो लोकांनीं अनुभवलेली आहे. सदर्हू औषध घरांत असल्यास कोणत्या ही प्रकारें इतर औषधाची जरूर पडत नाहीं. खरूज, गजकर्ण, खोकला, ताप, महामारी, प्लेग, गरमी, परमा, डोकेंदुखणें, पोटदुखणें, दाढदुखणें, वगैरे वर मूल्य १ बाटलीस रुपये २ ट. ख. निराळा. जागोजागीं एजंट पाहिजेत.

पत्ता

भाई रामसिंग ॲन्ड सन्स मॅनेजर
अमृत बहार कंपनी सुजाबाद
जिल्हा मुलतान ( पंजाब )

नो. नं. ४८१


## वीरशैव धर्माभिमान्यांस जाहिर नोटीस

कसबे फत्तेखेर्डा तालुके मेहकर जिल्हे बुरडाणे या गांवीं विरशैव धर्माचे ह्मणजे श्रीपलसिद्ध स्वामीचें मुख्य संस्थान आहे. ह्या गादीवर हल्लीं पूर्व आश्रमीचे नांव तुळसीराम उर्फ गंगाधर स्वामी हे आहेत. ते अज्ञान अवस्थेंत असतांना त्यांचेजवळ त्यांची आई, भाऊ, भावजय, मामा, मामी वगैरे आप्तमंडळी हमेशा रहात असल्या-कारणानें ते मोहपाशांत जास्त लुब्ध होऊन सिद्धाचे पूर्वापार चालत आलेले नियम आणि धर्म सर्व मोडले गेले व संसार पाशांत महाराज गुंग झाले. त्यामुळें मठाची जिकडे तिकडे अपकीर्ती पसरली व संस्थानची स्थावर व जंगम इस्टेट बरीच आपले भाऊ मामा यांना दिली. ह्मणून गेल्या श्रावणमासीं पंचमंडळी जमून महाराजास ज्ञानासंबंधीं व मठाचे व्यवस्थे-संबंधीं उपदेश करावा ह्मणून महाराजास सभेस येण्याबद्दल पंच मंडळीनीं विनंती केली परंतु ते सभेंत न येतां एका गैरचालीचे मनुष्याबरोबर संस्थानांतून निघून एकदम गांवांत एका तेल्याचे घरीं जाऊन राहिले. कारण सभेंत त्यांनीं केलेला अत्याचार व त्यांचें दुर्वर्तन निघेल ह्मणूनच ते पंचास धोका देऊन सभेंत आले नाहीं. यामुळें आह्मी निराश होऊन आपले पवीत्र धर्माच्या स्थानाची कांहींतरी व्यवस्था लागावी ह्मणून वऱ्हाड खानदेश मुंबई इलाख्यांतील वीरशैव धर्म अभिमानी लोकांनीं ता० २३-११-१७ इसवी रोजीं श्रीपलसिद्धाचे मठांत फत्तेखेर्डा येथें जमून एक सभा करावी व मठाची पूर्वीप्रमाणें व्यवस्था लागावी ह्मणून वऱ्हाड समाचार ता० १२-११-१७ रोजीं जाहिरात प्रसिद्ध केली होती.

दरम्यान महाराजानीं अकोल्याकडे कोणी एक इसम पाठवून अकोला, अकोट, बाळापूर, पारस, आडगांव, वगैरे लोकांकडून ता. १४-११-१७ रोजीं एक जाहिरपत्र काढून ता० २३-११-१७ रोजीं आमचे सभेस येणें होत नाहीं व तुह्मी केलेला ठराव आह्मी कबूल करणार नाहीं अशा अर्थाचे हस्तपत्रक गांवांत महाराजानीं वाटलेले आह्मी पाहिलें.

हल्लींचे महाराजांनीं संस्थानचा कोणतच बोज कायम ठेवला नाहीं. कारण थोडे दिवसापूर्वीं एका गैरचालीचे मनुष्याचे हातून कारभारी याजवर फौजदारी खोटी फिर्याद करून त्या करतां स्वतः एखाद्या भणंगा-प्रमाणें तालुके मेहेकर येथें घरोघर फिरून संस्थानचे अंदाजा दिड हजार रुपये खर्च केले व फौजदारी फिर्याद खोटी ठरली. या प्रमाणें महाराज संस्थानचा बोज व पैसा नित्य खर्च करीत आहेत. दुसरे महाराजांनीं वीस रुपये पगाराचे मुसलमान शिपाई सात ७ व माळी इतर ५ एकूण बारा मनुष्यें मठात ठेवलीं होतीं त्याचें कारण हें चकीं कारभारी व मठांत वहिलेली मंडळी याजला दंगा करून मठांतून बाहेर काढून देऊन आपले भाऊ भावजय व आप्त मंडळी यांना मठांत आणून ठेवावें. हें एकंदर कृत्य पंच मंडळीनीं समक्ष पाहिलें आहे. अशा स्थितींत व्यवस्थेबद्दलची सभा कांबविंगे ह्मणजे कोणत्या ही प्रकारें संस्थानचे भयंकर नुकसान होणार आहे ह्मणून आह्मी आज रोजीं जमलेली पंच मंडळी खालील प्रमाणें सर्वानुमतें ठराव करतो तो येणें प्रमाणें—

### ठराव

फत्तेखेर्डा येथें मठाचे गादीवर असलेले पूर्व आश्रमीचे नांव तुळसीराम उर्फ गंगाधर स्वामी हे गादीचे लायक नाहींत या करतां त्यास कोणते ही वीरशैव धर्म अभिमानी लोकांनीं मानसन्मान दक्षणा वगैरे देऊं नये व व्यवहार कोणीं करूं नये. व्यवहार केल्यास त्याचे जबाबदार संस्थान रहाणार नाहीं व ज्याप्रमाणें मठांतील इतर मंडळी आहे त्याप्रमाणे त्यांची योग्यता मानावी.

काशीवरून आलेला एक विरुपाक्ष नांवाचा शास्त्री आज अंदाज सहा महिन्यापसून महाराजांनीं मठांत ठेवला होता. हा गैरचालीचा असल्यामुळें यांनीं एक वाणी बरोबर आणला होता त्या वाण्यानीं परजातीचे हातचें अन्न खाल्लें व त्याचेसी वाहिवाट यांनीं केला व अशी बरीच कामें त्यांनीं केली या करतां असा भ्रष्ट मनुष्य श्रीपलसिद्धाचे मठांत नसावा ह्मणून आज रोजीं जमलेल्या पंच मंडळी यांनीं शास्त्री याला मठांतून काढून दिलें करतां याला पुन्हा मठांत ठेऊं नये. ता. २५-११-१७

सह्या पंचाच्या.

१ महादलींग सदाशिव आपा जानेफळ द.खु.
२ गणाया महादलींग आपा शिरपूर द. खुद
३ सदाशिव आपा देवलींग आपा खेर्डा द खु.
४ बावलींग बेलाया मेहकर द. खु
५ पुंजापा सदाशिव आपा वरवंड द० खु०
६ शिवापा कडतापा जानेफळ द० खु०
७ रामापा शंकरआपा देऊळगांव माळी द. खु
८ तुकाराम येलापा मेरे बु. द० खु०
९ नागापा आपासेट देऊळगांव माळी द. खु
१० शंकर परशराम आपा नागझरी द० खु०
११ कोंडापा ईरापा महारखेड द० खु०
१२ लहानापा हरीआपा द० बा. मे०
१३ नागापा दगडापा डोनगांव द० बा० मे.
१४ बाळपा हरीआपा खेर्डा द० बु० मे०
१५ लक्षुमण ईश्वरआपा जानेफळ द० खु०
१६ बाळापा सदाशिवआपा जानफेळ द. बा मे
१७ विठोबा आपा गोविंदा आपा महारखेड द खु
१८ शिवराम यसापा कसारखेड द. त्री.मा.
१९ रामापा नानापा अमडापूर द० स० खे०
२० पांडपा रामापा महारखेड द० खु०
२१ पत्रापा इरापा अमडापूर द० खु०
२२ दगडापा नानापा जानेफळ द० खु०
२३ गोपाळ शंकर आपा खेर्डा द० खु०
२४ सखाराम तुकाराम मेहकर द. खु.
२५ नारायण आपा शंकर आपा खेर्डा द. खु.
२६ हरी आपा गोविंदा आपा द. खु
२७ कोंडपा विठोबा आपा मव्हने द. खु.

नो. नं. ४८०

## नोटीशीचें उत्तर

सौ. बायना मर्द नेमाजी जैन वाणी रा. आकोला शहरांत पोलीस चावडी जवळ कापशी रस्त्यावर

इसः—

खालीं सही करणार यांजकडून या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तूं तारीख १-११-१९१७ रोजीं दिलेली नोटीस अजिबात खोटी आहे मी तुजला आज चार पांच वर्षांपासून प्रत्येक वर्षांत ४-५ वेळ नेण्यांस आलो असतां तुझा मामा गुलाब हा मजपाशी फुकटांत फारकती मागतो व नांदण्यास माफ पाठवित नाहीं ह्मणतो. मी जातीचे बाहेर आहे हें तुझे ह्मणणे खोटे असून विनाकारण माझी तूं बेअब्रू केली जर मी जातीबाहेर असेल तर तूं मजला पंचांचा लेख आणून दे मी तुझी खावटी वगैरे कांहीं देत नाहीं. तूं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत माझे घरी नांदण्यांस येणार नाहीं तर मी तुजला सरकारमार्फत ताब्यांत घेईन ही नोटीस दिली. कळावे आकोला ता० ३०-११-१९१७ इ.

सही

नेमाजी वा० विठोबा जैन रा,
मौजे डोंगरगांव पोष्ट धनज
बु० ता. मुर्तिजापूर

नो. नं. ४८२

## नोटीस.

रा० देवमण पुंजाजी कुणबी रा० मक्रमपूर ता० आकोट

यांसः—

खालीं सही करणार याचेकडून कळविण्यांत येते कीं आमचे वडील पुंजाजी यांचे लोकांकडून जे घेणें आहेत ते अंदाजा ४००० रुपये आहे. त्याचे दस्तैवज वडील मयत जाहले त्या वेळीं तुमचेच जवळ राहिले त्यानंतर तुह्मी माझे सल्याशिवाय लोकांकडून अंदाजें ५०० रुपये वसूल केले आहेत व बाकीचे वसूल करण्याचे विचारांत आहांत. सदरहु देण्याघेण्याचा मालक मी एकटाच असलेमुळें तुह्मास वसूल करण्याचा अधिकार नाहीं. तुह्मी जीवंत असेपर्यंत फक्त अन्नवस्त्राचे मालक आहांत स्थावर व जंगम इस्टेट मालकीची आहे. तुमचा अधिकार पोहचत नाहीं. तरी नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचें आंत वसूल केलेले रुपये व बाकी राहिलेले सर्व दस्तैवज आणून देऊन रीतशीर माझी पावती घ्यावी. न दिल्यास रीतशीर कोर्टमार्फत वसुल करून दस्तैवज ताब्यांत घ्यावे लागतील. नोटिशीचा खर्च तुमचेवर आहे. द. के. वी. ताम्हणकर पी. रा. अकोला सही ता० ३-१२-१७

सही

१ सही सदाशिव वा० पुंजाजी सोनेने राहाणार मक्रमपूर द. खु.

नो० नं० ४८३

## जाहिर नोटीस

नोटीस बनाम लिंगापा त्रिंबक आपा वाणी रा० बोरी खुर्द प्र० अनसिंग ता० पुसद जिल्हा यवतमाळ

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, ता. १४ माहे जुलै सन १९१६ इ. रोजीं तुमचे नांव मुखत्यारपत्रांत घातले होते. तरी ता. ११।१०।१७ इ. पासून मुखत्यारपत्रांतून तुमचे नांव रद्द केले आहे. तरी तुह्मी आमचे दुकान संबंधीं कोणते हीं काम करूं नये. या नोटिशीनें तुह्मास कळविले आहे. ता. २९-११-१७

सही

नि. गोधाजीराव सखाराम अ. पा
क. सरुबाई जवजे सखाराम मुखरे
दुकान बोरी खुर्द इचीं
बांगडी असे द. विष्णु वामन
पुसदकर

नो. नं. ४८४

## नोटीस

रा. कृष्णाजी वा० पुर्णाजी शिंदे माळी राहणार लांजुळ

यांसः—

खालीं सही करणार इचे कडून कळविण्यांत येते कीं माझा नवरा संपत मयत होण्यास अंदाज ३ वर्षें जाहली. त्यानंतर तुह्मी त्याची असलेली स्थावर इस्टेट माझे ताब्यांत दिली. परंतु जंगम माल ज्वारी २ खंडी, बैलाची जोडी १, ह्मैस १ गाड १ दमणी १ व तीन सालचे स्वामित्वाचें रुपये ३७५ असे आणून दिले नाहींत व अंगावरील सोन्याचांदीचें डागिने अं. किं. रु. २११ चे व सोन्याची मुदीएक २॥ तोळ्याची असा जंगम माल माझे मालकीचा तुमचेपाशी आहे. तो माल नोटीस पावल्यापासून ४ दिवसाचे आंत आणून देऊन माझी पावती घेणें. याप्रमाणें न केल्यास रीतशीर कोर्ट मार्फत फिर्याद करून तजवीज करावी लागेल. नोटिशीचा खर्च तुमचेवर आहे. कळावे ता. २८।११।१७ इ०

सही

मोकी मर्द संपत माळी राहणार लांजुड नि० डावे हातचा आंगठा

नो० नं० ४८५

## जाहिरात

वऱ्हाडप्रांत, वर्धा व नेमाड जिल्ह्याचे शेतकीचे वार्षीक संमेलन व प्रदर्शन 'Our Day" (आवर डे) चे प्रदर्शन ज्या ठिकाणीं होणार आहे. त्याच ठिकाणीं भरविलें जाणार आहे. शेतकीचें प्रदर्शन ता. १२ ते १६ दिसेंबर सन १९१७ पावेतो उघडे राहील. तें मोफत पाहण्यास सर्वांस मोकळीक आहे. ता. १६ दिसेंबर सन १९१७ रोजीं शेतकीचे वार्षीक संमेलन भरेल त्यांसही सर्वत्रास येण्यास मोकळीक आहे. कळावें. ता. ६ नोव्हेंबर सन १९१७

सही

D. R. Dongere
For Deputy Commissioner

## विनंती.

नोटिस बेशमी कुकाबाई जवजे तुकाराम कडाळे राहणार जानोरी ता. खामगांव जि. बुलठाणा

इजप्रती:—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, माझा चुलता नामें तुकाराम कृष्णाजी कडाळे हा मयत झाला असून त्याला संतान नसल्यामुळें मी त्याचा सखा पुतण्या ह्मणून त्याचे मागें मी त्याचे जिनगीचा वारस हकदार आहे.

तूं त्याची पत्नी असून हल्लीं विधवा आहेस, सबब कायद्याप्रमाणें तुझा फक्त खाण्यापिण्याचा अधिकार असून वरील स्थावर व जंगम जिनगी विकण्याचा किंवा गहाण, खरेदी, आणि बक्षीस, वगैरे देण्याचा तुला मुळींच अधिकार नाहीं.

जिनगीचा तपशील:—

१ जानोरी येथील शेत सर्वे नंबर १९ पोट हिस्सा नंबर १ सबंध एकर १० ८१० गुंठे

२ शेगांव येथील शेत सर्वे नंबर ९८८ पोट हिस्सा नंबर ३ सबंध एकर ४ गुंठे २०

३ जानोरी येथील गुरांचा कोठा टीनचा तीन धारणी पुढें आंगण असलेला.

४ राहते भाबे खांब नऊ पुढें ढेलुजी ओसरी व पुढें आंगण.

येणें प्रमाणें जिनगी असून तिचे माथे कोणते ही प्रकारचे कर्ज नाहीं उलट अंदाज ५०० रुपये लोकांस कर्जाऊ दिलेले आहेत. या शिवाय घरांतील जंगम जिनगी व डागिना वगैरे वेगळाव आहे.

तूं हल्लीं लबाड लोकांच्या नादीं लागून जिनगीचा अफरातफर करण्याचा तुझा विचार दिसतो आहे. सबब तुला या नोटिशीनें जाहीर करितों कीं, सदहू स्थावर व जंगम तूं कोणास विकूं नये किंवा गहाण खरेदी अगर बक्षीस वगैरे देऊं नयेस व सदहू जिनगी माथें कर्ज काढूं नये. तसें करण्यास तुला कायद्यानें माझी मनाई आहे. असें करण्यास तूं चुकलीस तर तुला व तुझ्याशीं व्यवहार करणाराला जबाबदार धरलें जाईल आणि कायद्याप्रमाणें कोर्ट मार्फत तजवीज केली जाईल. मग तुझी कोणती ही तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें. ता. २-१२-१९१७ इ.

सही

बळिराम नारायण कडाळे र. जानोरी
ता. खामगांव जि बुलठाणे द. ख.

नो. नं. ४८६

## जाहीर नोटीस

खालीं सही करणार यांजकडून सर्वत्र लोकांस या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, माझा चुलता तुकाराम कृष्णाजी कडाळे हा मयत झाला असून त्याला संतान नसल्यामुळें मी त्याचा सख्खा पुतण्या ह्मणून त्याचे मागें मी त्याचे जिनगीचा वारस हकदार आहे. त्याची पत्नी कुकाबाई कडाळे रा जानोरी ता. खामगांव ही हयात असून विधवा आहे, सबब कायद्याप्रमाणें तिला वरील स्थावर व जंगम जिनगी विकण्याचा किंवा गहाण, खरेदी, आणि बक्षीस वगैरे देण्याचा मुळींच अधिकार नसतां ती लबाड लोकांच्या नादी लागून जिनगीचा अफरातफर करण्याचा तिचा विचार दिसतो आहे. तरी तिच्यशीं कोणी ही आमची संमती घेतल्या वांचून व्यवहार करून फसूं नये. व व्यवहार केल्यास तो बातल समजला जाईल. ह्मणून मुद्दाम खबर दिली आहे कळावें. ता. २।१२।१९१७ इ.

सही

बळिराम नारायण कडाळे रा. जानोरी
ता. खामगांव जि. बुलठाणे द. खु.

नो. नं. ४८७

## नोटीस

रा चिनकाजी वा उकर्डा माळी राहणार जळम यांतः—

खालीं सही करणार इचेकडून कळविण्यांत येते कीं, मी तुमची गंधर्वाची बायको आहे. गंधर्व होण्यास ८ वर्षें जाहली. गंधर्व जाहल्यानंतर तुह्मी मला १ वर्ष पर्यंत चांगल्या रीतीनें बागविलें. माझी पहिल्या घरची असलेली दोन मुलें यांचे लग्न करून देतो अशी थाप दिल्यामुळें मी त्याचीं सर्व इस्टेट तुमचे घरीं घेऊन आले. परंतु तुमचे बेपर्वाइचे वर्तन पाहिल्यामुळें तुह्मा आह्मांत नेहमीं भांडण होऊं लागलें. त्यावरून तुह्मी मला घराबाहेर हाकलून दिले मी गेल्या सात वर्षापासून लोकांचे कर्ज काढून उदरनिर्वाह करीत आहे. मला लोकांचे कर्ज ५०० रुपये जाहले आहे ते देऊन माझी अन्नवस्त्राची तजवीज करावी व माझे पहिले घरचे मुलाची आणलेली जिनगी अ. किंमत ५०० ची आणून देऊन पावती घ्यावी. याप्रमाणे ४ चार दिवसांत न केल्यास तुमचेवर फौजदारी काढून पोटगी द्यावी लागेल. ही नोटीस दिली तारीख २८-११-१७ द. के. गो. ताम्हणकर पी. रा. आकोला

सही

१ भिमी मर्द चिनकाजी माळी
रा. लांजुळ इचे हातचा आंगठा

नो. नं. ४८८

## जाहीरखबर

मोजे दाबकी त० अकोला येथें माझा चार जीनचा कारखाना आहे. तो मला विकावयाचा आहे. ज्यास घ्यावयाचा असेल यानें खाली लिहिलेल्या पत्त्यावर भेटावे. कळावें ता० २२।११।१७

सही

वासुदेव देवगाव
C/o श्रीगणेश कंपनी
राममंदिर जवळ अकोला

नो. नं. ४८९

वऱ्हाडसमाचार

कार्तिक वद्य ११ पिंगल संवत्सर १८३९

## हिंदुस्थानांतील उद्योगधंदे.

औद्योगिक कमिशनच्या मुंबईतल्या बैठकींत अनेक महत्त्वाच्या व बोधप्रद गोष्टी साक्षीदारांच्या जबान्यांतून बाहेर पडल्या आहेत व आमचे कारखानेवाले व सरकार यांचें लक्ष तिकडे जाईल व हल्लींच्या स्थितींत सुधारणा करण्याचें ते मनावर घेतील तर आपल्या औद्योगिक उन्नतीचा पाया भक्कम घातला जाईल यांत शंका नाहीं. या प्रत्येकी जबानीचा सारांश आमच्या सारख्या छोट्याशा साप्ताहिकांत देणें अशक्य आहे, तथापि कांहीं ठळक जबान्यांचा निष्कर्ष सूत्ररूपानें दिला तरी त्यापासून सुद्धां जिज्ञासूना खात्रीनें फायदा होईल, ह्मणून असा निष्कर्ष काढून तो वाचकांपुढें आज आह्मी मांडीत आहों.

कमिशनपुढें ब्यांका, कातडीं कमावणें, कांच कारखाना, आगपेट्यांचा कारखाना, हातमाग, सरकीचे तेलाचा कारखाना, व्यापारी शिक्षणाचें कॉलेज, मजूर वगैरे लोकांसाठीं सोयींचीं व स्वस्त भाड्यांचीं घरें, इ. अनेक प्रश्नांवर त्या त्या विषयांत निष्णात अशा गृहस्थांच्या साक्षी झाल्या, व एका साक्षीचे वेळीं तर साक्षीदाराच्या जबानींत अधिकारी वर्गाला कडू लागणाऱ्या गोष्टी सप्रमाण बाहेर पडल्या. मि. करीमभाई आदमजी पीरभाई हे मुंबईचे एक फार मोठे कोट्याधिश व्यापारी आहेत. त्यांची अशी तक्रार आहे कीं हिंदुस्थान सरकार देशी कारखान्यांकडून माल विकत घेऊन त्यांस उत्तेजन देण्याविषयीं उत्सुक आहे यांत शंका नाहीं, पण मधले कित्येक अधिकारी युरोपियन कारखानदारांशीं लांबच्या मुदतीचा करार करून त्यांच्याकडूनच सगळा माल घेतात, व हिंदी कारखानदारांकडून शपथेला मोकळे होण्याइतका थोडा माल घेतात. युरोपियन कारखान्यांविषयींचा हा त्यांचा पक्षपात देशी कारखान्यांना फार घातुक होतो. मि. करीमभाई यांनीं स्वतःच्या कारखान्याचा हा अनुभव सांगितला, व कमिशनचे अध्यक्ष सर टॉमस हालंड यांनीं हा त्यांचा अनुभव पड्द्या आड सांगण्याविषयीं सुचविलें असतांही त्यांनीं ती सूचना अमान्य करून जाहीर रीतीनें तो सांगण्याचा आग्रह धरला, यावरून आपल्या विधानांच्या समर्थनार्थ त्यांच्याजवळ भक्कम पुरावा असला पाहिजे असें अनुमान करतां येतें. पण हा विषय सरकारी अधिकारी व मि. करीमभाई यांच्या मध्येंच तूर्त सोडून देऊन आपण बाकीच्या जबान्यांकडे वळूं.

सर्व साक्षीदारांच्या जबान्यांतून एक गोष्ट ठळकपणानें बाहेर पडली. ती ही कीं हिंदी कामकरी वर्ग हा कष्टाळु व बुद्धिमान् आहे; पण शिक्षणाच्या अभावीं त्याच्या अंगच्या गुणांचें तेज पडत नाहीं व कारखानदाराचा फायदा होत नाहीं. ज्याच्या जिवावर कारखान्याचें सगळें जीवित अवलंबून असते, व ज्याच्या अल्पसंतुष्टतेमुळें कापडाच्या गिरणीवाल्यांना आज लक्षावधि रुपयांचा फायदा करून घेतां येत आहे, त्यांनीं मजुरांच्या आरोग्याविषयीं बेफिकीर राहावें ही अत्यंत शोचनीय गोष्ट ह्मटली पाहिजे. कायद्याच्या दृष्टीनें तो अपराध नसला तरी नीतिशास्त्राच्या दृष्टीनें त्याची गणना पातकांत करतां येईल. यासाठीं कारखानदारांनीं आपल्या कारखान्यांतल्या मजुरांपुरत्या चांगल्या स्वच्छ व आरोग्यकारक चाळी बांधून त्या स्वल्प भाड्यानें मजुरांना द्याव्या, व शक्य असल्यास त्यांच्या शिक्षणासाठीं रात्रीच्या शाळा काढाव्या.

ब्यांकांची संस्था आपले देशांत नवी आहे. पूर्वीच्या काळीं सावकारी पद्धति असे. या सावकारी पद्धतीनें आतांच्या परिस्थितींत निभाव लागणार नाहीं. आपले देशांत प्रेसिडेन्सी ब्यांका, परदेशी व्यापारी ब्यांका व स्थानिक ब्यांका अशा तीन प्रकारच्या ब्यांका हल्लीं आहेत. पैकीं प्रेसिडेन्सी ब्यांकेंत सरकारचा बराचसा पैसा गुंतलेला असतो, तथापि आमच्या देशी कारखानदारांना या ब्यांकाकडून कर्ज मिळण्यास फार त्रास पडतो अशी तक्रार आहे. परदेशी व्यापारी ब्यांका या बोलून चालून परदेशी व्यापाराच्या वृद्धीसाठींच निघालेल्या असल्यामुळें त्यांचा उपयोग आह्मां लोकांना मुळींच होत नाहीं; आणि स्थानिक ब्यांकांचा व्याप ही अल्प असल्यामुळें कारखान्याला लांबच्या मुदतीनें लागणारें कर्ज देण्यास त्या असमर्थ असतात. ह्मणजे एकंदरींत या ब्यांकांचा आमच्या औद्योगिक उन्नतीस कांहींच उपयोग होत नाहीं. ही अडचण दूर करावी ह्मणून आज कित्येक दिवसापासून पाश्चात्य राष्ट्रांतल्या धर्तीवर येथें औद्योगिक ब्यांका काढण्याच्या सूचना होत आहेत. पण या सूचनांना मूर्त स्वरूप देण्याचें श्रेय सर दोराबजी टाटा यांच्या सारख्या धाडशी, व व्यवहार चतुर, औद्योगिक उन्नतीचे धुरंधरांनीं पटकाविलें आहे. मोठाल्या कारखान्यांना पैशाचा वाण सहसा पडत नाहीं. कर्ज काढण्याची वेळ बहुतेक लहानसान कारखान्यांनाच येते. अशा कारखान्यांत इतर सगळ्या गोष्टी असाव्या तशा चांगल्या असल्या तरी केवळ द्रव्याच्या अभावीं ते बुडतात. अशा कारखान्यांना बुडूं न देणें हें काम औद्योगिक ब्यांकांना करतां येईल. लहान कारखान्यांना कर्ज देण्यांत ही मोठी जोखीम आहे. कारण आमच्या इकडे असे पुष्कळ कारखाने आहेत कीं जे ते काढण्यापूर्वीं त्यांच्या उत्पादकांनीं अवश्य ती माहिती न मिळवितां व तज्ज्ञांचे अभिप्राय न घेतां आली लहर आणि काढला कारखाना अशा रीतीनें काढले व पुढें ही त्यावर देखरेख ठेवण्याचें काम तज्ज्ञांकडे न दिल्यामुळें ते कारखाने डबघाईला आले किंवा बुडाले. वऱ्हाडचा आगपेट्यांचा कारखाना हा अशांपैकीं एक आहे ही गोष्ट कमिशनच्या मेंबरांनीं सदर कारखान्याच्या म्यानेजिंग डायरेक्टराच्या उलट तपासणींत स्पष्टपणें बाहेर आणली. नवीन कारखाने

काढूं इच्छिणारांनीं कऱ्हाडच्या या कारखान्याच्या इतिहासापासून पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे.

काच कारखान्यासंबंधाच्या जबानींत एक गोष्ट स्पष्ट करण्यांत आली. ती ही कीं सरकारनें रेल्वेचे दर कमी करणें अत्यंत अवश्य आहे. मुंबई इलाख्यांत सर्पणाची विपुलता नसल्यामुळें तळेगांवच्या काचकारखान्याला बंगाल प्रांतांतून कोळसा आणावा लागतो व रेल्वेचे दर भारी असल्यामुळें खर्चाचा शें. ७० इतका भाग नुसत्या रेल्वे भाड्यांतच खर्च होतो. सोडा वगैरे रासायनिक द्रव्यांची हल्लीं महर्घता झाली आहे तरी रेल्वेचे भाड्याचे दर कमी करण्यांत येतील तर कारखान्यांना पुष्कळ साह्य केल्यासारखें होईल. सरकारनें कारखान्यांना प्रत्यक्ष द्रव्यसाह्य करूं नये व कारखानदारांना तें नको ही आहे, कारण त्या द्रव्यसाह्यापासून जी मदत व्हावयाची त्यापेक्षां सरकारच्या अटी व निर्बंध यांचा जाच अधिक असह्य होतो. पण देशी उद्योग धंद्यांना उत्तेजन देण्याची सरकारची इच्छा असली तर रेल्वेचें भाडें कमी केलें तरी तूर्त पुरें आहे.

हातमागावर कापड विणून त्यावर उदरनिर्वाह करणारांची संख्या आपल्या देशांत फार मोठी आहे, आणि वाफेच्या शक्तीनें चालणाऱ्या गिरण्यांनीं त्यांच्या पोटावर पाय आणून त्यांची दुर्दशा करून सोडली आहे तरी हातमागांचा धंदा अद्याप कसाबसा टिकाव धरून राहिला आहे हा धंदा हिंदुस्थानांतून अजीबात नष्ट होईल कीं काय या विषयीं मतभेद आहे; तथापि तो नष्ट व्हावयाचाच असला तरी तो विनाशकाल लांबणीवर टाकणें शक्य असेल तर त्याची तजवीज करणें हें सरकारचें व लोकांचें ही कर्तव्य आहे. या संबंधांत कमिशनपुढें मि. पामफ्रेट यांची जी जबानी झाली तींत पुढील उपाय सुचविण्यांत आले-- (१) विणकरी लोकांनीं हिशेब ठिकठिक ठेवणें, आपल्या धंद्यासंबंधानें चाललेल्या सुधारणांची माहिती मिळविणें, व कारखान्याची नीट व्यवस्था ठेवणें, इतक्या गोष्टींपुरतें तरी शिक्षण अवश्य यावें. (२) हातमागावर चांगलें व पुष्कळ काम अल्पश्रमानें निघेल अशा तऱ्हेचे सुधारलेल्या पद्धतींचे माग त्यांना आणून द्यावे व त्यांवर काम करण्याची पद्धति त्यांना दाखवावी. (३) विणकऱ्यांना चित्रकलेचें शिक्षण अवश्य द्यावें. (४) नवीन तऱ्हेचे हातमाग चालविणारी एक मध्यवर्ती संस्था काढून त्यांत विणकऱ्यांना शिकविण्याची तजवीज करावी. (५) लोखंडाचे किंवा शिशाचे हातमाग न आणतां पक्क्या लाकडाचे करावे व ते स्वस्त पडावे म्हणून सरकारनें असें लांकूड या कामासाठीं कांहीं सवलतीनें द्यावें. हल्लीं विणकऱ्यानें लुगडें विणलें म्हणजे तें विकण्यासाठीं त्यालाच बाजारांत जावें लागतें व तें विकलें जाईपर्यंतचा त्याचा वेळ फुकट जातो. यापेक्षां निघणारा माल ताबडतोब विकत घेणारी संयुक्त भांडवलाची एखादी व्यापारी मंडळी निघेल तर हा मधला फुकट जाणारा वेळ त्याला अधिक माल काढण्याकडे लावतां येईल. या विणकरी लोकांचे संघ असावे व संयुक्त भांडवलाच्या मंडळीच्या डायरेक्टरांत विणकऱ्यांच्या संघाचे प्रतिनिधि घेण्यांत यावे.

कित्येक जबान्यांतून महत्वाच्या व विचार करण्यासारख्या दुसऱ्या ही कित्येक सूचना करण्यांत आल्या, पण स्थलाभावामुळें त्यांचा विचार पुढें ढकलणें भाग आहे.

## महायुद्धाची प्रगति.

प्रस्तुतच्या युद्धासंबंधाच्या गेल्या आठवड्यांतल्या ठळक गोष्टी म्हणजे जनरल बिंग यांनीं मिळविलेल्या कांब्रे येथील महान् विजयाचे परिणाम, इटालियन लोकांची चळवळ, व रशियन लोकांनीं तह करण्यासंबंधानें बोलाचालीला केलेली सुरुवात या होत. कांब्रेकडे ब्रिटिशांनीं जें पुढें पाऊल टाकिलें त्यामुळें जर्मन हताश होतील अशी अपेक्षा कोणी केली नव्हतीच. उलट त्यांना निराशेचा आवेश येऊन ते घालविलेलीं ठाणीं परत घेण्यासाठीं ज्यास्त निकरानें लढतील असेंच वाटलें होतें व तें खरें ही ठरलें. ग्यासनिएरवाशीं जर्मनांनीं इतका जोराचा हल्ला केला कीं तेथून इंग्रजांना मागें सरावें लागलें. जर्मनांनीं या ठिकाणीं लागोपाठ दहा हल्ले केले; जर्मन सैन्य इंग्रजांच्या सैन्याच्या तिप्पट मोठें होतें. इंग्रज गोलंदाजांनीं व वैमानिकांनीं या ठिकाणीं मोठी मर्दुमकी केली, व त्यामुळेंच कांब्रेच्या विजयानें संपादलेली सहा मैलांची भूमि अद्याप त्यांना आपल्या हातीं ठेवतां आली. जर्मनीनें कोठें सात डिव्हिजन्स, कोठें पांच डिव्हिजन्स व कोठें तर बारा डिव्हिजन्स या प्रमाणें आणून जागोजाग मजबुती चालविली आहे व हल्ल्यावर हल्ले चालविले आहेत. पण त्यांचा परिणाम रणभूमीची रक्ततृष्णा शमविण्यापलीकडे फारसा झालेला दिसत नाहीं. मुव्हरीच्या जवळ ही जर्मनांनीं निकराचा हल्ला केला होता, पण तो ही व्यर्थ गेला. बुर्लोनेवाशीं ही जर्मनीची अशीच फजीती झाली व बारा मशीनगन्स व बरेचसे लोक इंग्रजांनीं हस्तगत केले.

## जर्मनांची हानि.

गेल्या महिन्यांत जर्मनीचे ग्रह सामान्यतः कसे होते ते हानीच्या पुढील संख्यांवरून दिसून येईल. पश्चिम रणक्षेत्रांत नोवेंबर महिन्यांत इंग्रजांनीं १२८ तोफा व ११५९१ कैदी पकडले; प्यालेस्टाईनमध्यें १०४९४ जर्मन कैदी व ८० तोफा मिळाल्या; पूर्व आफ्रिकेंत ४४०३ जर्मन कैदी धरले गेले व ३ तोफा हातीं लागल्या; मेसोपोटेमिया व सालोनिका यांत अनुक्रमें ४३७ व २४ जर्मन कैद करण्यांत आले.

## इटलीचें रणक्षेत्र.

ब्रेंटा व पियाव्हे येथील लढायांच्या वेळीं अतिशय जबर मेहनत केल्यामुळें जर्मन व आस्ट्रियन सैनिकांना फार शीण आलेला आहे व त्यामुळें युद्धांत कांहीं शिथिलता आलेली आहे. आतांपर्यंतच्या प्रकारावरून येवढी गोष्ट निर्विवाद सिद्ध झाली आहे कीं इटलीला आपण क्षणांत चिरडून टाकूं ही जर्मनीची घमेंड आतां चांगली जिरली आहे. इटलीनें एकेक क्षण मोजला पाहिजे असें जे म्हणत होते तेच आतां इटलीवरचें गंडांतर टळलें असें म्हणत आहेत. इटलीचें सैन्य फार थोडें व तें ही अडचणींत सांपडलें होतें. मित्राष्ट्रांनीं कुमक पाठविली, पण तिचा उपयोग करून घेण्यापूर्वीच इटालियन लोकांनीं स्वतःच्या हिंमतीवर जिवावरचें संकट टाळलें, यावरून त्या लोकांच्या अंगीं अद्याप अप्रकट असलेलें असें बरेंच क्षात्रतेज आहे अशी शत्रूची खात्री झाली असेल. शत्रूचे सैनिक विश्रांति घेत आहेत यावरून नव्या दमानें ते पुनः हल्ला करणार यांत शंका नाहीं. जर्मन तोफखान्याची कुमक येण्याची ते वाट पाहत आहेत व सध्याच्या निरभ्र आकाशानें ही तो आणण्याचे कामीं शत्रूला मदत केलेली आहे. उलट इटालियन लोक लवकर पाऊस पडून नद्यांना यथेच्छ पूर येवोत अशी इंद्राची प्रार्थना करीत आहेत. ती त्यानें ऐकल्यास इटालियनांचें स्वसंरक्षणाचें काम बरेंच हलकें होईल. इटली जवळ अन्न सामुग्रीची वाण नाहीं, तसा निश्चयाच्या बळाचा ही तोटा नाहीं हें दिसून आलेंच आहे. लवकरच पुनः सुरू होणाऱ्या जर्मन-आस्ट्रियन हल्ल्याला तोंड देण्याला त्यांची तयारी आहे. एकंदरींत इटालियन लोकांनीं शौर्य व सहिष्णुता या बदलचा आपला लौकिक आतांपर्यंत चांगला राखिला आहे. रशियन रणक्षेत्राकडून रोज जर्मन सैन्याला कुमक मिळत आहे तरी शत्रूला थांबवून धरण्याची इटालियन लोकांची हिंमत ही त्याबरोबर वाढती आहे.

## लॉर्ड ल्यानसडौन यांचें पत्र.

लॉर्ड ल्यानसडौन हे सध्याच्या ब्रिटिश मुत्सद्यांत एक अग्रगण्य समजले जातात. हा मान त्यांच्या सरदारी घराण्यामुळें व वृद्धत्वामुळेंच विशेषतः दिला जातो, शहाणपणामुळें नाहीं, हें हिंदुस्थानच्या लोकांना पूर्वीं पासून ठाऊक होतें. कारण, हिंदुस्थानांतल्या त्यांच्या व्हाइसराईत नांव घेण्यासारखें असें एक ही मुत्सदी शहाणपणाचें कृत्य त्यांच्या हातून घडलें नव्हतें. पण इंग्रजांना अद्याप त्या विषयीं भ्रम होता तो ही आतां परवाच्या पत्रानें दूर झाला असला पाहिजे. सध्याची वेळ युद्धाचे संबंधानें किती आणीबाणीची, स्वार्थत्याग दाखविण्याची आणि अंगचें वीर्य कृतींत उतरविण्याची आहे हें सर्व जग सांगेल; पण लवकर तह न केल्यास सध्या सुधारलेल्या जगाचा नाश होईल अशी चिंता प्रकट करण्यास, म्हणजे परंपरेनें तहाचें बोलणें लावाल तर आतां धडगत आहे असें कबूल करण्यास, या बुढ्या मुत्सद्याला हीच वेळ योग्य दिसली, अशी टीका त्यांचेच गोरे बंधु करूं लागले आहेत. प्रस्तुत युद्धाचा एक ठळक परिणाम हा होणार आहे कीं समाजांतले उच्चनीच भाव नाहींतसे होऊन सामान्य जनतेचे अधिकार वाढतील व बडे बापके बेट्यांची हल्लींची प्रतिष्ठा अजिबात नाहींशी न झाली तरी फारच थोडी उरलेली दिसेल. या परिणामाला भिऊन आपल्या भाईबंद सरदार घराण्यांचें वर्चस्व कायम राखण्यासाठीं या भीष्माची ही सारी खटपट आहे अशी ही टीका कित्येकांनीं केली आहे. लंडनटाइम्सनें तर लॉर्ड ल्यानसडौन यांचें हें पत्र छापण्याचें साफ नाकारलें; पार्लमेंटांत मि. बॉनर लॉ यांनीं त्या संबंधानें प्रश्न विचारून त्यांच्या मताच्या चिंधड्या उडविल्या; मि. लॉइड जॉर्ज यांनीं एका भाषणांत 'असें निराश होऊं नका. आपणे जवळ मनुष्यबळ, द्रव्यबळ, आणि दारूबळ ही आहे, पण आशाबळ नसल्यास हीं सगळीं बळें निरर्थक होतील' असे उत्साहजनक उद्गार काढले ते बहुधा या पत्रालाच उद्देशून असावेत. नुकतीच विलायतेंत तहाच्या संबंधांत हस्तपत्रकें प्रसिद्ध करण्यांत आलीं त्यांचा व या पत्राचा संबंध दिसतो वगैरे टीका ही पार्लमेंटांत झाली; वर्तमानपत्रांतून अनुकूल प्रतिकूल टीका येऊन एकच गडबड उडून गेली; अखेर मेसोपोटेमिया प्रकरणाप्रमाणें हें ही प्रकरण लोकांचे आर्जव करून कसें तरी मिटवावें लागलें. या पत्रामुळें जर्मन शत्रूवर काय परिणाम होईल, रशियावर काय होईल, बेल्ज्यम, रुमानिया, सर्विया यांना काय वाटेल, इंग्लंडच्या शब्दाच्या विश्वसनीयतेबद्दल ते साशंक होतील कीं काय वगैरे गोष्टी सदर पत्र प्रसिद्ध करतांना ज्या वृद्ध डोक्याला शिवल्या नाहींत, तें डोकें मुत्सद्याचें होतें हें पुढची पिढी खरें मानील काय? हा प्रश्नच आहे.

## हायरे! रशिया!

रशियांत तूर्त स्थापित झालेल्या सरकारला मित्रराष्ट्रें कबूल करीत नाहींत हें आतां स्पष्ट झालें आहे. तरी त्या सरकारानें आपल्या कारकीर्दीची शाश्वती किती थोडी आहे हें लक्षांत घेऊन येन केन प्रकारेण इतिहासांत आपलें नांव 'चिरकाळ' राहावें म्हणूनच कीं काय तहाचें बोलणें सुरू करावें अशी इच्छा धरून मित्रराष्ट्रांची संमति विचारली आहे! ५ 'रविवारीं या संबंधानें बोलणें सुरू होईल' असें सांगून जर्मनी तह करण्यास कबूल आहे असें म्हटलें आहे. असल्या बेजबाबदार मागणीला एकच उत्तर देणें शक्य आहे आणि तें बहुधा मित्रराष्ट्रांनीं दिलें ही असेल. दाराशीं तोफा व बंदुका लावून शत्रु उभा आहे अशा वेळीं सुद्धां देशहिताची पर्वा न करतां ज्यांनीं भाऊबंदकी साधून आपल्या दोस्तांना तोंडघशीं पाडलें व जे आतां जर्मनीनें कावेबाजपणानें टाकिलेल्या जाळ्यांत स्वतः अडकून दुसऱ्यांना ही अडकवूं पाहत आहेत, अशा बेजबाबदार व उच्छृंखळ वर्तनाच्या लोकांना नकाराचें उत्तर दिल्यानें सुद्धां त्यांचा बहुमान केल्यासारखेंच होईल. म्हणून इंग्रज वकिलानें तर साफ आम्ही तुम्हांस ओळखीत नाहीं असाच जाब दिला; फ्रान्सनें ही तसेंच केलें. अमेरिकेनें तहाच्या विरुद्ध मत दिलें. सारांश, रशियाच्याच मुखानें त्याची मित्रद्रोह दर्शविण्याची व जगांत त्याला फजीत करण्याची जर्मनीची युक्ति सफळ झाली आहे. रशियाची हल्लीं दुर्दशा झाली आहे खरी, तरी अशा फजीतखोरांच्या हातीं राजसत्ता फार दिवस ठेवण्या इतके विचारभ्रष्ट रशियन लोक अद्याप

झालेले नाहींत, व हीच गोष्ट रशियामध्यें पुनः पूर्वीची सत्ता स्थापित होईल अशी उमेद जागृत करीत आहे.

---

## कांग्रेस--लीगचें संयुक्त डेप्युटेशन.

ठरलेल्या तारखांना निरनिराळ्या संस्थांकडून डेप्युटेशनें गेलीं व मि. मांटेग्यु व लॉर्ड चेम्सफोर्ड यांनीं त्यांचें स्वागत केलें. बहुतेक डेप्युटेशनानें काँग्रेस—लीगच्याच मागण्या क्वचित् फेरफार करून आपणांस संमत आहेत असें कळविलें. यावरून कांग्रेस—लीग या संस्था राजकीय बाबतींत लोकमताच्या पूर्ण निदर्शक आहेत अशी आतां तरी सरकारची व 'पायोनियर' सारखीं आंग्लो—इंडियन पत्रें खेरीज करून इतर सर्वांची खात्री होईल. कांग्रेसच्या अर्जांत हिंदुस्थानच्या राजकीय स्थितीच्या इतिहासाचें आरंभीं आलोचन केलेलें असून त्यापासून ओघानेंच पांच सिद्धांत कसे निघतात तें दाखविलें आहे. ते सिद्धांत हे सामान्यतः हिंदी लोकांच्या हिताला जपण्याचें कर्तव्य हिंदुस्थान सरकारच्या हातून घडलें नाहीं; परकीय लोकांना त्यामुळें हिंदुस्थानांतलें द्रव्य धुऊन नेतां आलें, व त्याचा अत्यंत घातुक परिणाम घडून आला; हिंदुस्थानची राज्यपद्धति प्रागतिक नसल्यामुळेंच मेसोपोटेमियासारखें प्रकरण उपस्थित झालें; अधिकाऱ्यांच्याच हातांत सगळी सत्ता व लोकांचे हात रिकामे अशी आजपर्यंतची व्यवस्था फार हानिकारक झाली आहे; हिंदुस्थानांत जी कांहीं सुधारणा दिसत आहे ती लोकांच्या चळवळीचें फळ आहे. इतकें सांगून शेवटीं सर चार्लस ट्रिव्हेलियन यांच्या सारख्या अनुभववृद्ध अधिकाऱ्यानें पार्लमेंटरी कमिटीपुढें केलेल्या भाषणांतलें एक महत्त्वाचें व सारभूत असें वाक्य उतरून घेतलें आहे. तें हें कीं 'इंग्रज लोकांचें पाठबळ असलेल्या होमगव्हरमेंटपुढें हिंदुस्थान सरकारला वाकवें लागल्यामुळें त्यांच्या हातून हिंदी प्रजेच्या हिताचें रक्षण होत नाहीं. याला खरा उपाय म्हणजे उत्पन्न व खर्च यांच्या सगळ्या बाबी हिंदी लोकांच्या हातीं देणें हा आहे' सदर अर्ज फारच उत्तम, मुद्देसूद व समतोल बुद्धीनें लिहिलेला असल्यामुळें इंग्रजी न जाणाऱ्या हिंदी लोकांसाठीं व विलायतेंतल्या लोकांना फुकट वाटण्यासाठीं तो स्वतंत्र पुस्तक रूपानें छापून काढावा व त्याचीं देशी भाषांत भाषांतरें करवून ज्या त्या ठिकाणच्या हि. कां. कमिट्यांनीं त्यांचा प्रसार करावा अशी आम्ही सूचना करतों.

---

## राष्ट्रदिन.

### ('अवरंड' ची अद्भुत लाट.)

सन १९११ सालापासून तारिख १२ डिसेंबरचा दिवस आमच्या इंडियन राष्ट्रालाच काय; तर ब्रिटिश साम्राज्यालाही एक राष्ट्रीय सुवर्ण दिन वाटतो. त्या दिवशीच्या बाह्यराज्याभिषेकांत ज्या प्रेमाच्या व आनंदाच्या ग्रंथी ईश्वरी संकेतानें बांधण्यांत आल्या त्या उत्तरोत्तर अधिक दृढतर व बलवत्तर होत चालल्या असून सांप्रतच्या महायुद्धांत त्यांच्या सर्व वाढत्या शक्तींची सर्व जगाला विलक्षण कल्पना येऊन चुकली आहे. इंडियन राष्ट्र ही ब्रिटिश साम्राज्याची या प्रेमदृष्टीनें खरोखर कामधेनूच बनली आहे. या शुभदिनाचे आनंदोत्सव जितक्या भव्य प्रमाणावर व्हावयाला पाहिजे होते तसे होत नव्हते म्हणूनच कीं काय या महायुद्धाच्या निमित्तानें तारीख १२ डिसेंबरचें खरें महत्व लोकांस अधिक सार्वत्रिक रितीनें करण्याचा सुप्रसंग आला आहे. जेव्हां या दिवसाची खरी स्वप्नसृष्टी आपल्या पूर्ण सौंदर्यानें डोळ्यापुढें उभी रहाते तेव्हां रणाच्या मैदानांत ज्या आमच्या वीरांनीं आपले प्राण खर्चिले, किंवा देहानें जे लुळे पांगळे झाले ते सर्वजण आपल्या या महायुद्धाच्या पुण्याईनें दिव्यदेहधारी होऊन आमच्या या आनंदाच्या प्रसंगाला अनुपम शोभा आणतील. त्यांचें स्वागत आम्ही या आनंदाच्या मुहुर्तावर सर्वोत्कृष्ठ करावें, त्यांच्या वीररसाचा आह्ला आबाल वृद्धांमध्यें परिपोष व्हावा, आणि ब्रिटिश साम्राज्याच्या भावी मंदिरांत आम्ही सर्व अमंगल भेदाभेद विसरून प्रेमभावानें वागावें आणि सर्व मानवी संस्कृती जगाला अनुकरणीय होऊन जर्मन संस्कृतीला हें नवें अमृत देण्याचें पवित्र कार्य आमच्या हातून व्हावें असा १२ डिसेंबरच्या तारखेचा ईश्वरी दृढ संकल्प आम्हास दिसत आहे.

अशा या दिव्य तारखेला आम्ही आनंदोत्सव करावेत आणि त्या आनंदोत्सवांत आमच्या वीरांची आठवण म्हणून त्यांना आमच्या अंतःकरणाचीं उत्कृष्ट ठेव अर्पण करावी या हेतूनें सर्व इंडियन राष्ट्रभर विलक्षण सद्भावनांची अद्भुत लाट उसळली आहे. या समारंभांत गरीब, श्रीमंत, सरकारी बिनसरकारी हे सारखेच मिसळून जात आहेत, आणि सर्वांच्या अंतःकरणाच्या तारा एका आनंद घोषांत वाजूं लागाव्या म्हणून बाह्यतः नाटकें, गायनादि जलसे, इतर नानाविध खेळ इत्यादिकांच्या प्रोग्रामांनीं तारीख १२ डिसेंबरचे पूर्वदिन व उत्तरदिन अगदीं गच्च भरून गेलेले आहेत. या राष्ट्रदिनाच्या दिवशीं मोठ्यांत मोठी रकम उभारण्यांत यावी म्हणून टिकिटें व वर्गण्या यांच्या याद्या खुल्या झाल्या आहेत आणि जोतो या कामीं अतिरेकाच्या मर्यादेला उत्साहानें जात असला तरी त्याचें अभिनंदन करावें असेंच मन धाव घेतें. इतर जिल्ह्याप्रमाणें आमच्या जिल्ह्यांत ही मोठ्या प्रमाणावर जलसे व मजलसी होणार आहेत आणि आमचे लोकप्रिय डेपुटि कमिशनर राजश्री बापूसाहेब जठार यांच्या शब्दाला आमच्या जिल्ह्यांत इतका बहुमान आहे कीं आमच्या जिल्ह्याचे प्रोग्राम किंबहुना आपल्या वैभवानें इतर जिल्ह्यांना मागें सारतील आणि त्याच्या रहस्याच्या दृष्टीनें पहातां ते सर्वोत्कृष्ट, सर्वांग सुंदर व हृदयंगम असेच होतील असे आम्ही लोकांच्या प्रदीप्त उत्साहावरून आनंदानें सांगत आहों. जेवढा वर्गणीचा आकडा मोठा तेवढें रणांगणावरील वीरांचे खरें स्वागत होय हें कोणीही विसरतां कामा नये. आणि म्हणूनच सर्वांनीं आपली थैली उदार अंतःकरणानें होईल तितकी खुली करावी आणि या प्रसंगोचित अमूल्य पुण्यकृत्यानें स्वतःस व त्या परीनें सर्व राष्ट्रास पुनीत करण्यास चुकूं नये. तारीख १२ डिसेंबरच्या या महागंगेच्या ओघांत जो स्नान करील तोच खरा जन्मला असे आमची राष्ट्रदेवी म्हणेल.

---

# वऱ्हाडवृत्त.

**युद्धकर्ज**—गेल्या १७ नोवेंबर अखेर मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून २१२११८३७ रुपयांची रकम युद्धकर्जाकडे लोकांनीं अर्पण केलेली आहे आणि हा उत्तरोत्तर वाढतां आकडा आमच्या प्रांताच्या स्वराज्य भक्तीची खूणच होय.

**कापूस**—ता. १ डिसेंबरपर्यंतच्या सप्ताहांत ४१३९४ कापसाची गाडी आली असून १ सप्टेंबरपासून आजपर्यंतच्या हंगामांत १०८३४० एकंदर गाडी भरली आहे. कपाशीचे बोझे ३७०२ कॉटन मार्केटांत आले, कापसाचा भाव २१२ पर्यंतचा पुन्हां २०० वर उतरला आहे. या भर हंगामांत येथील मार्केटांत ९००।६०० पेक्षां अधिक गाडी येत नाहीं. मध्यप्रांतांतील एकंदर गाडी ३२८३० आहे. गेल्या तिन्ही वर्षाचा हाच सरासरी आकडा आहे तेव्हां तिकडील कापसाच्या पिकाला इकडच्याप्रमाणें धोका नाहीं ही समाधाची गोष्ट होय.

**रिझर्व डबा**— कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेला वऱ्हाडांतून जाणार प्रतिनिधी व प्रेक्षक यांना रिझर्व डब्यांतून जावयाचें असल्यास त्यांनीं रा. रा. गोपाळ कृष्ण चितळे आकोला यांस समक्ष अगर पत्रद्वारें भेटावें. सदरहू बद्दल खुलासा ता० १९-१२-१७ इ. चे आंत झाला पाहिजे असे ते कळवितात.

**शिक्षक समाज**—आकोला जिल्ह्यांतील प्राथमिक शाळांच्या शिक्षक-समाजाला गेल्या शुक्रवारीं प्रारंभ होऊन आज सायंकाळीं त्याचें विसर्जन होईल. या शिक्षक समाजांतील विशेष महत्त्वाच्या गोष्टी पुढील सोमवार पर्यंत तहकूब ठेवणें भाग आहे.

**प्राथमिक शिक्षण**— प्राथमिक शिक्षणाच्या सक्तीच्या बिलाचा खर्डा मुंबईच्या कायदे कौन्सिलांत अखेर पसार झाला हें शुभचिन्ह होय. तशाच तऱ्हेचा प्रयत्न नामदार रावसाहेब ठाकर हे आमच्या कायदे कौन्सिलांत करणार असून त्यांचा ठराव आज मांडण्यांत येइल. ही उत्तम शुभ गोष्ट होय.

**कायदे कौन्सिल**—आजच्या कायदे कौन्सिलांत इतर प्रश्नावळी शिवाय लोकल सेल्फ गव्हर्न्मेंट बिल व व्हिलेज सॅनिटेशन हे दोन महत्वाचे खर्डे येणार आहेत.

**मंथरा वृत्ती**—बेळगांवास अखिल भारतवासी मराठा परिषदेंत अध्यक्ष या नात्यानें आमचे वऱ्हाडचे तरुण नामांकित बॅरिस्टर रामराव देशमुख यांनीं जे सुंदर स्फूर्तिदायक व प्रगमनशील विचार प्रदर्शित केले, त्यांच्या प्रतिषेध करण्याच्या उद्देशानें व ज्ञातीद्वेषाचें नवें बीज पेरण्यासाठीं एक मराठा ज्ञातीची परिषद पुणें येथें १६ डिसेंबरला भरणार आहे. आमची मराठा मंडळीच बाह्य प्रेरणेनें न वागतील तर याही सभेंत अकाल्पित चांगला प्रकार घडून येईल.

**क्रिकेट मॅच**--गेल्या गुरुवारी व शुक्रवारीं आकोला हायस्कूल व उमरावती हायस्कूल यांच्या क्रिकेट टीमचे सामने मोठ्या वीरश्रीचे झाले. क्रिकेटच्या इतिहासांत आकोला हायस्कूलला यंदा प्रथमच विजय मिळाला. या बद्दल सर्व विद्यार्थी टाळ्यांच्या गजरांत आपापल्या वीरांचे धन्यवाद गात आहेत, व कोणी कोणी बक्षीसें व पुष्पहार देऊन यंदाचें शील्ड मिळाल्याबद्दल आनंद चालू आहेत.

**जलसे**--गेल्या गुरुवारीं व शुक्रवारीं मलकापुरास गायनाचे जलसे मोठ्या प्रमाणावर झाले. अल्लाहाबादची कलावंतीण जानकीबाई व प्रोफेसर अब्दुल करीम यांच्या संगीतांत मंडळी तल्लीन झाली.

पारस येथें गुरुवारीं एक नाटक प्रयोग झाला आणि आलेगांवकराकडे त्यांतील मुख्य भाग होता ही विशेष गोष्ट होय. एकंदर वर्गणीचे जमलेले आकडे मागाऊन देण्यांत येतील.

---


## विकणें आहे.

खालीं लिहिलेलें घोड्याचें सामान थोडे दिवस उपयोगांत आणिले असून अगदीं नव्या सारखें आहे.

(१) सिंगल पेटन्ट लेदर हारनेस कम्प्लीट.

(२) सुपिरीअर ब्रॉऊन लेदर डबल हारनेस खास ऑर्डर देऊन कानपूर येथें तयार केलेले.

(३) हॉर्स रायडींग सॅडल कम्प्लीट (लगाम व मारटींगल समेत.)

ज्यास घ्यावयाचे असेल त्यानीं आमचे दुकानांत येऊन माल पाहून खात्री करून विकत घ्यावे.

पेस्टनजी ॲन्ड सन
आकोला.

नो० नं० ४९३


---


## नोटीस

रा. रा. सदाशीव तानकाजी बापु मु. रंदळे पो. दहिहंडा ता. आकोट

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही माझे कबुल केलेले ५०० रुपये मार्च मध्यें देणें लागत होते; परंतु ते देण्यास तुम्ही अद्याप कसूर केली यावरून तुम्हास या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं, तुम्हास ही नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांत पैसे मला मिळतील अशी व्यवस्था करावी. तसें न झाल्यास आम्हासच ते मिळण्याची योग्य तजवीज करणे भाग पडेल कळावें ता० ३०।११।१७

सही

दवलतराव बळीराम देशमुख चांदुरकर हल्लीं मुकाम खामगांव

नो० नं० ४९४

## नोटीस

नोटीस देणारे शिवलिंग ऐप्पा राहणार फत्तेखेर्डा त. मेहकर

यांस:--

खाली सही करणार यांजकडून नोटीस द्वारें सर्वत्रांस जाहिर रीतीनें कळविण्यांत येते कीं, शिवलिंग ऐप्पा गुरु निश्वनाथ ऐप्पा यास आम्ही संस्थानांतुन १२ वर्षे कढून दिला होता व त्यानंतर त्यांनी आमची फार फार विनंती केली यामुळें पुन्हा त्या इसमास संस्थानांत घेतलें व कांहीं दिवसानंतर तो इसम विनहुकुमानें व बेकायदेशीर चालीनें व अनेक प्रकारची संस्थानची नुकसानी करूं लागला. यामुळे त्या इसमाचा संस्थानच्या व्यवहाराशीं कांहीं संबंध नाहीं. त्याच्याशीं जर कोणी कांहीं मठाचे बाबतींत व्यवहार केला तर मठ त्याचा जबाबदार राहणार नाहीं अगर त्याला मठाचे शेतीचा अगर इतर कांहीं बाबतींतील माल, पीक, पैसा वगैरे जर कोणी दिला तर त्याबल मठ जबाबदार राहणार नाहीं. व तो पुन्हा न्यायाशीं योग्य रीतीने वसूल केला जाईल. कळावे. द. मलकार्जुन ऐप्पा राहणार फत्तेखेर्डा आज तारीख ११-११-१९१७ इसवी

सही

गंगाधर श्रीगुरु प्रसिद्ध महास्वामी श्रीक्षेत्र मठ महासंस्थान फत्तेखेर्डा दस्तुर खुद

नो० नं० ४९९

---

## जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षीचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर यांच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

ता. १ जुलै पासून पुढें आणखी प्रसिद्ध होईपर्यंत व्याज दरसाल दर शेकडा ४ रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक / Lyon Scott
आकोला ९.१०.१९ / एजंट
नो नं १

---

# लक्षांत ठेवा.

कीं येथें आमचेकडे कमिशनचे (अडतीचे) काम चालत असून आम्ही येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान, दळण्याच्या गिरण्या जीन व प्रेसचें सामान वगैरे वगैरे सर्व प्रकारचा

माल माफक कमिशन घेऊन मालाची पूर्ण चौकशी करून पाठवितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारे सर्व सामान मोटारचे व घोडे गाडीचे गाद्यांचे कापड, व दुसरे लागणारे सामान, विलायतील विजेचे दिवे, व दुसरे विजेचे सामान, ल्यांप्स् वगैरे तेल पुरवितो. एकवेळ आरडर देऊन कामाचे चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स

पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट मुंबई नंबर २

नो. नं. ३१८

---

४० रोगावर एकच जालीम औषध

## सुधासंजीवनी



यानें अजीर्ण, खोकला, दमा, संधीवात, प्रमेह, प्रदर, धुपणी, संग्रहणी, अतीसार वगैरेवर तात्काल गुण येतो. याची एक बाटली जवळ ठेवणारास वैद्याची गरज राहणार नाहीं. एकदाच खातरी करा किंमत रु. १ टपाल खर्च निराळा. नमुना -।- अनुपान पत्रकसोबत. गांवोगांव एजंट पाहिजेत. भरपूर कमीशन. आजच पत्र लिहा.

संजीवनी ऑफिस
खामगांव (वऱ्हाड)

---

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हा रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, वीरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १॥८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैदकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनठी, खरुज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H L. Batliwala Sons & Co. Ltd.**

N. N. 6 Dadar Bombay

---

## कागदी बादाम

सर्वोत्तम ८१० गिरी जर्दालू ८१, जर्दालु ८४ कागदी अक्रोड ८३, गरी अक्रोड ८४, अंगुरी हिंग रु. २। आणि शाहजिरें १। रत्तल, मुश्क कस्तुरी रु. ३९, मुर्मा मर्मीरा,३ पवित्र केशर १॥ आणि शुद्धशिलाजित ८१ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९

नो. नं. १७७

---

## रोल्डगोल्ड सोन्याचे

**कधींच काळे न पडणारे दागिने**

चंद्रहार किं. रु. १--४; गोट जोडी २-२॥; पाटल्या जोडी २-२॥; बांगड्या ३-४; तुशी ६. नथ उत्तम मोत्यांनी बांधलेली ४-९. शिंप्याचें मोती लहान मोठें बाटेल तसे. सगळी २-३-४; अंगठी १; सल्ले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २-२॥. सरी ४

**केंस काळे करण्याचा साबण.**

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केंस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाकसाचो किं. १॥ रु.

पत्ता— मगनलाल के आणि कंपनी
गिरगांव- मुंबई

नो० नं० ९

---

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलत्व गर्मीसंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, बातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व महाल भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. पक्का रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३१ गो० १ रु० ७१ गो० २ रु० १६१ गो० ४ रु० २७१ गो० ६ रु० ५१० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण** —कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तीडक, मुतांनी लाला, संकोच, पुयस्त्राव, रक्तस्त्राव इत्यादि विकार पथ्य नसत ३ त दिवसांत जातात. तिडीक एका घटकेत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवू.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून ती पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळत आहेत. पशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, धोक रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० स० ट० ख० बे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतीमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी

नो० नं० २२

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-N. No150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला--सोमवार तारीख १७ माहे डिसेंबर सन १९१७ इ० [अंक ५०

# जाहिरात.

१ रिणमोचन तालुके व जिल्हा उमरावती येथील वार्षिक यात्रा रविवार तारीख १३ जानेवारी १९१८ इसवी रोजीं भरण्यास सुरुवात होऊन पुढें तारीख १० फेब्रुवारी सन १९१८ पर्यंत प्रत्येक रविवारीं भरेल. तसेच सोमवार तारीख ११ फेब्रुवारी १९१८ इसवी रोजीं अर्धोदय-पर्व असल्यामुळें त्या दिवशीं ही चांगली यात्रा भरेल. रिणमोचन हें ठिकाण जी. आय. पी. रेल्वेच्या माना व कुरुम या स्टेशनापासून सुमारें १० मैल आहे. व उमरावतीहून कच्या रस्त्यानें सुमारें २० मैल आहे.

२ रिण मोचन येथें रविवार व सोमवार तारीख १० व ११ फेब्रुवारी सन १९१८ इसवी रोजीं आकोला व उमरावती या दोन जिल्ह्याचें मिळून शेतकीचें पदार्थाचें व जनावराचें प्रदर्शन भरणार असून परीक्षक मंडळीनीं पसंत केलेल्या प्रदर्शनांतील शेतकीचे पदार्थ व जनावरें यांचे करितां नगदी रकमेचीं बक्षिसें वाटण्यांत येतील. तरी सदर्हू दोन्ही जिल्ह्यातील शेतकरी लोकांनीं आपले शेतींत पिकणारे उत्तम जिन्नस व आपले येथील उत्तम जनावरें सदर्हू प्रदर्शनांत आणावीं त.

३ शेतकी खात्याचे डेप्युटी डायरेक्टर हे उपयुक्त व सुधारेलीं अशी कांहीं अवजारें आणतील व ता. १०।२।१९१८ इसवी रोजीं सकाळीं ८ ते ११ वाजेपर्यंत त्याचा प्रत्यक्ष उपयोग करून दाखविला जाईल.

४ तारीख १० फेब्रुवारी १९१८ इ. रोजीं दुपारीं २ ते ५ वाजेपर्यंत नांगराच्या व छकड्याच्या शर्यती होतील.

५ तारीख ११ फेब्रुवारी १९१८ इ. रोजीं दुपारीं २ ते ५ वाजेपर्यंत सभा भरून तेथें शेतकी व पतपेढ्या संबंधीं व तसेंच जनावरां संबंधीं व्याख्यानें दिलीं जातील. नंतर बक्षीस समारंभ होऊन सभा बरखास्त होईल.

६ प्रदर्शना करितां पाठविण्याच्या प्रत्येक जिन्नसा बरोबर जिन्नस पाठविणारे इसमानें खालीं दिलेल्या नमुन्या प्रमाणें दाखला देऊन त्याजवर सदर्हू इसम ज्या गांवीं राहत असेल तेथील पाटलाची सही घेतली पाहिजे. "मी असा दाखला देतो कीं, प्रदर्शनांत पाठविलेली जिन्नस माझे येथें तयार झालेली आहे."

सदर्हू जिन्नसा बरोबर दुसरा ही एक दाखला पाठवावा व त्यांत खालीं लिहिल्या प्रमाणें खुलासा करावा.

(अ) प्रदर्शनांत पाठविण्याची जिन्नस ज्या गांवांत तयार झाली असेल त्या गांवचें नांव

(ब) तालुक्याचें नांव

(क) जिन्नस पाठविणाराचें नांव, बापाचें नांव व धंदा

७ उमरावती व आकोला जिल्ह्यांतून प्रदर्शना करितां पाठविण्यांत येणाऱ्या सर्व जिनसा अनुक्रमें उमरावती व मुर्तिजापूर तहशीलदार यांजकडेस ता. ५ २ १९१८ इ. पर्यंत पोचतील अशा बेतानें पाठवाव्यात. फळफळावळ व भाजीपाला ता. ९ फेब्रुवारी १९१८ इ. रोजीं उमरावती तहशीलदार यांना रिण मोचन येथें मिळेल अशा बेतानें पाठवावा.

८ प्रदर्शना करितां पाठविण्याच्या जिन्नसांचा नमुना पांच पौंडा पेक्षां कमी नसावा.

९ यात्रेच्या जागीं डॉक्टर, व जनावरांचे डॉक्टर हे राहतील तसेंच प्रदर्शनाचे बंदोबस्ताकरितां पोलीस गार्ड राहील.

१० शनिवार व रविवार ता. ९ व १० फेब्रुवारी १९१८ इ. रोजीं प्रदर्शनाकरितां आणलेल्या जनावरांस चारा बगैर मोफत दिला जाईल.

११ प्रदर्शनाकरितां येणाऱ्या शेतकऱ्यांपासून अगर प्रेक्षकांपासून प्रदर्शनांत पाठविलेल्या जिन्नसाबद्दल अगर जनावरांबद्दल कोणताही कर घेतला जाणार नाहीं.

१२ फक्त उमरावती व आकोला जिल्ह्यांतील शेतकरी लोकांनाच बक्षिसें देण्यांत येतील.

१३ यात्रेंतील जागेच्या स्वच्छते विषयीं व यात्रेंतील बंदोबस्तासंबंधीं जिल्ह्याचे अधिकारी वेळोवेळीं जे हुकूम फर्मावतील त्या प्रमाणें प्रेक्षकांनीं व व्यापाऱ्यांनीं वागलें पाहिजे.

## प्रदर्शनांत आणण्याच्या जिन्नसाबद्दलचें परिशिष्ट.

| अ नं. | प्रदर्शनांतील जिन्नसांचा तपशील | बक्षिसें १ लें | २ रें | ३ रें | ४ थें | ए |
|---|---|---|---|---|---|---|
| | भाग १ ला शेतकी— आणि बागाईतीच्या जिनसा | | | | | |
| १ | रोझीया कापूस | २० | १५ | १० | ५ | ५ |
| २ | जवारी | २० | १५ | १० | ५ | ५ |
| ३ | गहूं | १५ | १० | ५ | २ | ३ |
| ४ | भुइमुग | १५ | १० | ५ | ० | ३ |
| ५ | ऊंस | ५ | ३ | २ | ० | १ |
| ६ | फळें | १० | ५ | ३ | ० | १८ |
| ७ | भाजीपाला | ५ | ३ | २ | ० | १० |
| ८ | फुलझाडें | १० | ६ | ४ | २ | २२ |
| | | १०० | ६७ | ४१ | १२ | २२ |

### भाग २ रा— गुरें

| अ नं. | प्रदर्शनांतील जिन्नसांचा तपशील | १ लें | २ रें | ३ रें | ४ थें | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अवलादी सांड | २५ | १५ | १० | ० | ५० |
| २ | बैल जोडी | २० | १२ | ८ | ० | ४० |
| ३ | २॥ वर्षांचे आंतील दुध सुटलेली कालवड | १० | ८ | ६ | ० | २४ |
| ४ | ३ वर्षांचे आंतील दुध सुटलेले गोऱ्हे. | १० | ८ | ६ | ० | २४ |
| ५ | अवलादी गाई | २५ | १५ | १० | ० | ५० |
| ६ | दुभत्या म्हशी | २० | १५ | १० | ० | ४५ |
| ७ | दुभत्या बकऱ्या | ६ | ४ | २ | ० | १२ |
| | | ११६ | ७७ | ५२ | ० | २४५ |

### भाग ३ रा— किरकोळ

| अ नं. | प्रदर्शनांतील जिन्नसांचा तपशील | १ लें | २ रें | ३ रें | ४ थें | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | छकड्याच्या शर्यती | २० | १५ | १० | ५ | ५० |
| २ | नांगराच्या शर्यती. | २० | १५ | १० | ५ | ५० |
| | | ४० | ३० | २० | १० | १०० |
| | एकूण | २५६ | १७४ | ११३ | २२ | ५६५ |

वरील बक्षीसा शिवाय आणखी कांहीं बक्षिसें यावीशीं वाटल्यास ३५ रुपया-पर्यंत देण्यांत येतील.

ई. डॅक्स
डेप्युटी कमिशनर.

## सन १९१६-१७ सालांत पश्चिम विभागांत शेतकी खात्यानें केलेल्या कामाचें सिंहावलोकन.

इसवी सन १९०६ सालीं जून महिन्यांत अकोला येथें सरकारी शेती (Government Farm) सुरू करण्यांत आली; व १९०७ सालांत तेथें प्रयोगाचे कामास प्रत्यक्ष सुरवात झाली. त्या वेळे पासून आतां पर्यंत कृषिविषयक व कपासी पिकविणारे प्रदेशास उपयोगी अशा बऱ्याच महत्वाच्या प्रश्नांचा उलगडा झाला व त्या अनुभवांची शेतकरी वर्गास माहिती देऊन फायदेशीर दिसून आलेल्या गोष्टींचा प्रसार करण्या करितां, अगदीं खालच्या दर्जाच्या शेतकऱ्यांचे नजरेस सुद्धां निरनिराळ्या सुधारणा पडतील अशा बेतानें व्यवस्थेशीर कार्यक्रम आखतां आला.

२ आम्ही सुरू केलेल्या क्रियांचा पुरवठा करणारे शेत्यांवर (Seed Farms) व शेतकी संघांवर, (Agricultural Unions) दुसऱ्या प्रांतांतील तज्ञ लोकांचें लक्ष वेधलें जाऊन, ते अशा तऱ्हेचीं कांहीं ठिकाणें प्रत्यक्ष पाहण्यास येऊन गेले, व तेथील कामाची पद्धत पाहून त्यांचे मनावर त्याचा चांगला परिणाम झाला. पुष्कळ गांवांत आम्ही सीड फार्म, व युनिअन्स स्थापन केले आहेत; व तेथें चांगलें बी उत्पन्न करण्याचेंच एक काम केलें जातें असें नाहीं; तर शेतकी संबंधी इतरहि सुधारलेल्या पद्धतीची व सहकारितेची माहिती दिली जाऊन त्यांचा अनुभव प्रत्यक्ष कृतींत आणून दाखविला जातो.

प्रत्येक तालुक्यास एक कृषि मंडळाची (Taluk Agricultural Association) स्थापना केली असून त्यांत त्या तालुक्यांतील खेडेगावांतील शेतकरी लोक सभासद असतात प्रत्येक तालुका असोशियशनचे सभासदांतून निवडलेलीं योग्य माणसें जिल्हा असोसिएशनचे सभासद असतात. प्रत्येक जिल्हा असोसिएशन आपल्या सभासदांतून कांहीं निवडक माणसांची निवडणूक करून देते व तेच सभासद काल रोजीं येथें मे० कमिश्नर सा. ब. च्या अध्यक्षते खालीं जी प्रांतिक बैठक (Circle Committee) भरली होती तिचे सभासद असतात. ह्या बैठकींत तालुका असोसिएशन्स व आग्रिकलचरल युनिअन्स यांनीं करावयाच्या व शेतकी खात्यानें मिळविलेल्या अनुभवाचा फायदा लोकांस कशा रीतीनें करून द्यावयाचा, या कामाची दिशा पुढील वर्षा करितां ठरविली जाते.

३ गेल्या १० वर्षांत अकोला येथील शेतीवर निरनिराळे प्रयोग करून पहातां जे परिणाम दिसून आले, त्यांपैकीं महत्वाचे परिणाम खालीं थोडक्यांत दिले आहेत. त्यावरून कपाशी पिकविणाऱ्या प्रदेशास कोणते मार्ग फायदेशीर आहेत तें दिसून येईल.

(१) गहूं, हरभरा आणि तूर ह्यानंतर कपाशीचें पीक पेरल्यास दर एकरीं उत्पन्न अनुक्रमें ४३१,३९९ व ३९८ रत्तल होतें; व कपाशीवर कपाशी सतत पेरल्यास एकरीं ३१९ रत्तल उत्पन्न होतें, आणि जवारी नंतर कपाशी व तूर (मिश्र पीक) पेरलें तर १९१ रत्तल कापूस व १६४ रत्तल तूर उत्पन्न होते. गेल्या १० वर्षांत पेरलेल्या पिकांची किंमत खालीं दिल्या प्रमाणें आहे.

| | | |
|---|---|---|
| गहूं }<br>कपाशी } | ३३-२ | जरी कपासीवर कपाशी पेरीत गेल्यानें इतर पिकांचे किंमतीपेक्षां शेंकडा १८ ची वाढ उत्पन्नांत होते, तरी त्यापासून वाळवीचा रोग उत्पन्न होण्याची भीती आहे व त्यामुळें कपाशीचें पीक फायदेशीर रहाणार नाहीं म्हणून कपाशीवर कपाशी पेरण्याचें पद्धतीस उत्तेजन देणें चांगलें नाहीं. |
| हरभरा }<br>कपाशी } | ३३-० | |
| तूर }<br>कपाशी } | ३०-० | |
| जवार }<br>तूर—कपाशी } | ३०-१३ | |
| कपाशी | ३८-१० | |

शिवाय कपाशीच्या पिकाकरितां लागणारा खर्च इतर पिकांस लागणारे खर्चाचे मानानें शेंकडा २९ नी जास्त येतो.

भुइमुगा नंतर कपाशी पेरण्याचे पद्धतीचा दोन वर्षांतील अनुभव असा आहे कीं, त्यामुळें दर एकरीं ४९ रुपयांचें उत्पन्न येतें. म्हणून कपाशी नंतर बदलून पेरावयास भुइमुगाचें पीक सर्वांत चांगलें दिसतें.

(२) आम्हांस असें दिसून आलें आहे कीं, जमीन पीक पेरावयास योग्य स्थितींत आणण्याकरितां सुधारलेल्या नांगरानें तीं नांगरणें फार कमी खर्चाचें आहे. देशी नांगरानें नांगरल्यास वेळ जास्त लागून मजुरीहि जास्त लागते.

(३) योग्य प्रमाणांत पराटीचीं झाडें पातळ केलीं, तर त्यापासून जेवढें उत्पन्न होतें तेवढें पराटी पातळ न केल्यास होत नाहीं. झाड किती अंतरावर असावें हें जमीनीच्या मगदुरावर अवलंबून राहील.

| | ओळींतील अंतर | एकच ओळींतील प्रत्येक झाडांतील अंतर |
|---|---|---|
| हलक्या जमीनीस | १९ इंच | ७ इंच |
| साधारण जमीनीस | १८ " | ७ " ते १० " |
| खत दिलेल्या जमीनीस | २० " ते २४ इंच | १० " ते १९ " |

(४) जास्त फांद्या फुटल्या म्हणून वाढीस लागलेल्या कपाशीच्या झाडाचे शेंडे खुडण्यानें पीक येण्यास जास्त दिवस लागून उत्पन्न कमी होतें म्हणून झाडाचे शेंडे खुडण्याचें बंद केलें पाहिजे.

(५) अ— गांवरानी मिश्र जातीचा कापुस पेरण्यापेक्षां रोझीआ कापुस पेरला तर त्यापासून जास्त उत्पन्न येतें. कारण रोझीआ पासून दर एकरी कपाशीचें उत्पन्न शेंकडा १४ नें जास्त येऊन शिवाय त्यांत गांवरानी कपास पेक्षां रुईचें प्रमाण शेकडा ९ नें जास्त असतें.

ब— बनी व इतर पिवळीं फुलें येणाऱ्या कापसाच्या जातीचें उत्पन्न कमी येऊन त्यापासून रोझीआच्या बरोबर उत्पन्न होत नाहीं.

क— बुरी कापसास वाळवीचा रोग लागत नाहीं म्हणून तो ज्या जमिनींत वाळवी लागते अशा ठिकाणीं, व पुष्कळ खत दिलेल्या आणि भारी जमीनींत पेरण्याची शिफारस करावयास हरकत नाहीं. ज्या वर्षी जास्त पाऊस असेल, त्या वर्षी— विशेषतः गेल्या हंगामाप्रमाणें पावसाळा संपतां संपतां जास्त पाऊस पडल्यास— त्या वर्षी या कापसाचें पीक चांगलें येतें.

(६) गुरांचे गोठ्यांत कोरडी माती पसरून त्यावर गुरें बांधल्यानें वाया जाणारें मूत्र त्या मातींत शोषलें जाईल; व अशा पद्धतीनें गुरांचें मूत्र वाया न घालविलें तर हल्लीं उपलब्ध असलेला खताचा पुरवठा जवळ जवळ दुप्पट करितां येईल. हें खालीं दिलेल्या माहितीवरून दिसून येईल.

| | दर एकरीं कपासीचें उत्पन्न. | दर एकरीं जवारीचे उत्पन्न. |
|---|---|---|
| (अ) निव्वळ शेणाचें खत (१० महिन्याचें, एका जोडीचें खत एका एकरांत दिलें तर) | ४४८ रत्तल | ६७८ रत्तल |
| (ब) निव्वळ मूत्राचें खत (वर प्रमाणें) | ४५१ रत्तल | ६३९ रत्तल |
| (क) खत न दिलेल्या जमीनीत | २७३ रत्तल | ४२९ रत्तल |

(७) कपाशीच्या पिकास शेणखताच्या जोडीस नायट्रेट ऑफ सोडा किंवा सॉल्ट पीटर ह्या कृत्रिम खतांचा झाड थोडें मोठें झाल्यावर उपयोग केल्यास, जमीनीस जास्त खताचा पुरवठा करितां येईल. अशा रितीनें जोड खताचा उपयोग केल्यापासून आलेलें उत्पन्न खालीं दाखविल्याप्रमाणें होतें.

| | कपाशीचें उत्पन्न दर एकरी |
|---|---|
| (अ) नायट्रेट ऑफ सोडा (६७ रत्तल दर एकरी) शेणाचें खत (दर एकरीं ६ गाड्या) | ६७४ रत्तल |
| (ब) सॉल्ट पीटर (दर एकरीं ७६ रत्तल) शेणाचें खत (दर एकरीं ६ गाड्या) | ६३७ रत्तल |
| (क) मुळींच खत दिलें नाहीं अशा ठिकाणीं उत्पन्न. | ३१८ रत्तल |

सॉल्ट पीटर व नायट्रेट ऑफ सोडा यांच्या हल्लींच्या किंमती अनुक्रमें १९ रुपये व २१ रुपये हंड्रेडवेट प्रमाणें आहेत.

(८) मोठ मोठ्या गांवाजवळ सोनखत पुष्कळ मिळूं शकतें. व हें हल्लीं मिळत असलेल्या इतर खतांपेक्षां अतिशय स्वस्त खत आहे. कपाशीच्या पिकास हल्लीं मिळत असलेल्या मानानें शेणखत दिलें असतां हटकून नफा होतो. शेणखत व सोनखत कपाशीच्या पिकांस दिल्यानें काय परिणाम होतो, तें खालीं दिलेल्या माहितीवरून दिसून येईल (कपाशी नंतर एक वर्ष जवारी पेरून नंतर पुन्हां कपाशी पेरली. ज्या वर्षी जवारी पेरली त्या वर्षी खत दिलें नव्हतें.)

| | दर एकरीं कपाशीचें सरासरी उत्पन्न | दर एकरीं जवारीचें सरासरी उत्पन्न |
|---|---|---|
| शेणखत (दर एकरी ६ गाड्या) | ३९९ रत्तल | ४६० रत्तल |
| सोनखत (वरप्रमाणें) | ४८९ रत्तल | ४६० रत्तल |
| खत न दिलेल्या ठिकाणीं | ३२२ रत्तल | ३६० रत्तल |

(९) एकंदरीनें पाहातां पाऊस सुरू होण्यापूर्वी सुक्या जमीनींत कपाशी पेरणें फायदेशीर दिसतें कारण जुलै महिन्यांत पावसाळा पूर्णपणें सुरू होण्यापूर्वी झाडांचे वाढीस सुरवात होऊन जाते.

(१०) मध्यम जमीनींत पेरण्याकरितां सावनेर व लामकणसी ज्वारी, भारी जमीनींत पेरण्याकरितां चपटी जवार, व हलक्या जमीनींत पेरण्यास रामकेळ ज्वार ह्या जाती अतिशय उत्तम आहेत. तरी इतर जातीची ज्वारी न पेरतां ह्याच ज्वारीच्या जाती पेराव्या.

(११) हवामानाच्या व मजुरीच्या हल्लींच्या परिस्थितीस अनुसरून भुइमुगाचे लहान जपान नांवाचें—पीक पेरणें जास्त श्रेयस्कर आहे.

(१२) शेतकीच्या औजारांमध्यें निरनिराळे जमीनीस निरनिराळ्या कामाकरिता फिरत्या पंख्याचा, सब्बल लावलेला व मॉनसून नांवाचा असे तीन नांगर फार उपयोगी असल्याचें आम्हांस दिसून आलें. डौरणाकरितां आकोल्यास सरकारी शेतीवर तयार होत असलेले डवरे फार उपयोगी पडतात. कडबा कापण्याचे यंत्राचा बैलानें चालविण्याचें यंत्र जोडून उपयोग केल्यास कडब्याची शेकडा १०० नी बचत होते. कित्येक लोकांना कापण्याचे यंत्राचें महत्व समजूं लागलें आहे. शेतीखात्यामार्फत बसविलेल्या एंजिन व जीन पासून रोझीआ कापसाचें शुद्ध बीं वाढविण्याचें फार उपयुक्त काम होत आहे.

४ गुदस्तसालीं हंगाम विशेष बाईट असल्यामुळें सरकारी शेतीवर इतर ठिकाणीं पुरविण्यास जास्त बीं उत्पन्न झालें नाहीं. सध्याचा हंगाम सुद्धां १० आठवड्यांपूर्वी वाटत होता तितका समाधानकारक राहिला

नाहीं, तरी गुदस्त सालप्रमाणें नुकसान होण्यापासून यंदा आह्मांस फार्मचा बचाव करतां आला. आज सकाळीं आपण फार्ममधील रस्त्यांच्या बाजूनें ज्या नाल्या (गटारें) पाहिल्या त्या वाजवीपेक्षां जास्त झालेल्या पाण्याचा निझारा होऊन जावा व पृष्ठ भागावरील जमीन खरडकी जाऊं नये या उद्देशानें यंदा तयार केल्या. सारखे मोठ मोठे पाऊस पडल्यामुळें जेथें जमीन दलदलीची होऊन पाणी सांचून रहातें अशा ठिकाणीं कपाशीचे पिकास या नाल्यामुळें उवड उवड फार फायदा होतो. माझी अशी शिफारस आहे कीं, ज्यांना शक्य असेल त्यांनीं सुरवातीस या पद्धतीप्रमाणें आपल्या कपाशीच्या शेतांना नाल्या करण्याचें काम थोड्या प्रमाणावर तरी करून त्याचा अनुभव घेऊन पहावा. ह्या सुधारणे करितां ज्यांना जरूर असेल त्यांना सरकारांतून कर्जाची मदत घेतां येईल.

५ गेल्या १० वर्षांतील २ वर्षें हलकें, ५ वर्षें साधारण, व ३ वर्षें उत्तम पीक होतें; आणि ह्मणून आह्मीं जे प्रयोग करून पाहिले आहेत त्यांचें परिणाम चांगले व वाईट ही घेतले गेल्यामुळें अगदीं विश्वसनीय आहेत.

६ खामगांव जातीच्या गुरांचे जातींत सुधारणा करावी या हेतुनें १९१४ सालीं बोरगांव येथें फार्म स्थापन केलें. हें फार्म स्थापन करण्याचा मुख्य उद्देश असा आहे कीं, पैदास करणारे सांड तयार करून शेतकरी वर्गास ते पुरवावयाचे. आज सकाळीं आपण असे कांहीं नमुनेदार सांड पाहिलेच आहेत. अर्थातच हे सांड थोड्या प्रमाणावर पुरवितां येतील आणि ह्मणून ज्यांना ते विकत घ्यावयाची इच्छा असेल त्यांनीं आगाऊ मागणी करून ठेवावी. या फार्मचा उपयुक्त बीं पुरविणारें केंद्र, या दृष्टीनेंही बराच उपयोग होतो. व शिवाय अशा प्रकारें गुरांची पैदास व शेती हीं दोन्हीं कामें जेथें केलीं जातात अशा प्रकारची मिश्र शेती केल्यापासून कसे फायदे होतात हें दाखविणारा हें फार्म उत्तम नमुना आहे.

७ दुर्दैवानें गेलें व चालूं साल कपासी पिकणाऱ्या प्रदेशांस अनुकूळ नसल्यामुळें आमचें काम जास्त वाढविण्यास विशेषतः रोझिआचे बियांचा पुरवठा करण्यास त्यामुळें बराच व्यत्यय आला आहे. सदरहू रोझियाचे बियांची मागणी फार वाढली आहे, परंतु सीड फार्म व युनियन मधून शेतकरी वर्गास पुरविण्याकरितां जितकें बीं निघावयास पाहिजे तितकें निघूं शकलें नाहीं. सीड फार्म व युनियन मधून १६,३७,००० पौंड बीं दिलें गेलें. या शिवाय इतर मार्गांनीं वाटलें गेलेलें बीं १८,८४,००० रत्तल होतें, इतकें बीं वाटलें गेल्यामुळें त्यापासून ३,००,००० एकरांत रोझियाचा पेरा झाला असला पाहिजे. या शिवाय आह्मांस माहीत नसलेल्या मार्गानें उत्पन्न झालेलें बीं वाटलें जाऊन त्यामुळें आणखी जमीन रोझियानें पेरली गेली असेल ती निराळीच. ठोकळ मानानें रोझियाचे बियानें ७ लक्ष एकर जमीन पेरली असेल असा अंदाज करण्यास हरकत नाहीं.

८ या पेक्षांही जास्त बीं उत्पन्न करतां यावें ह्मणून तालुका असोसियेशनच्या मदतीनें आह्मांस हल्लींच्या पेक्षां अधिक सीड फार्म व युनियन स्थापन करितां आले.

| | १९१६-१७ सालीं | १९१७-१८ सालीं |
|---|---|---|
| रजिष्टर्ड आग्रिकल्चरल युनियन | १४ | २९ |
| अनरजिस्टर्ड आग्रिकल्चरल युनीयन | ३० | ३५ |
| सीड फॉर्म | १५७ | ३६३ |

हंगाम अनुकूल असता तर गुदस्त सालपेक्षां यंदा दुप्पटीनें जास्त बीं उत्पन्न करितां आलें असतें. परंतु आतां असें वाटतें कीं जर सीडफार्म व युनीयन मधील सर्व कापूस वटाविला गेला तर यंदा १५,००,००० रतल बीं उत्पन्न होईल व तें एवढ्या मोठ्या मागणीस मुळींच पुरणार नाहीं. सरकीच्या किंमती सुद्धां जास्तच राहतील. ह्मणून माझी आपणास अशी आग्रहाची विनंती आहे कीं, आपणांपैकीं, ज्यांचे ज्यांचे जवळ सध्या रोझियाचा कापूस असेल त्यांनीं त्यांनीं बीं विकण्याकरितां तो कापूस जरुर वटवून घ्यावा. रुई विकून टाकावी व सरकी स्वतः पेरण्याकरितां किंवा आपले शेजाऱ्या पाजाऱ्यांस पेरण्याकरितां विकण्यासाठीं राखून ठेवावी.

९ वणी तालुका खेरीज करून बाकीच्या सर्व तालुका असोशीयेशननीं पूर्वीपेक्षां यंदा अधीक चांगलें काम केलें आहे. परंतु असें ह्मणणें भाग आहे कीं, मेंबर लोकांस जास्त लक्ष घालण्यास लावण्याचें कामीं अद्याप बरीच सुधारणा करितां येण्याजोगी आहे. मुख्य अडचण ही आहे कीं, प्रत्येक तालूका असोशियेशनमध्यें शेतकी सुधारणा संबंधीं खरी कळकळ असणारे वजनदार पुढारी, निदान तीन किंवा चार तरी सभासद असावयास पाहिजेत. खामगांव असोशियेशनमध्यें आलेल्या अनुभवावरून असें दिसतें कीं, अशा पुढारी मेंबर लोकांच्या कळकळी पासून ह्या संस्था चांगल्या भरभराटीस येतील. १९१६ सालीं नाताळच्या सुट्टींत रावबहादूर के. जा. देशमुख, मेसर्स अणेकर व बोबडे, अग्रीकलचरल असिस्टंट व रेव्हिन्यु इन्स्पेक्टर इतकी मंडळी मिळून टर्नरेस्ट नांगर व उफणण्याचें यंत्र घेऊन ते कांहीं गांवीं गेले व तेथें त्यांनीं त्या यंत्राचा उपयोग लोकांस समजावून सांगून तीं अवजारें प्रत्यक्ष चालवून दाखविलीं. देशी नांगराचे जवळच त्यांनीं विलायती नांगर चालवून दाखविला व आसपासच्या जमलेल्या शेतकरी लोकांस शेतीच्या सुधारलेल्या पद्धतीबद्दल माहिती दिली. याचा परिणाम असा झाला कीं, (१) बरीच जागृती उत्पन्न होऊन १५४० रुपये किंमतीचे ३६ नांगर खपले व ७ नांगर सरा तीन माहिनेपर्यंत भाड्यानें दिले जात होते. त्या असोसिएशनला भाड्याचेंच उत्पन्न एकंदर १०२ रुपये झालें. (२) लोकांना रोझिया कापसाची, इतर बियांची, व औजारांची माहिती मिळाली. (३) व सर्वांत महत्वाची गोष्ट ही झाली कीं, सदरहू मंडळीस असोशिएशनच्या कामांत काय काय अडचणी येतात व खेड्यांतील लोकांची वास्तविक स्थिति काय आहे व त्यांचे विचार कसे आहेत तें कळून आलें. ह्याच प्रमाणें मलकापूर तालुक्यांत मि. संपतराव देशमुख यांनींही अशाच रीतीनें काम केलें आहे.

१० मी तहसीलदार लोकांकडे पाहून त्यांना अशी विनंती करितो कीं, आपण तालुका असोशिएशनचे चेअरमन आहांत. प्रत्येक तालुक्यांत आपण चालु सालीं सीड फार्मची संख्या वाढवून बरेंच उपयुक्त काम केलें आहे तरी वर दिलेल्या गोष्टीचा आपण मनापासून विचार करावा. व आपआपले असोशिएशनमध्यें वर सांगितल्या प्रमाणें वर्षांतून कांहीं थोडे दिवस तरी कळकळीनें काम करणारे मेंबर लोक घेण्याचा प्रयत्न करावा. मे. कमिशनर साहेब बहादूर आपल्या कान्फरन्सचे अध्यक्ष यांनीं केलेला उपदेश आपण नेहमीं ध्यानांत ठेवावा अशी माझी असोशिएशनचे सभासदांसहि विनंती आहे. तो उपदेश असा कीं "आपले कामाची प्रगति न झाल्यास लवकरच त्याची परागती होईल." "क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे" हें ध्यानांत ठेवावें.

११ सध्याचे प्रसंगीं असोशिएशननें करावयाचें मुख्य काम ह्मटलें ह्मणजे सीड फार्मची व युनियनची संख्या वाढविणें हें होय ह्मणजे त्यामुळें आपणास तालुक्यांतील सर्व कपाशीचे क्षेत्रांत पेरावयास पुरेल इतकें रोझियाचें बीं उत्पन्न करितां येईल. आपणांपैकीं पुष्कळांस माहीत आहेच कीं, अगदीं साधारण मानानें पाहिलें तरी रोझियाचे पिकापासून दर एकरीं गांवरानी कापसापेक्षां ३० रत्तल रुई जास्त निघते. (हल्लींच्या भावानें तिची किंमत सुमारें २० रुपये होईल). गुदस्त सालीं सीड फार्म व युनियनमध्यें १७३५९ एकरांत १६३७००८ रत्तल शुद्ध बीं विकल्यापासून ४९४७४ रुपये नफा झाला व जडीचे ऐवजीं रोझिया कापूस पेरल्यापासून व निघालेला सर्व माल वटविल्यापासून २,२५,८६७ रुपये नफा सहज मिळवितां आला. वरील आंकड्यावरून आपणास असें दिसून येईल कीं, सीड फार्मस झाल्यापासून आपला सांपत्तिक दृष्ट्या बराच फायदा होतो एवढेंच नाहीं, तर आपले शेजारी शेतकरी वर्गास रोझियाचें शुद्ध बीं पुरवून त्यांचेंही उपयोगी पडतां येतें.

१२ ह्या सर्कलांत एकंदर १०३५० रुपयांचीं अवजारें विकलीं गेलीं. त्यांत २०६ नांगर असून यापैकीं बहुतेक फिरत्या पंख्याचे (Turn wrest) नांगराचे फाळ १४२ खपले व इतरही नांगराचे भाग खपले. यावरून हे नांगर किती उपयोगांत आणले जात आहेत याची कल्पना होईल. सुधारलेलीं अवजारें खपविण्याचे कामीं तालुका असोसिएशना कडून जितका जास्त प्रयत्न होईल तितकें शेतकी पासून मिळणारे नफ्याचें प्रमाण वाढत जाईल. कारण (१) नांगरण्याचे खर्चामध्यें निम्मे बचत होईल. (२) कुंदा व हराळी सारखे त्रासदायक गवताचा समूळ नाश होईल. (३) जमीन चांगल्या स्थितींत राहील. (४) व निंदण्याचा खर्च पुष्कळ वांचेल. ह्या सर्व फायद्यामुळें हल्लीं मजुरीचे दुर्मिळते बद्दलचा मोठा प्रश्न सुटून, मजुरी बद्दल जी सर्वसाधारण हाकाटी आहे ती नाहींशी होईल. ह्या लेखाच्या आरंभीं इतर अवजाराचे चांगुलपणा बद्दल जें मी सांगितलें आहे, त्याची येथें पुन्हां आवृत्ति करण्याचें कारण दिसत नाहीं.

१३ गेल्या महिन्याचे १५ तारखेच्या सुमारास इंडीयन कॉटन कमेटी, अकोला येथील सरकारी फार्म आणि गायगांव व खामगांव येथील युनीयनें पाहण्यास आली होती. तिचा उद्देश हिंदुस्थानांत लांब धाग्याचे कापसाची पैदास करणें शक्य आहे कीं नाहीं, हें पाहण्याचा आहे. त्यांनीं कांहीं साक्षिदारांना माहितीही विचारली. तींत सर्वांनीं एकमतानें वऱ्हाडांतील शेतकरी वर्गास रोझिया कापूसच हल्लींच्या परिस्थितींत सर्वतोपरी फायदेशीर आहे यांत मुळींच संशय नाहीं असें सांगितलें. पण आपण हें नेहमी ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, रोझिया हा आखूड धाग्याचा कापूस असल्यामुळें हिंदुस्थानांतील कपाशीचें पीक होणाऱ्या महत्वाचे प्रदेशास निवळ हाच कापूस पेरणें मोठेंसें भुषणावह नाहीं. लांब धाग्याच्या कापसाची कमतरता असून आज खरेदीदार लोक ह्या कापसास जास्त भाव देण्यासही तयार आहेत. जरी जास्त किंमत मिळाली तरी आपले गांवरानी बनी कापसापासून फायदा होणार नाहीं, यांत संशय नाहीं. दुसरी बुरी नांवाची कापसाची जी जात आहे ती पासून अकोला फार्मवर साधारण खतवलेल्या शेतांत दर एकरीं ७०० पौंड उत्पन्न झालें हें ऐकून आपणांस नवल वाटेल. एकच परिस्थितींत चालूं सालीं या कापसाचें उत्पन्न रोझिया कापसाच्या दुप्पट झालें. गुदस्ताचें साल गावरानी कापसास वाईट होतें व यंदाचें तर अगदींच वाईट होतें. परंतु हीं दोन्ही वर्षें बुरी कापसास अगदीं अनुकूल असीं होतीं. सहा वर्षांपूर्वीं हा कापूस सर्व जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर पेरून पाहिला होता आणि आपणापैकीं बऱ्याच लोकांना माझ्या प्रमाणेंच कबूल असेल कीं, जास्त किंमत मिळाल्यामुळें हा कापूस पेरणें खालील परिस्थितींत फायदेशीर असतें. (१) ज्या जमिनीस वाळवी लागली आहे त्या जमिनींत व विशेषतः चांगल्या खतविलेल्या जमिनींत (२) गांवा जवळील आखरांत (खारी जमिनींत) (३) पांढरे जमिनींत (४) पुरानें वाहून आलेल्या गाळाचा थर ज्या जागेंत बसतो अशा नाल्याच्या किंवा नदीचे कांठीं असलेल्या मळी जमिनींत (५) व ज्या जमिनींत पाणी सांचून राहतें अशा खतविलेल्या जमिनींत. जास्त भाव मिळाल्यास विहिरीच्या पाण्यानें भिजूं शकणारे (पाण भराऊ अगर बागायती) जमिनींतही ह्या कापसाची लागवड करितां येईल.

दोन तीन वेळ पाणी दिल्यास ह्यापासून दुसरा वेचा समाधानकारक येईल. बुरीचें बीं जास्त मिळूं शकत नाहीं तरी पण प्रत्येक जिल्ह्यांत नमुन्याकरितां व सीड फॉर्म करितां बीं पुरविण्याची मी व्यवस्था करीन. ह्मणजे तेथील पीक आपल्या नजरेस वारंवार पडून त्यापासून आपणास जास्त माहिती मिळेल. ज्या लोकांस हा कापूस पेरून पाहण्याची इच्छा असेल त्यांना हें सांगणें जरूर आहे कीं त्यांनीं आपले शेतांत चांगलें खत दिलें पाहिजे.

१४ सर्कल कमेटीनें आखून दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणें शक्य तेवढे चांगले रीतीनें काम करण्याचा प्रत्येक असोशीयेशनच्या मेंबरांनीं प्रयत्न करावा अशी मी पुन्हां विनंती करितों. शेतीच्या सुधारणेकरितां खर्चलेले श्रम व पैसा हीं तुमच्या फायद्याकरितांच आहे. शेतींतून उत्पन्न होणाऱ्या सर्व जिनसास हल्लीं चांगला भाव असून, लढाई संपल्यानंतरही कांहीं वर्षेपर्यंत हे भाव असेच टिकून राहतील. ह्मणून आपणांस अनुकूल असलेल्या सर्व साधनाचा उपयोग करून आपली जमीन चांगल्या रीतीनें तयार करून, तींतून जितकें ज्यास्त पीक घेतां येईल तितकें जास्त घेण्यास मनापासून झटा. त्याच प्रमाणें आपले शेजारी शेतकऱ्यांसही असेंच करण्यास सांगा. सुधारलेलीं अवजारें व चांगलें बीं त्रियाने विकत घेण्याकरितां तुह्मांस मदत व्हावी ह्मणून सरकारनें तगाईच्या मोठमोठ्या रकमा मंजूर केल्या आहेत. ज्यांना अशा मदतीची जरूर आहे त्यांनीं ह्या सवलतीचा फायदा घेण्याकरितां आपले जिल्ह्याचे अग्रीकलचरल असिस्टंट यांजकडे परभारे अर्ज करावा ह्मणजे ते तुह्मांस पाहिजे असेल तें सामान पुरविण्याची व योग्य वेळांत तुह्मांस तगाई देवविण्याची व्यवस्था करितील.

१५ शेवटीं सर्व मुलकी अधिकाऱ्यांनीं आह्मांस आमचे कामांत जी अमोलिक मदत दिली ती बद्दल मी त्यांचे आभार मानतों. वाशीम तालुक्याचे मि. डी. एम् नारगोलवाला, मुर्तिजापुरचे मि. गो. भ. देशपांडे, आकोटचे मि. चिटनीस व उमरावतीचे मि. धातरक यांनीं जी आह्मास मदत दिली तिजबद्दल त्यांचीं नांवें प्रामुख्यानें नमुद करणें जरूर आहे. बीनसरकारी मंडळीमध्यें खामगांवचे रावबहादूर केशवराव जानराव देशमुख, चांदूर येथील मि. डोकस वकील व मुर्तिजापूर येथील मि. बळवंत मोरेश्वर पंडित यांनीं आपापले तालुका असोसियेशनच्या कामांत फार लक्ष लावून काम केलें आहे.

त्याचप्रमाणें मि. काशिनाथ श्रीराम जठार डेप्युटी कमिशनर साहेब, मि. डोंगरे एक्स्ट्रा ऑसिस्टंट कमिशनर साहेब व मि. डी. ई. संजाना तहशिलदार साहेब यांनीं या प्रदर्शनाची व कान्फरन्सची व्यवस्था करण्यांत जी मदत दिली तिज बद्दलही मी त्यांचा फार आभारी आहें. तसेंच स्वागत कमेटीचे सभासदांनीं आपली सर्वांची घरच्या सारखी येथें सोय ठेविली तिजबद्दल मी व आपणही सर्वांनीं त्यांचेही आभार मानणें जरूर आहे.

---

वऱ्हाडसमाचार

मार्गशीर्ष शुद्ध ४ पिंगल संवत्सर १८३९

## राष्ट्रदिन.

### (‘ अवर डे ’ ची मंगल ग्रंथी.)

संकट वेळा हा एक अद्भुत जीवन रसच होय. यानें प्रेमाचीं माणसें एकवटतात, अंतःकरणांतील भेदक गोष्टी मनुष्य विसरतो आणि या महायुद्धाच्या रसायन क्रियेनें ब्रिटिश साम्राज्याचीं अंगभूत राष्ट्रें कशी विलक्षण एकजीव ओजस्वी व सर्वस्व दानीं तन्मय झालीं आहेत हें पहा! गेला सप्ताह विशेषतः १२ डिसेंबरचा मंगल दिन आमच्या सर्व राष्ट्रांत इतका गजबजून गेला आहे कीं असा नानाविध अंतःकरणाचा देखावा इतिहासकारांस क्वचितच लिहावयास मिळाला असेल. इंडियन राष्ट्राच्या कोणत्या भागांतील कोण कोणत्या गोष्टींचें वर्णन करावें हें पाहतांना आह्मी पत्रकर्ते अगदीं निःशब्द होतो.

समारंभांत आमचा अधिकारी वर्ग देखील राजकीय सोवळे विचार बोलूं लागून स्वराज्याची मागणी करूं लागला आहे आणि आमच्या जिल्ह्याचे मुख्य अधिकारी राजश्री बापू साहेब जठार हे असल्यामुळें इकडील समारंभाला विलक्षण स्फूर्ति आली होती. या समारंभाचे मुख्य अध्यक्ष रावबहादुर ढोबळे साहेब यांना या कामीं सुंदर यश लाभलें आणि लढाईंतल्या लोकांना मदत ह्मणून फंड गोळा करणाऱ्या या समारंभ कमिटीनें लोकांमध्यें विविध जागृती केली आणि हंसतें हंसत लोकांनीं वर्गण्या दिल्या. या जिल्ह्याकरितां अंदाजानें १८ हजारांची रकम बसविण्यांत आली होती; पण या अंदाजाबाहेर फंड जमत चालला आहे ही आनंदाची गोष्ट होय.

‘ अवर डे ’ ची द्रव्यदृष्टी कुबेराला देखील नाचवील आणि मग आमचे विद्यार्थी मर्दुमकीचे पोवाडे गाऊं लागतील, अधिकारी या नव्या क्रांतीचा उपदेश सांगूं लागतील, जन समाज नायकिणीच्या गाण्याला भुलून अपली थैली खुली करील, जुगाराचे खेळ व विद्यार्थ्यांचीं नाटकें रंगभूमीवर उल्हासानें होऊं लागतील यांत नवल तें कसलें? नेहमींचा तारतम्यभाव निराळा आणि अशा संक्रमण कालाचा अद्भुत प्रभाव निराळा. कोणत्याही गोष्टींत अतिरेक झाला तरी ती लीलाच वाटेल आणि येथें बरें वाईट ह्मणण्याची जनपद्धति अगदीं चुकीची ठरेल. अंतःकरणांचा विकास हें अमृतफळ परिणामीं लाभणार आहे अशा संस्कृतीच्या दृष्टीनेंच आह्मी सर्व गोष्टींचें अभिनंदन करण्याचें शील बनवीत चाललों आहों.

---

## सक्तीचें प्राथमिक शिक्षण.

मि. मांटेग्यु साहेबांच्या पुढें सादर करण्यांत येणाऱ्या हिंदी राज्यपद्धतीच्या योजना हा एकच विषय सध्यां हिंदुस्थानच्या लोकांचें सगळें चित्त आकर्षून घेत आहे. आतांपर्यंत जेवढ्या योजना त्यांच्यापुढें मांडण्यांत आल्या, त्यांतल्या पुष्कळशा कांग्रेस—लीगच्या योजनेंत कमजास्त फेरफार करून तयार केलेल्या आहेत, फक्त युरोपियन लोकांनीं तयार केलेल्या योजना मात्र कांग्रेस—लीगच्या योजनेला विरोध करणाऱ्या आहेत. या योजनांच्या खालोखाल लोकांचें चित्त वेधणारा विषय ह्मणजे सध्याची विलक्षण महागाई, सक्तीचें प्राथमिक शिक्षण आणि अलीबंधूंची सुटका करण्याविषयीं सरकारास प्रार्थना हे होत. पैकीं महागाईचा प्रश्न अतिशय बिकट व गुंतागुंतीचा असून सरकारचें लक्ष तिकडे वेधण्यासाठीं व लोकांवरलें संकट निवारण करण्यासाठीं काय करावयास पाहिजे या गोष्टीचा विचार तातडीनें होणें जरूर आहे आणि यंदाची कांग्रेस हा विषय हातीं घेऊन त्या संबंधानें सरकारास कांहीं उपाय सुचवील तर कांग्रेसनें एक सार्वजनिक हिताचें महत्कृत्य केले असें होऊन गरीब रयतेची पूर्ण सहानुभूति त्या संस्थेला असेल. अशी लोकप्रियता मिळविण्याची सोन्यासारखी संधी कांग्रेसचे चालक हातची दवडणार नाहींत अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे.

सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न हिंदुस्थानच्या शाश्वत हिताचा आहे. मुंबईस औद्योगिक कमिशनपुढें झालेल्या बहुतेक सर्व साक्षीदारांच्या जबान्यांचें सार हें होतें कीं हिंदुस्थानांतल्या कारागीर व मजूर वर्गाला प्राथमिक शिक्षण मिळेल तर त्यांच्या हातून हल्लीं पेक्षां पुष्कळ अधिक व चांगलें काम निघून हिंदुस्थानच्या औद्योगिक प्रगतीस त्यापासून पुष्कळ साह्य होईल. सक्तीच्या शिक्षणाच्या बाबतींत सात आठ वर्षांपूर्वीं सरकारी अधिकाऱ्यांच्या मनांत जे दुराग्रह होते ते ही आतां बरेचसे कमी झाले आहेत. ना. गोखल्यांनीं सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या बाबतींत कायदे करण्यासाठीं वरिष्ठ कायदे कौन्सिलापुढें बिल आणिलें होतें त्यावेळचा अधिकारी वर्गाचा विरोध आतां राहिला नाहीं. त्या वेळचे सरकारी अधिकाऱ्यांचे वाकूताण निष्फळ झालेले आहेत हें गेल्या आठवड्यांत मुंबईच्या प्रांतिक कौन्सिलांत ना. मि. पटेल यांनीं आणिलेलें बिल पास झालें यावरून सर्वांना कळून चुकलें आहे. लवकरच इतर प्रांतांतले बिनसरकारी कौन्सिलचे सभासद ना. मि. पटेल यांचें अनुकरण करतील अशी सुचिन्हें दिसत आहेत. ना. मि. पटेल यांचें बिल ३८ विरुद्ध २ मतांनीं पास झालें यावरून लोकमताचा व सरकारी अधिकाऱ्यांच्या मताचा वारा हल्लीं कोणत्या दिशेनें वहूं लागला आहे याचा अंदाज कोणाला ही सहज करतां येईल. मि. फिशर यांनीं विलायतेंत जें शिक्षण विषयक बिल आणिलें आहे व ज्याचा बहुमान तेथील लोकमतानें उत्साहपूर्वक केला त्या बिलाचा ही प्रभाव ना. मि. पटेल यांच्या बिलाचा विचार करणाऱ्या सिलेक्ट कमिटीवर पडलेला दिसतो. अल्पवयी मुलांना कारखान्यांतून काम करण्यास लावण्याचा प्रघात अजीबात बंद करण्याचा मि. फिशर यांच्या बिलाचा एक उद्देश आहे. हें धोरण लक्षांत ठेवूनच ना. मि. साठे यांनीं इकडे ही जो कोणी मनुष्य जाणून बुजून व स्वतःच्या फायद्यासाठीं सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्याप्रमाणें शाळेंत जाण्याच्या वयाच्या मुलाला कामावर लावील तो गुन्हेगार समजून २५ रु. दंडास पात्र होईल अशी सुधारणा सुचविली व ती त्यांची सूचना पास ही झाली. मुंबई सरकारनें खर्चाच्या सबबीवर आपल्या बिलाला विरोध करूं नये ह्मणून ना. मि. पटेल यांनीं आपल्या बिलांत सदर शिक्षणाच्या खर्चाचें ओझें सरकारी तिजोरीवर पडूं नये अशी तजवीज केली होती, पण हिंदुस्थानसरकारानें बिलांतला तेवढा भाग काढण्यास लावून उलट त्या खर्चाचा कितवा अंश सरकार आपलेवर घेईल तें ठरविण्याचें प्रांतिक सरकाराकडे सोंपविण्यासारखे शब्द बिलांत घालावयास लाविले आहेत हिंदुस्थानसरकारच्या या उदार धोरणावरून युद्धोत्तर काळीं या बाबतींत सरकार सक्तीच्या शिक्षणाच्या खर्चाची जोखीम स्वतःवर घेण्यास तयार होईल अशी उमेद वाटूं लागली आहे.

---

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या आठवड्यांत पश्चिम रणक्षेत्रांत घडलेल्या विचित्र व अकल्पित घटनेवरून हें आतां निश्चित झालें आहे कीं मित्रराष्ट्रांवर सध्याचा प्रसंग अत्यंत आणीबाणीचा आहे. गेल्या तीन महिन्यांच्या अवधींत अतिशय महत्त्वाचे असे दोन विजय शत्रूला मिळाले. पैकीं एक राशियांत जर्मनीच्या कारस्थानानें मिळवून दिला. जर्मन विघ्नसंतोषी लोकांनीं राशियांत आपापसांत लाथाळी लावून देऊन राशियाचें घर बुडविलें, आणि बोल्शेविक लोकांना यांच्या योगानें वश करून घेऊन त्यांच्याकडून राशियाचें अंग युद्धांतून काढून घेवविलें. रूमानियानें ही तोच मूर्खपणा केला. दुसरा जर्मनीचा विजय ह्मणजे इटालियन रणक्षेत्रांत व्हेनिसपासच्या प्रदेशाचें आक्रमण हा होय. तेथें ही मित्र राष्ट्रांना अतोनात नुकसान सोसावें लागलें. इटालीच्या रक्षणार्थ त्यांनीं माणसें, दारूगोळा व हत्यारें इतकी पाठविलीं कीं तीं पश्चिम रणक्षेत्रांत यावेळीं असतीं तर फार कामीं पडतीं. सध्याची राशियाची स्थिति अत्यंत चंचल आहे. घटकेचा भरंवसा नाहीं. पण येवढी गोष्ट स्पष्ट आहे कीं आतां जरी राशियाची स्थिति सुधारली तरी त्यापासून मित्र राष्ट्रांना कांही मात्र उपयोग होणार नाहीं. शत्रूला आपलें सैन्य आतां पूर्वेकडून पश्चिमेकडे व पश्चिमेकडून पूर्वेकडे हवें तेव्हां नेण्यास मुक्तद्वार झालें आहे. आतां मेसोपोटेमियांत किंवा पालेस्टैन मध्यें तुर्क लोकांना कुमक पाठविण्यास शत्रूला कोणतीच अडचण राहिली नाहीं. इतकेंच नाहीं तर जर्मनीची मोठी

अडचण ह्मणजे धान्याच्या पुरवठ्यांत पडणारी तूट, ती सुद्धां आतां राशीयाच्या साह्यानें भरून काढण्यास जर्मनी कमी करणार नाहीं. ज्या इंग्लंडनें व फ्रान्सनें राशीयाला ऐन संकटाच्या वेळीं द्रव्य, व दारूगोळा पुरवून साह्य केलें त्यांचे उपकार त्यानें अशा रीतीनें फेडले ! स्वतःचें नाक कापून दुसऱ्याला अपशकून करण्यासारखी राशीयाची ही कृति आहे. अंतःकलहाच्या योगानें त्यानें स्वतःस तर बुडविलेंच पण मित्र राष्ट्रांना ही संकटांत घातलें. जर्मन केसरचे ग्रह सध्या उच्चीचे दिसतात. त्याची महत्त्वाकांक्षा पुरी करण्याचें जणूं काय त्या ग्रहांनीं मनावरच घेतलेलें आहे. राशीयाच्या विरुद्ध तक्रार करण्यास इंग्लंड व फ्रान्स यांना तर पुष्कळच कारणें आहेत, पण इटलीला ही योग्य सबब आहे. इटलीवर गेल्या महिन्या दीड महिन्यांत जो दुर्धर प्रसंग ओढवला आहे त्याला कारण राशिया आहे. तसेंच रूमानियाला त्याच्या इच्छेविरुद्ध युद्धातून पाय काढावा लागत आहे तो सुद्धां राशीयामुळेंच. एवंच आतां यापुढें एका बाजूस जर्मनी, आस्ट्रिया व बल्गेरिया, आणि दुसऱ्या बाजूस इंग्लंड व फ्रान्स याच्या मध्येंच युद्ध राहणार. कारण, इटलीची मदत मित्र राष्ट्रांना आतांपर्यंत ही फारशी झाली नाहीं व पुढें ही होण्याचा संभव दिसत नाहीं. अमेरिकेची मदत मित्रराष्ट्रांना करून घेतां येईल तो दिवस अद्याप उगवावयाचा आहे. इंग्लंड व फ्रान्स यांचें निश्चयाचें बळ जबर असल्यामुळें युद्धाच्या अखेरच्या निकालाविषयीं संदेह नाहीं; तरी पण अलीकडे शत्रूचें बळ वाढलें आहे ही गोष्ट विचारांत घेण्यासारखी आहे। राशियानें हातपाय गाळल्यामुळें व काहीं लोकांच्या मित्र द्रोहांमुळें जर्मनीला पूर्वेकडे हातपाय फैलावण्यास जेवढी ह्मणून संधी मिळेल तेवढी साधण्यास ती कमी करावयाचा नाहीं. अमेरिकेची मदत मिळण्यास अजून एक वर्ष पाहिजे. तेवढा काळ इंग्लंड व फ्रान्स स्वतःच्या हिंमतीवर काढण्यास समर्थ आहेत. तथापि मधून मधून तहाच्या गप्पा उठतात व चांगले शहाणे ह्मणविणारे त्यांना भुलून वेड्यासारखें लिहीत किंवा बोलत सुटतात हें काहीं चांगलें लक्षण ह्मणतां येत नाहीं. जर्मन द्रव्याला वश होऊन मातृभूमीच्या गळ्यावर सुरी चालविणारे नीच प्रवृत्तीचे लोक ही थोडे पण आहेत. सारांश, जर्मनीला अनुकूल अशी परिस्थिति सध्या प्राप्त झाली आहे. तिचा फायदा ते कसा काय घेतात व युद्धावर त्याचा परिणाम काय घडतो इकडे आता साऱ्या जगाचे डोळे लागले आहेत.

## पश्चिम रणक्षेत्र.

या रणक्षेत्रांत क्याम्ब्रेपाशीं जनरल बिंग यांनीं महत् परिश्रमानें मिळविलेल्या जयावर एका क्षणांत शत्रूंनीं पाणी फिरविलें या गोष्टी मुळें पुष्कळांचा गैरसमज झाला आहे व ज्याला अंतर्गत गोष्टीची माहिती नाहीं त्यांचा वरवर पाहण्यानें तसा गैरसमज होणें स्वाभाविक ही आहे. क्यांब्रे व इतर ठिकाणें घेण्याचा इंग्रजांचा उद्देश होता व त्याप्रमाणें तीं ठाणीं त्यांनीं घेतलीं व लागलीच हातचीं घालविलीं येवढें पाहणारे जे आहेत त्यांना परिस्थितीचें यथार्थ ज्ञानच झालें नाहीं असें ह्मटलें पाहिजे. ह्या ठाण्यांचें खरोखर महत्त्व नाहीं; तर जर्मन लोकांनीं आपली मजबुती करण्यासाठीं जे बेत योजिले होते ते अचानक छापा घालून व शत्रूची फळी फोडून उलथून पाडणें या गोष्टीचें खरें महत्त्व आहे व हें काम बिंग यांनीं उत्तम प्रकारें केलें. मागाहून घडलेल्या प्रकारानें त्या कामाचें महत्व कमी होत नाहीं. जनरल बिंग यांच्या विजयानें इटलीचा सत्यानास टळला ही गोष्ट कांहीं कमी महत्त्वाची नाहीं. जर्मनीला तात्पुरतें तरी इटलीकडचें लक्ष काढवें लागलें. आपल्या मित्रावरलें संकट टाळण्याचें श्रेय तरी त्यामुळें ब्रिटनला मिळवितां आलें.

## महत्त्वाच्या बातम्या.

आजपर्यंत रशियन सरकारनें परराष्ट्रांचें काढलेलें सर्व कर्ज नव्या सरकारनें रद्द केलें असून त्यावर व्याज देण्याचें बंद केलें आहे असा जाहिरनामा काढला असल्याचें डेली टेलिग्राफचा पेट्रोग्राडचा बातमीदार ह्मणतो.

आस्ट्रिया हंगेरीविरुद्ध युद्ध जाहिर करण्याच्या ठरावावर अमेरिकन प्रेसिडेंट डॉ. विल्सन यांची सही झाली.

पोर्तुगालच्या सरकारी सैन्याची व क्रांतिकारक सैन्याची तीन दिवस लढाई चालून अखेर सरकारी सैन्यानें रक्तपात टाळण्यासाठीं लढाई बंद केली.

जनरल ॲलेनबी यांनीं जरुसेलमला वेढा घालून अखेर तें घेतलें. तें घेण्यांत विलंब झाला त्याचें कारण असें सांगण्यांत येतें कीं तेथील पवित्र स्थानांचा नाश होऊं नये ह्मणून विशेष खबरदारी घेण्यांत आली.

अमेरिकेच्या आरमाराची सुधारणा करण्यासाठीं १० कोट डॉलरची मंजुरी तेथील सरकारनें तूर्त दिली आहे.

✓ बॉंबे क्रॉनिकल पत्राकडून मुंबईच्या चीफ प्रेसिडेन्सी म्याजीस्ट्रेट साहेबांनीं २ हजार रुपयांची रकम जामिनकीबद्दल ठेवण्याविषयीं मागणी केली आहे.

लॉर्ड ल्यान्सडौन यांच्या पत्रांत निराशेची छटा असून अमेरिकेचे प्रेसिडेंट डॉ. विल्सन यांचे संदेशांत निश्चयाचा जोर आहे अशी लोकांची झालेली समजूत चुकीची आहे, लॉर्ड ल्यान्सडौन यांचें ही मत युद्धांत जय मिळवून त्याचा अंत करण्यासाठीं जोरानें व निश्चयानें लढावें असा आहे असें लॉर्ड राबर्ट सेसिल यांनीं रूटरच्या बातमीदारास सांगितलें.

✓ हिंदुस्थानातल्या राजद्रोही चळवळीसंबंधानें तपास करून त्यांचें स्वरूप व विस्तार, त्या दाबून टाकण्याचे कामीं येणाऱ्या अडचणी व त्या संबंधानें कायद्यांत सुधारणा करण्याची अवश्यकता आहे कीं काय याची चौकशी करण्यासाठीं नेमिलेल्या कमिटींत विलायतेंतले जास्टिस रोलाट (अध्यक्ष) व सर बेसिल स्कॉट, दि. ब. कुमार स्वामी शास्त्री सर वेर्नें लव्हेट, मि. प्रभासचंद्र मित्र, व मि. हॉज (सेक्रेटरी) यांची नेमणूक झाली आहे. ही कमिटी जानेवारी १९१८ मध्यें कामाला सुरुवात करणार आहे.

# वऱ्हाडवृत्त.

'शीलं परं भूषणम्' ही काव्यमय नाटिका आकोटच्या विद्यार्थ्यांनीं येथील 'अवर डे'च्या रंगभूमीवर करून दाखविली. हा एवढा उत्कृष्ट प्रयोग येथील नाटक करणाऱ्या प्रौढ गुलहौसी मंडळीला देखील लाजवील. रिस्ले सर्क्युलरानें शिष्टरंजनाचा विद्यार्थ्यांना हा नवाच प्रांत दिला आहे.

**रिक्रूटिंग नाटकः—** शनिवारीं रिक्रूटिंगचें नाटक उमरावतीच्या इस्लामी मंडळींनीं करून दाखविलें. ही ग्रंथ रचना काजी जैनुल आबदीन यांची असून लोकांचीं मनें रिक्रूटिंगकडे वळविण्यासाठीं हा निमसरकारी प्रयत्न चालू आहे.

**धन्यवादः—** रिक्रूटिंगच्या नाटकाच्या उभारणीला मेहरबान बशिरुद्दीन साहेब यांनीं १ हजार रुपये सरकारच्या स्वाधीन केले. या त्यांच्या सार्वजनिक कामाबद्दल खुद्द राजश्री स्टँडन कमिशनर यांनीं वरील नाटकाच्या प्रयोगाच्या वेळीं जाहीर गौरव केला. लढाईला ही मदत असून सरकारच्या स्मरणांतून जाण्यासारखी नाहीं.

**मानाचा लिलावः—** एक कापसाची गठडी परवा शुक्रवारीं अवर डे कमिटीनें लिलावांत काढली. जो लक्ष्मीपुत्र अधिक किंमत देईल त्याला सरकारांतून रेड क्रासचा सन्मान मिळेल. या सन्मानाच्या ईर्षेनें आकोल्याचे बजारांत दहा हजारा एवढी रकम आली, हा आकोल्याचा लौकिक होय.

**अग्रपूजाः—** लढाईच्या कामाला आम[illegible] मोठी दिली [illegible] रिक्रूटिंगमध्यें ही या जिल्ह्याचा १ ला नंबर आहे.

**शेतकी परिषद्ः—** शेतकी परिषदेची वार्षिक बैठक 'अवर डे' समारंभानिमित्त काल रोजीं भरली होती. त्या संबंधापैकीं एक सरकारी रिपोर्ट आला असून अलाहिदा रकान्यांत छापलाच आहे. राजश्री स्टँडन साहेब हे मुद्दाम या कार्यानिमित्त आज ३ दिवस येथें आहेत.

मराठा शिक्षण परिषदेचें अध्यक्षस्थान यंदा करवीरचे श्रीमंत शाहू छत्रपती महाराज सुशोभित करणार आहेत ही गोष्ट या परिषदेचा उत्कर्ष व भरभराट ध्वनित करते.

---

## जाहिर नोटीस

मातोश्री साकिना बी मर्द शेखसजन पिंजारी राहणार नांदुरा खुर्द ता मलकापूर जि. बुलढाणा

इसः—

खालीं सही करणार यांजकडून या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं माझा बाप मरण पावला त्याची तूं विधवा आहेस. ह्मणून माझी तूं सावत्र आई असून मी तुझे आजपावेतों संगोपन उत्तम प्रकारें सन १९१५ पर्यंत केलें, परंतु आतां तुजला लोकांनीं फरेप दिल्यामुळें चार पंचांत निकाल करून तुझे पासून ता. ८-६-१९१५ रोजीं एक शेत वाहण्यास देऊन करारनामा व शेताचा कौलपट्टा करून घेतला. त्या कौलाच्या प्रमाणें व कराराप्रमाणें तूं वर्तन करीत नाहीं. यासाठीं या नोटिशीनें तुजला कळवितो कीं तुजपाशी असलेले दागीने व आमचे ताब्यांतील घर व शेत कोणास लबाड लोकांचे संमतीनें कोणतेच प्रकारे लेख करून देऊं नये. तुह्मास महमदी शास्त्राप्रमाणें कांहीं करतां येत नाहीं. तुमचा अन्नवस्त्राशिवाय कांहीं हक्क नाहीं. जर या नोटीशीला एकीकडे ठेऊन कोणताही दस्तऐवज करून दिला तर त्याचा बोजा इस्टेटीवर राहणार नाहीं. तो दस्तऐवज कायद्यानें रद्द आहे व तुह्मास दागीने भांडींकुंडी विकण्याची सक्त मनाई आहे ही नोटीस दिली. मु० आकोला ता० २३-११-१७ इ. सही

शेख पीरन शेख सजन पिंजारी
रा० नांदुरा खुर्द द० खु०

नो. नं. ५०३

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस या नोटिशीनें जाहीर करण्यांत येते कीं मैनाई मर्द नारायणसा बिजवे तेली रा० कुरम ता० मुर्तिजापूर ही मझी साक्षांत चुलती असून माझा चुलता नारायणसा वा रूगसा तेली रा० कुरम याची वाडीलोपार्जित जिनगी शेतें ३ व दोन घरें आहेत. त्याचे मरणानंतर शेते मैनाई इचे नावानीं झालें. व त्याप्रमाणें हल्लीं सदरहू शेतें मौजे कुरम येथील मैनाईचेच कबज्यांत आहे व घरें ही आहेत. व खरोखर मैनाई इचा हक्क अन्नवस्त्राचा व जोपावेतो जिवंत आहे तोंपावेतो उपभोग घेण्याचा आहे. असे असतांना मैनाई [illegible] एक शेत व घर विकण्यास [illegible] १० [illegible] ऐकण्यांत आले करितां सर्वत्र लोकांस या नोटिशीनें कळवितो कीं मैनाई मर्द नारायणसा तेली रा० कुरम इचेपासून माझे संमतिशिवाय शेतें व घरें गहाण खरेदीवगैरे कोणत्याच तऱ्हेचा व्यवहार करूं नये केल्यास रद्द असे कळावें तारीख १५।१२।१७ इ० सही

मोतीसा वा चिंतामणसा तेली द० खुद
C/o धनसा तेली पोलीस स्टेशन
नो० नं० ५०४ कारंजा

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार यांजकडून जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, माझा चुलत भाऊ जैनारायण रामकुवार मारवाडी ब्राह्मण राहणार सांगवी खुर्द ता. आकोला हा मरण पावला आहे, त्याची स्थावर इस्टेट त्याची बायको जिवनीबाई इचे ताब्यांत आहे. तिचा हक्क शेती वाहून खाण्याचा आहे, तिला शेतीची अफरातफर करण्याचा मुळींच हक्क नाहीं. तरी तिचे जवळून माझा चुलत भाऊ जैनारायण याची स्थावर इस्टेट गहाण, खरीदी अगर बक्षीस, व १ वर्षावर पट्यानें घेऊं नये. घेतल्यास त्याचे पैशाची जबाबदारी मयत जयनारायण याची इस्टेट होणार नाहीं कळावें तारीख २९-११-१७ इसवी सही

१ मुरलीधर लक्ष्मीनारायण मारवाडी ब्राह्मण राहणार सांगवी खुर्द
ता. अकोला नि. खुद आंगठा

नो. नं. ५०५

## नोटीस

**नोटीस कलम ११ आक्ट ८ सन १८९० प्रमाणें.**

कि. दि. मुकदमा नंबर १२४ सन १९१७ इ. विद्यमान डिस्ट्रिक्ट जज्ज साहेब यांचें कोर्ट मुक्काम आकोला पश्चिम वऱ्हाड

नांव लक्ष्मण आपा

बापाचें नांव महादापा कानडी

जात —— राहणार कनेरगांव तहसील इंगोली जिल्हा परभणी

ज्या अल्पवयी जानाबाई मर्द सखाराम उमर वर्षे १०

राहणार शिरपूर ता. वाशीम तहसिलीचे (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालनकर्ता (१) नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं—

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचे (२) इस्टेट रक्षण करण्यासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदर्हु अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख २६ माहे १ सन १९१८ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यांस जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांच्या जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडरच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे. १९१८ त्यांस असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख ७ माहे १२ सन १९१७ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशीं दिली

सही

W. R. Dhobley

डि. जज

पश्चिम वऱ्हाड

नो. नं. ४९७ आकोला

---

विक्री संबंधी

# जाहीरात.

**(आकोला प्रांत वऱ्हाड येथील मौल्यवान स्थावर जिनगी संबंधानें विक्री.)**

विद्यमान नामदार हायकोर्ट ऑफ ज्युडिकेचर मुंबई.

ओ. ओ. सी. जे.

दिवाणी दावा नंबर ३१९ सन १९१४

१ जेमसेटजी होरमसजी बिलिमोरिया पार्शी

२ हरमसजी जमसेटजी बिलिमोरिया पार्शी

३ मकनजी जगजीवन हिंदू तिघेही भागीदारींत मर्चंट्स् व्यांकर्स व कमिशन एजंटस् म्हणून व्यवहार करणारे असून त्यांच्या पेढीचें नांव जे. एच. बिलिमोरिया आणि को, दुकानाचा ठिकाण अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

वादी

विरुद्ध

१ टीकमदास सदाराम

२ फोजमल गुलाबचंद

३ रामगोपाळ बिहारीलाल

सर्वजण हिंदू असून मर्चंट व श्राफ असून त्यांच्या व्यवहाराची दुकानें विठ्ठलवाडी; मुंबई येथें भोतीलाल तेजमल या नावानें आकोला येथें टीकमदास तेजमल या नांवानें, आणि खामगांव येथें श्रीराम रामगोपाळ या नांवानें आणि या शिवाय इतर ठिकाणीं निरनिराळ्या भिन्न नांवाखालीं.

प्रतिवादी

वरील दाव्यांतील वादींनें दिलेल्या अधिकारान्वयें खालीं सही करणार यांजकडून शनीवार ता० २२ डिसेंबर १९१७ रोजीं २ प्रहरीं ४॥ वाजतां (स्टँडर्ड टाइम) मुंबई येथील मेडो स्ट्रिट मधील नंबर ९२ येथें असलेल्या लिलावाच्या कमऱ्यामध्यें लिलाव करण्यांत येईल.

वऱ्हाडांतील आकोला तहसिलींतील आकोला येथील मौजे ताजनापेठ येथें अपलेला बंगला, औट हौसेस इत्यादि मौल्यवान पुढें वर्णन केलेल्या स्थावर जिनगींत वादीचा व प्रतिवादींचा जो हक्क, मालकी व हितसंबंध असेल तो विकावयाचा आहे. नामदार हायकोर्ट ऑफ ज्युडिकेचर मुंबई यांनीं तारीख १ अक्टोबर १९१४ रोजीं वरील दाव्यांत जो कॅवेट हुकुमनामा दिला आहे त्यांत दिलेल्या अधिकारान्वयें वादी ही विक्री घडवून आणीत आहेत.

**विक्रीच्या जिनगीचें वर्णन.**

मौजे ताजनापूर ता० आकोला जि० आकोला येथें जी जमीन किंवा जमिनीचा भाग हा सर्वे नं. ९ चा असून अदमासें २८३१ क्षेत्रफळ आहे त्यावर असलेला बंगला, इतर इमारती व इतर उभे असलेले इमले या सुद्धां याची चतुःसीमा येणेंप्रमाणें.—

पूर्वेस किंवा पूर्व भागाला—सार्वजनीक रस्ता पश्चिम किंवा पश्चिमेच्या भागाला मोर्णा—नदी दक्षिणेस किंवा दक्षिणेच्या भागाला—नार्थ कॉट जीनींग फॅक्टरी.

उत्तरेला किंवा उत्तरेच्या भागाला—सरकारी जमीन व मोर्णा नदीला जाण्याचा रस्ता.

विक्री संबंधानें आणखी जाणणारी माहिती व शर्ती ज्यांस पाहिजे असतील त्यांनीं खालीं सही करणार यांच्या आफीस कमरा नंबर ९२ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई येथे किंवा वादी तर्फेचे अटर्णी मेसर्स श्रॉफ अँड दिनशा यांच्याकडे त्यांच्या ऑफिसांत नं. ३७६ हार्नबीरोड, फोर्ट, मुंबई येथें चौकशी करावी.

मुंबई ता. ६-१२-१७ } गांधी अँड को लिलाव करणार

नो. नं. ४९८

---

## नोटीस.

१ मारोती कोंडबा कोष्टी व २ मोतीराम किसन तेली व ३ दशरथ राघोजी कोष्टी त्रिवर्ग रा० कारंजा ता० मुर्तिजापूर

यांसीः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही आमचे दुकानी मुखत्यार होते, हल्लीं कांहीं दिवसापासून तुम्हास कामावरून दूर केलें आहे तरी या नोटिसीनें तुम्हास कळविण्यांत येते कीं तुम्हास नोकरीवरून दूर केले तेव्हांपासून तुमचे मुखत्यार पत्र रद्द केले आहेत तरी तुम्ही आमचे नांवचा कोणताही व्यवहार करूं नये. केल्यास त्याबद्दल तुम्ही जबाबदार आहां ता० ७।१२।१९१७ इ० द० पुंजाजी जैरामजी रा० कारंजा

सही

देवीदास गंगासा चवरे दु० कारंजा तर्फे मु० पुंजाजी जैरामजी द. खु.

नो० नं० ४९९

---

## जाहिरात

खालीं सही करणार यांजकडून सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं आमचे दुकानीं १ मारोती कोंडबा कोष्टी व २ मोतीराम किसन तेली व ३ दशरथ राघोजी कोष्टी त्रिवर्ग रा. कारंजा हे आमचे दुकानीं मुखत्यार होते. हल्ली बरेच दिवसापासून या तिघांना नोकरीवरून दूर केले आहे. व त्यांचे मुखत्यार पत्र रद्द केले आहे. तरी त्यांचेशीं आमचे दुकानचा कोणताही व्यवहार करूं नये केल्यास रद्द समजला जाईल कळावें ता० ७-१२-१७ द० पुंजाजी जैरामजी रा. कारंजा

सही

देवीदास गंगासा चवरे दु. कारंजा तर्फे मु. पुंजाजी जैरामजी द. खु.

नो० नं० ५००

---

## नोटीशीचें उत्तर

नोटीस देशमुख बाजीराव भाऊ शामराव भदाजी यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही जी ता. २९-११-१७ चे वऱ्हाड समाचार पत्रांतून नोटीस दिली ती पावली आहे. सदर्हु नोटिसीमध्यें लिहिलेला सर्व मजकूर एकंदर खोटा आहे. तुम्ही स्वतः आमचे दुकानी येऊन आपले राजीखुशीनें येऊन हिशेब रुजु करून दिला आहे बाकी इतर जे तुम्ही विधान केले आहे तें सर्व खोटें आहे आम्ही तुमचेशी कोणतेच प्रकारें विश्वासघात वगैरे केला नाहीं व तुम्ही विनाकारण आमचेवर लोकांच्या सांगण्यावरून फौजदारी वगैरे कादल्यास आम्हास होणाऱ्या सर्व खर्चाची जबाबदारी तुमचेवर राहील व आमची बदनामी केल्याबद्दल योग्य तजवीज केली जाईल. कळावें ही नोटीस दिली ता० १९ ११ १७ इसवि. दस्तुर खुद

सही

येसुसंगई सोनासंगई द. खु. दु० अजनगांव

नो० नं० ५०१

---

## नोटीस.

शेट लक्ष्मीनारायण व मुंगीलाल वा बद्रीदास मारवाडी साहु दु आकोला

यांसः—

खालीं सही करणार बिरामखा वा घुडेखा व उमरखा वा अमानखा मुसलमान उभयतां राहणार आकोला नोटीस देतों कीं तुम्हास आमचे मालकीचे कबजे ताजनापूर प्र. ता. आकोला येथील घर याची चतुःसीमा पु. बिरामखा, हैदरखा व सिनाजी यांचीं घरें प. अमूला वा दुलाखा जमादार यांचें घर व पडीत जागा द० सिनाजी इचें घर उ. सरकारी सडक येणे प्रमाणें चतुःसीमेंतील घर तुम्हास ता. १६-३-१२ पासून ता. १६-३-१७ पावेतों पांच वर्षे दरसाल रु. १०० शंभर भाडे घेण्याचे कबूल करून भाड्यानें राहण्यास दिले होते. व त्याबद्दल भाडे चिठी तुम्ही लिहून नोंदून दिली आहे. ती तुमची भाड्याची पांच वर्षे पुरी झाली. त्या नंतर तुम्हास घर खाली करून मागितले असतां आज देतो उद्यां देतो अशी तुम्ही चालवा चालवी करीत आहां व अलीकडेस तुमचे मनांत बेइमानी उभी राहिली असें दिसतें. तरी या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं तुम्ही ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत घर खाली करून देणें. नाहीं तर तुम्हास दरसाल रु. ४०० च्यारशेप्रमाणें भाडे द्यावें लागेल व ते तुम्हास कबूल असल्यास आठ दिवसाचे आंत तुम्ही आम्हाला रजिष्टर भाडे चिठ्ठी करून द्यावी. तसें न केल्यास तुमचेवर दरसाल रु. ४०० भाड्याचे नुकसानी बद्दल व घर ताब्यांत मिळण्याबद्दल मजला दिवाणी करावी लागेल व त्याजबद्दलचा खर्च ही तुम्हास द्यावा लागेल करितां अगाऊ नोटिसीनें कळविले आहे कळावें ता. १९-११-१७ इ.

सही (उर्दूत)

बिरामखा वा घुडेखा

१ उमरखा वा अमानखा नि. खुद

नो. नं. ५०२

---

# विकणें आहे.

खालीं लिहिलेलें घोड्याचें सामान थोडे दिवस उपयोगांत आणिले असून अगदीं नव्या सारखें आहे.

(१) सिंगल पेटन्ट लेदर हारनेस कम्प्लीट.

(२) सुपिरीअर ब्रॉऊन लेदर डबल हारनेस खास ऑर्डर देऊन कानपूर येथें तयार केलेलें.

(३) हॉर्स रायडींग सॅडल कम्प्लीट (लगाम व मारटींगल समेत.)

ज्यास घ्यावयाचे असेल त्यानीं आमचे दुकानांत येऊन माल पाहून खात्री करून विकत घ्यावे.

पेस्तनजी अँन्ड सन

आकोला.

नो० नं० ४९३

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-N. No150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला--सोमवार तारीख २४ माहे डिसेंबर सन १९१७ ई० [अंक ५१

## जाहिरात.

१ रिणमोचन तालुके व जिल्हा उमरावती येथील वार्षिक यात्रा रविवार तारीख १३ जानेवारी १९१८ इसवी रोजीं भरण्यास सुरुवात होऊन पुढें तारीख १० फेब्रुवारी सन १९१८ पर्यंत प्रत्येक रविवारीं भरेल. तसेच सोमवार तारीख ११ फेब्रुवारी १९१८ इसवी रोजीं अर्धोदय-पर्व असल्यामुळें त्या दिवशीं ही चांगली यात्रा भरेल. रिणमोचन हें ठिकाण जी. आय. पी. रेल्वेच्या माना व कुरुम या स्टेशनापासून सुमारें १० मैल आहे. व उमरावतीहून कच्च्या रस्त्यानें सुमारें २० मैल आहे.

२ रिणमोचन येथें रविवार व सोमवार तारीख १० व ११ फेब्रुवारी सन १९१८ इसवी रोजीं आकोला व उमरावती या दोन जिल्ह्याचें मिळून शेतकीचें पदार्थांचें व जनावराचें प्रदर्शन भरणार असून परीक्षक मंडळींनीं पसंत केलेल्या प्रदर्शनांतील शेतकीचे पदार्थ व जनावरें यांचे करितां नगदी रकमेचीं बक्षिसें वाटण्यांत येतील. तरी सदर्हू दोन्ही जिल्ह्यांतील शेतकरी लोकांनीं आपले शेतींत पिकणारे उत्तम जिन्नस व आपले येथील उत्तम जनावरें सदर्हू प्रदर्शनांत आणावींत.

३ शेतकी खात्याचे डेप्युटी डायरेक्टर हे उपयुक्त व सुधारलेलीं अशी कांहीं अवजारें आणतील व ता. १०।२।१९१८ इसवी रोजीं सकाळीं ८ ते ११ वाजेपर्यंत त्याचा प्रत्यक्ष उपयोग करून दाखविला जाईल.

४ तारीख १० फेब्रुवारी १९१८ इ. रोजीं दुपारीं २ ते ५ वाजेपर्यंत नांगराच्या व छकड्याच्या शर्यती होतील.

५ तारीख ११ फेब्रुवारी १९१८ इ. रोजीं दुपारीं २ ते ५ वाजेपर्यंत सभा भरून तेथें शेतकी व पतपेढ्या संबंधीं व तसेंच जनावरां संबंधीं व्याख्यानें दिलीं जातील. नंतर बक्षीस समारंभ होऊन सभा बरखास्त होईल.

६ प्रदर्शना करितां पाठविण्याच्या प्रत्येक जिन्नसा बरोबर जिन्नस पाठविणारे इसमानें खालीं दिलेल्या नमुन्या प्रमाणें दाखला देऊन त्याजवर सदर्हू इसम ज्या गांवीं राहत असेल तेथील पाटलाची सही घेतली पाहिजे. "मी असा दाखला देतो कीं, प्रदर्शनांत पाठविलेली जिन्नस माझे येथें तयार झालेली आहे."

सदर्हू जिन्नसा बरोबर दुसरा ही एक दाखला पाठवावा व त्यांत खालीं लिहिल्या प्रमाणें खुलासा करावा.

(अ) प्रदर्शनांत पाठविण्याची जिन्नस ज्या गांवांत तयार झाली असेल त्या गांवचें नांव

(ब) तालुक्याचें नांव

(क) जिन्नस पाठविणाराचें नांव, बापाचें नांव व धंदा

७ उमरावती व आकोला जिल्ह्यांतून प्रदर्शना करितां पाठविण्यांत येणाऱ्या सर्व जिनसा अनुक्रमें उमरावती व मुर्तिजापूर तहशीलदार यांजकडेस ता. ५-२-१९१८ इ. पर्यंत पोचतील अशा बेतानें पाठवाव्यात. फळफळावळ व भाजीपाला ता. ९ फेब्रुवारी १९१८ इ. रोजीं उमरावती तहशीलदार यांना रिण मोचन येथें मिळेल अशा बेतानें पाठवावा.

८ प्रदर्शना करितां पाठविण्याच्या जिन्नसांचा नमुना पांच पौंडा पेक्षां कमी नसावा.

९ यात्रेच्या जागीं डॉक्टर, व जनावरांचे डॉक्टर हे राहतील तसेंच प्रदर्शनाचे बंदोबस्ताकरितां पोलीस गार्ड ही राहील.

१० शनिवार व रविवार ता. ९ व १० फेब्रुवारी १९१८ इ. रोजीं प्रदर्शनाकरितां आणलेल्या जनावरांस चारा बगैरे मोफत दिला जाईल.

११ प्रदर्शनाकरितां येणाऱ्या शेतकऱ्यांपासून अगर प्रेक्षकापासून प्रदर्शनांत पाठविलेल्या जिन्नसाबद्दल अगर जनावरांबद्दल कोणताही कर घेतला जाणार नाहीं.

१२ फक्त उमरावती व आकोला जिल्ह्यांतील शेतकरी लोकांनाच बक्षिसें देण्यांत येतील.

१३ यात्रेंतील जागेच्या स्वच्छते विषयीं व यात्रेंतील बंदोबस्तासंबंधीं जिल्ह्याचे अधिकारी वेळोवेळीं जे हुकूम फर्मावतील त्या प्रमाणें प्रेक्षकांनीं व व्यापाऱ्यांनीं वागलें पाहिजे.

### प्रदर्शनांत आणण्याच्या जिन्नसाबद्दलचें परिशिष्ट.

| अ. नं. | प्रदर्शनांतील जिन्नसांचा तपशील | बक्षिसें १ लें | २ रें | ३ रें | ४ थें | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | भाग १ ला शेतकी— आणि बागाईतीच्या जिनसा | | | | | |
| १ | रोझीया कापूस | २० | १५ | १० | [illegible] | ५० |
| २ | जवारी | २० | १५ | १० | ५ | ५० |
| ३ | गहूं | १५ | १० | ५ | २ | ३० |
| ४ | भुइमुग | १५ | १० | ५ | ० | ३० |
| ५ | ऊंस | ५ | ३ | २ | ० | १० |
| ६ | फळें | १० | ५ | ३ | ० | १८ |
| ७ | भाजीपाला | ५ | ३ | २ | ० | १० |
| ८ | फुलझाडें | १० | ६ | ४ | २ | २२ |
| | | १०० | ६७ | ४१ | १२ | २२० |

### भाग २ रा— गुरें

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अवकादी सांड | २५ | १५ | १० | ० | ५० |
| २ | बैल जोडी | २० | १२ | ८ | ० | ४० |
| ३ | २॥ वर्षांचे आंतील दुध सुटलेली कालवड | १० | ८ | ६ | ० | २४ |
| ४ | २ वर्षांचे आंतील दुध सुटलेले गोऱ्हे. | १० | ८ | ६ | ० | २४ |
| ५ | अवकादी गाई | २५ | १५ | १० | ० | ५० |
| ६ | दुभत्या म्हशी | २० | १५ | १० | ० | ४५ |
| ७ | दुभत्या बकऱ्या | ६ | ४ | २ | ० | १२ |
| | | ११६ | ७७ | ५२ | ० | २४५ |

### भाग ३ रा— किरकोळ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | छकड्याच्या शर्यती | २० | १५ | १० | ५ | ५० |
| २ | नांगराच्या शर्यती. | २० | १५ | १० | ५ | ५० |
| | | ४० | ३० | २० | १० | १०० |
| | एकूण | २५६ | १७४ | ११३ | २२ | ५६५ |

वरील बक्षीसा शिवाय आणखी कांहीं बक्षिसें द्यावीशीं वाटल्यास ३५ रुपया पर्यंत देण्यांत येतील.

ई. डॅक्स
डेप्युटी कमिशनर.
जिल्हा उमरावती.

नो. नं. ४९६

## नोटीस.

सक्सेशन मु० नं० ९ सन १९१७

विद्यमान सबजज साहेब कोर्ट खामगांव

नोटीस सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं सखाराम हणमंत रा० खामगांव याचा आकोला येथील बरारट्रेडिंग कंपनींत असलेला २५ रुपयाचा शेअर त्याची मुलगी सईबाई मर्द संपत इजपासून इतर मिळकती सुद्धां ता० २१-३-१० रोजीं ४०० रुपयाला विकत घेतली आहे. सदहू मिळकतीचें सक्सेशन सार्टिफिकेट मिळावें ह्मणून अर्जदार शंकर कृष्ण शिऊरकर ता० विजापूर जिल्हा औरंगाबाद यानें अर्ज केला आहे. करितां त्यास सईबाई इनें विकलेल्या मिळकती बद्दल सार्टिफिकेट कां दिलें जाऊं नये याचें कारण दाखविणें असल्यास त्यानें ता० १६-२-१८ रोजीं आमचे कोर्टांत सकाळी १० वाजतां हाजर व्हावें. आज ता० १३ माहे डिसेंबर सन १९१७ इ० रोजीं आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी दिलें.

R. M. Wathodker
Sub Judge
Khamgaon

N. N. 506

## नोटीस.

विद्यमान सब जज साहेब आकोला यांचे कोर्टांत

कि. मु. नंबर १० सन १९१७

चौ. तारीख १२।१।१९१८

अर्जदार

बाळकृष्ण गीरमाजी राऊत राहणार आकोट

रामकृष्ण गीरमाजी राऊत रा. मुंबई

सर्वत्र लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, वरील अर्जदार यांनीं मयत गीरमाजी झिंगुजी राऊत [illegible] आकोला सिटी डिस्पेन्सरी याचे वारस असल्याबद्दल सकसेशन सरटिफीकेट मिळण्याबद्दल या कोर्टांत अर्ज केला आहे. त्याची चौकशीची तारीख १२।१।१८ नेमली आहे. तरी ज्या कोणास वरील मयत डाक्टर गिरमाजी यांचे वारसाबद्दल तक्रार करणें असेल त्यांनीं वरील तारखेस आपले पुराव्या निशी कोर्टांत सकाळीं १० वाजतां हजर राहावें. वरील तारखेस कोणी हजर न राहिल्यास अर्जदार यांस मयताचे वारस समजून सरटिफीकेट दिले जाईल. कळावें. तारीख ११।१२।१९१७

सही

V. S. Deva
Second Sub Judge
Akola

N. N. 507

## नोटीस.

नोटिस बेशमी गोपीनाथ सोनार राहणार आंबोडा ता. पुसद जि. यवतमाळ

यांसी:—

नोटिस देणार रंगु मर्द गोपीनाथ सोनारीन राहणार काळी तालुका पुसद जि. यवतमाळ

हिजकडून:—

नोटिस देण्यांत येते कीं, मी तुमची गंधर्वाची बायको असून तुम्ही मला ८।९ वर्षांपासून नेले नाहीं. गंधर्वापासून दोन तीन वेळां माझे आई बापानीं तुमचे येथें आणून घातले व आतां तर चार पांच वर्षांपासून तुम्ही मला अजीबात सोडले असून अजीबात नेत नाहीं. व आईबाप ही मला सांभाळीत नाहींत. या मुळें मजला सावकाराचें दोन अडीचशे रुपये कर्ज झाले आहे. तरी ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत मला घेऊन जावें व सावकाराचें कर्ज द्यावें. नाहीं तर आठ दिवसा नंतर हीच फारकती उर्फ सोडचिठ्ठी समजून मी गंधर्वाचा नवरा करून सावकाराचे कर्ज देईन. मग तुमचा मजवर कोणतेच प्रकारचा हक्क नाहीं. करितां ही नोटिस दिली आहे. मु. काळी ता. ४।१२।१७

सही

बांगडीची निशानी रंगु मर्द गोपीनाथ राहणार काळी

नो० नं० ५०८

## नोटीस

रा. रा. सुभानखां वा रहिमतखां मुसलमान राहणार रसूलपूर ता. मलकापूर

यांसः—

मी खालीं सही करणार नोटिस देतो कीं मी तुह्मास ता. ५।११।१७ रोजीं शिपाई ह्मणून नोकर ठेविले. तुमचे जवळून सालखत करून घेऊन मी ही तुह्मास तुमचे भरंवशावर करारनामा वरील मित्तीस दिला. सदरहू कागदपत्रें होतांच ४ दिवसांतच तुह्मी आपले गुण उधळून माझें सुमारें २०४ रुपयाचें नुकसान केलें. तरी तुह्मास या नोटिशीनें कळवितो कीं तुमची नोकरी ता. १९ माहे नोवेंबर पासुन [illegible] आहे. व तुमचे जवळ असलेला माझा कारनामा रद्द आहे. त्या अन्वयें पुढें तुह्मी कोणती ही कारवाई केल्यास मी जबाबदार राहणार नाहीं. तुमचे कामगिरीबद्दल तुमचेवर लौकरच दावा आणणार आहों. कळावें ता. १९।१२।१७

सही

१ राजाराम तोताराम पा. राहणार खुदानपूर दस्तुर खुद

नो. नं. ५०९

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, मौजे व्याळ तालुके बाळापूर येथील मढीची जागा खांब १२ पुढें ओसरी टिनचा व वर माडी कवेलुची व दक्षिणे कडील बाजूनें कवेलुची ओसरी आहे. ही जागा इमल्यासुद्धां व्याळ येथील गांव लोकांची सार्वजनिक असून ती रा. रामभारथी गोसावी यांस राहण्यास दिली होती. हल्लीं त्या जागे संबंधानें रा. रामभारथी याचे मनांत बेईमानी उत्पन्न झाली असून ती जागा ते विकत आहेत असें कळतें. तरी या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, ती जागा रामभारथी याचे मालकीची नसून ती त्यास गहाण, खरेदी, अगर बक्षीस देण्याचा मुळींच अधिकार नाहीं. जर कोणी गहाण, खरेदी, अगर बक्षीस घेईल तर त्याचा तो व्यवहार रद्द समजला जाईल. व त्याबद्दल ती जागा जबाबदार राहणार नाहीं. करितां आगाऊ नोटिशीनें कळविले आहे. कळावें. ता. १६।१२।१७

सह्या पंचाच्या

१ किसन सदाशिव बारी द. खुद
१ किसन वा चहादु माळी द. खुद
१ गिरधरलाल पन्नाचंद गुजर द. खु,
१ गोविंदा भगवान द. गिरधरलाल
१ सदु झिंगराजी दस्तुर खुद
१ रामा वा नारायण डांगे दस्तुर गिरधरलाल

नो. नं. ५१०

## जाहिर नोटीस

या जाहिर नोटिशीनें शेख आमद वा शेख मन्नु जात मुसलमान राहणार शेखबाबु पुरा पोष्ट शेखबाबु साहेब पातूर ता. बाळापूर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं आमचा चुलता व तुमचा भाऊ शेख दुला वा शेखमन्नु हे आज दोन वर्षे होतात मरण पावले. ते मेल्या नंतर त्याची विधवा फुंदाबी ही त्याचे स्वसंपादीत सर्व स्थावर जंगम इस्टेट अंदाज रुपये सहा हजाराची कुल. ती आपल्यात वडील असल्यामुळें त्या बाईचे ताब्यांत होती व ती त्या सर्व जीनगीचा मरेकाल पावेतों उपभोग घेत आली तिजला मरण्यास आज तीन साडे तीन महिने झाले. ती मेल्यानंतर ही सर्व इस्टेट रिकामी झाली. शेखदुला यानीं मजला आज सहा वर्षांपासून आपले पोटचे मुलाप्रमाणें वागविलें व ते मेल्यानंतर त्याची विधवा फुंदाबी इनें ही मजला स्वतः प्रमाणें वागविलें. शेखदुला फुंदाबी याचे ह्मणणें असें होतें कीं ही सर्व स्थावर जंगम इस्टेट आमची स्वसंपादीत असल्यामुळें आमचे पश्चात त्यां मालकीचे नात्यानें उपभोग घ्यावा. पण फुंदाबी मेल्यावर सर्व स्थावर जंगम इस्टेट माझे ताब्यांत असलेली तुह्मी माझी बायको कुलसम इजला फितुर देऊन सर्व इस्टेटीचा ताबा घेऊ पाहातां. तर आतां कायद्यानें ही सर्व इस्टेट मजला मिळते किंवा नाहीं हें माहीत नसल्यामुळें मी तुमचे विरुद्ध दिवाणी फौजदारींत फिर्याद करून योग्य दाद मिळविणार आहे. तर ही सर्व इस्टेट तुह्मी अफरातफर करूं नये व असामीकडून पैसे वसूल करूं नये. केल्यास मी सर्व नुकसानी सुद्धां तुमचेपासून भरून घेईन. ही नोटिस तुह्मांस व त्याप्रमाणें शेखदुलाचे सर्व असामीस दिली शेखमन्नु मयत शेखदुला याचे वंशांत. १ सरदार, २ चांद, ३ शहाबिबी, ४ वालुबी, ५ शेखवजीर, व ६ बानो ही मंडळी हयात आहेत मु० आकोला तारीख १३-१२-१९१७ इ.

सही

शेखसरदार वा फत्तेमंद जात मुसलमान रा० शहापुरा शेख बाबूचे पातूर ता० बाळापूर याचा आंगठा असे

नो. नं. ५११

## नोटीस

वेदमूर्ती लिंगुआया गुरू सदाशिव आया निस्बत संस्थान पेठ बाळापूर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून विनंती पूर्वक कळविण्यांत येते कीं आपण स्वजाती धर्माचे व संस्थानचे काम चांगल्या रितीनें चालवाल असा भरंवसा वाटल्यावरून आपणास आज सुमारें ३० वर्षें झालीं पंचांनीं बाळापूरच्या संस्थानांत घेऊन कानकाचे चरमूर्ती लिंग बनविले व मागील पीठाधिकारी वेदमूर्ती पंचाक्षरी आया हे समाधिस्त होई तों पावेतो संस्थानचा कारभार आपले हातून उत्तम रितीनें चालला. पुढें आपल्या सल्यानें जातीचे पंचांनीं विचार करून नवीन पीठाधिकाऱ्याची गादीवर स्थापना केली व आपण गादीवर बसलेल्या महाराजाच्या विद्याभ्यास व धर्मशिक्षणावर नजर ठेवावी अशी मुद्दाम व्यवस्था करण्यांत आली असें असतां ही आपण महाराजाच्या शिक्षणाची व खाण्यापिण्याची वगैरे कोणत्याच प्रकारची व्यवस्था न करितां बरेच वर्षांपासून गांवांतील मारवाडी सावकाराची नोकरी धरली व मठातील आपले राहण्याचें ठिकाण सोडून सुमारें आठ दहा वर्षांपासून गांवांतील ओंकार आपा कृष्णा आपा यांचे घरीं आतांपर्यंत वस्ती करीत आहां याचें कारण काय असावे या संबंधीं बऱ्याच वीरशैव पंच मंडळीचे व जंगम मंडळीचे तर्क वितर्क चालू आहेत व ओंकारआपाचे घर सोडून मठांत राहण्यास पंचांनीं आपणास मागें अनेक वेळां विनंती केली होती परंतु आपण [illegible] अमळे विनंतीस न जुमानता पूर्वेक[illegible] आपली वस्ती वरील ओंकार आपाच्या घरीं कायम केली असे असल्यामुळें पटावरील महाराजांची प्रत्येक बाबतींत फारच गैरसोय होते व मठाची इतकी हेळसांड होते कीं तेथें रोज झाडपूस व दिवाबत्ती वगैरे मुळींच होत नाहीं व आपल्या परम पूज्य व पवित्र अशा दमाआया स्वामीच्या समाधीस स्नानही पोंचत नाहीं. यामुळें आपल्या संस्थानची व धर्माची स्थिती बरीच खालावत चालली आहे. व आह्मास असें कळतें कीं आपल्या जातींतील कांहीं लोक गैरचालीचे निघून भ्रष्ट झालेले आहेत. अशा लोकांना आपण भ्रष्टतेबद्दल पंचासमक्ष प्रायश्चित्त न देतां उलट त्यांना आतून अभय देऊन आपण ही त्यांच्याशीं अन्नव्यवहार करून स्वतःसही भ्रष्ट करून घेतां असें आह्मास कळतें असे जर असेल तर आपल्या सारख्या पवित्र जंगमास मुळींच शोभत नाहीं. कारण जर अशा रीतीची आपली वागणुक या पुढें चालल्यास आपल्या समाजाची व धर्माची फारच हानी होण्याचा संभव आहे. करितां आपण ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत आपण वरील गोष्टी संबंधानें अगदीं निर्दोषी आहां अशी आह्मा पंचाची खात्री होण्याकरितां तुह्मी पंचाईत करवावी व त्यांत तुह्मी पूर्ण निर्दोषी आहां असें सिद्ध करून दाखवें न दिल्यास तुह्मी वरील गोष्टी संबंधानें पूर्ण दोषी आहां अशी आह्मा

पंचाची समज होईल कळावें.

( पंचाच्या सह्या )

१ रेवा आपा बाबुआपा महाजन राहणार बाळापूर द० खु०

२ देवा आपा वंकार आपा राहणार पारस द० खु०

३ शंकर आपा रामा आपा मुक्काम बोरगांव मंजु द० खु०

४ लक्ष्मण आपा तुकाराम आपा पारस दस्तुर खुद

५ गोविंदा आपा कृष्णा आपा राहणार पारस दस्तुर खुद

६ गना आपा तुकाराम आपा वाणी मु० पारस दस्तुर खुद

७ सदु आपा खंडा आपा मु० पारस निशाणी खुद

८ शिवा आपा सुभान आपा वाणी मुं० सांगवी निशानी खुद

९ सोना आपा कृष्णा आपा वाणी मु० सांगवी निशाणी खुद

१० भिवलींग आपा सोनलींग आपा मठपत दस्तुर खुद

११ बनसी आपा नारायण आपा राहणार बाळापूर दस्तुर खुद

१२ सोना आपा गंगाआपा निमकर्दी दस्तुर खुद

१३ खंडाआपा रामाआपा निमकर्दी द० खु.

१४ नारायण गणाआपा निमकर्दी द० खु.

१५ शिवाआपा वा देवाआपा वाणी रा. निमकर्दी दस्तुर खुद

१६ तुकाराम नवलाआपा निमकर्दी नि. खु.

१७ माहादा आपा कडता आपा वाणी निमकर्दी नि० ख

१८ ओंकारआपा कानाआपा वाणी नि० निशाणी

१९ नारायण आपा हुनु आपा वाणी शाणी खुद

२० गोविंदा कृष्णा आपा निमकर्दी नि. खु.

२१ नारायण आपा लक्ष्मण आपा आकोला

२२ सदुआपा मारोती आपा आकोला

२३ शंकर तुकाराम आपा बाळापूर

२४ रामा आपा महादापा उगव द० खु०

२५ केसो आपा गोविंदा आपा उगव

नो० नं० ५१२

## नोटीस

रा. रामभारती गोसावी रा. व्याळ ता. बाळापूर. यांस:—

खालीं सही करणार पंच लोक किसन वा सदाशीव बारी, किसन वा चाहादु बोचरे, गिरधरलाल पन्नाचंद गुजराथी, गोविंदा वा भगवान कुणबी, सदु वा झींगराजी धनगर, रामू वा नारायण डांगे कुणबी रा० व्याळे ता० बाळापूर यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे मजकूर येथील जागा मढीची इमारतीसुद्धां खांब १२ वर माडी कवलुनी पुढे ओसरी टिनी व दक्षिणेकडील कवेलूची जागा सार्वजनीक गावकरी लोकांची असून ती जागा गावकरी लोकांतर्फे आह्मी पंच लोकांनीं तुह्मांस गोसावी ह्मणून राहण्यांस दिली होती. हल्लीं त्या जागेसंबंधानें तुमचे मनांत बेइमानी उत्पन्न झाली असून तुह्मी ती जागा विकणार आहां असें आह्मांस कळलें आहे. तरी या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं त्या जागेवर तुमची कोणत्याही तऱ्हेनी मालकी नसून ती विकण्याचा तुह्मास मुळींच अधिकार नाहीं. तुह्मी ती जागा कोणास विकल्यास, गहाण अगर बक्षीस दिल्यास तो तुमचा व्यवहार रद्द आहे. करितां आगाऊ नोटिशीनें कळविलें आहे कळावें ता० १६-१२-१७ इ.

सह्या पंचाच्या

१ किसन सदाशीव बारी द. खु.

२ किसन वा चहादु माळी द. खु

३ गिरधारलाल पन्नाचंद द. खु.

४ गोविंदा भगवान कुणबी द० गिरधरलाल

५ सदु झींगराजी द० खु०

६ रामा नारायण द० गिरधरलाल

नो० नं० ५१३

## NOTICE

Tenders are invited for the supply of the under-mentioned grains to the Nagpur Central Jail for the Year 1918. Sealed samples with the prices and conditions, percentage of refractions &c, clearly stated should be submitted to the Superintendent, not later than 10 A. M. on Thursday the 17 th January 1918.

Jawari................6000 Maunds.

No. N. 514


## विकणें आहे.

मताच्या लो[illegible] राजधानींतल्यो लिहिलेलें बोळ्याचें सामान थोडे आहे. त्यांची गेगांत समा[illegible] असून अगदी खटपटींत खबीनदार हें त्यांकेच्या म्यानेजराला बे[illegible]दर हारनेस कम्प्लीट. केलें, जनरल कॅलेडिन यांना लेदर डबल हारनेस खास आडर[illegible] काहीं तयार केलेलें.

(३) हॉर्स रायडींग सॅडल कम्प्ली[illegible]ल गाम व मार्टींगल समेत.)

ज्यास घ्यावयाचें असेल त्यांनीं आमचे दुकानांत येऊन माल पाहून खात्री करून विकत घ्यावे.

पेस्तनजी अँन्ड सन
आकोला.

नो० नं० ४९३


## नोटीस

भिवनीबाई मर्द जैनारायण मारवाडी ब्राह्मण राहणार सांगवी खुर्द ता. अकोला इनस:—

खालीं सही करणार मुरलीधर लक्ष्मीनारायण मारवाडी ब्राह्मण रा. सांगवी खुर्द तालुके आकोला यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझी सख्खी चुलत-भावजय आहेस. माझा चुलतभाऊ जयनारायण आज ३४ वर्षें झालीं मरण पावला आहे. त्याचेजवळ असलेली स्थावर मिळगी तुझे ताब्यांत आहे. त्या इस्टेटीवर तुझा सर्व प्रकारें उदरनिर्वाह होत आहे, असें असून तुझा विचार विनाकारण कर्ज काढून इस्टेटीचा अफरातफर करण्याचा दिसतो. तुझा हक्क तुझे हयातीपर्यंत आहे तोंपर्यंत खाण्याचा हक्क आहे. तुमचा कोणतेही प्रकारें अफरातफर करण्याचा हक्क नाहीं. करितां तुमचा नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, सदहू मिळगी तूं गहाण, खरीदी, अगर बक्षीस, अगर पांच वर्षांवर ज्यास्त दिवस पट्ट्यानीं देऊं नये. त्याप्रमाणें न केल्यास त्या पैशाचा जबाबदार माझा मयत चुलतभाऊ जयनारायण याची मिळगी होणार नाहीं कळावे तारीख २९-११-१७ इ. दस्तुर

सही
मुरलीधर लक्ष्मीनारायण रा. सांगवी खुर्द नि. आंगठा

नो. नं. ५१६


वऱ्हाडसमाचार

मार्गशीर्ष शुद्ध ११ पिंगल संवत्सर १८३९


## उद्या.

उद्याचा दिवस हिंदुस्थानच्या राजकीय इतिहासांत ठळक अक्षरांनीं लिहिण्यासारखा होईल. आमच्या राजकीय प्रगतीचें पाऊल कांग्रेसच्या बत्तीस वर्षांच्या परिश्रमानें बरेंच पुढें पडलें आहे, त्याला उद्याच्या राष्ट्रीय सभेच्या बैठकींत मिसेस आनी बिझांट यांचें अध्यक्षांच्या नात्यानें केलेल्या भाषणानें मोठारची गति मिळेल. उद्या कलकत्त्यास भरणारी कांग्रेस गतवर्षी लखनौ येथें भरलेल्या कांग्रेसनें केलेल्या ठरावांवर आपल्या पसंतीचें शिक्का मोर्तब करून त्या ठरावाची अंमल बजावणी कोणत्या प्रकारें देशभक्तांनीं केली [illegible] याचा आढावा काढील [illegible] प्रांतांतून होमरूल लीगनें केलेल्या चळवळीनें किती जागृति उत्पन्न केली आहे व मि. मांटेग्यु यांनीं सादर करण्याच्या अर्जावर किती लक्ष लोकांच्या सह्या मिळविल्या आहेत, किती ठिकाणीं सभा झाल्या, किती भाषणें झालीं, व या सर्वांपासून देशाला राजकीय जागृतीच्या रूपानें किती लाभ झाला याचा निष्कर्ष सांगण्यांत येईलच. त्याचप्रमाणें बरोबर ही चळवळ करणारे पुढारी ह्मणजे कांग्रेसच्या अध्यक्षबाई व त्यांचे सहकारी मित्र मि. अरंडेल व मि. वाडिया यांना कशा भयंकर दिव्यांतून जावें लागलें, अधिकारी वर्गानें त्यांच्याशीं कसें अन्यायाचें वर्तन केलें, होमरूलची चळवळ दाबून टाकण्यासाठीं कसे भगीरथ प्रयत्न केले व ते कसे निष्फळ झाले, हिंदुस्थानच्या तरुण विद्यार्थ्यांच्या मनांतून देशाभिमानाचा असलेला अंकुर करपून टाकण्यासाठीं योजिलेल्या सर्क्युलराचा काय परिणाम झाला, व सरकारी अधिकाऱ्यांच्या या विरोधानें राष्ट्रीय पुढाऱ्यांची उमेद न खचतां उलट ती कशी वाढली, या सर्व गोष्टींचा ही उल्लेख करावा लागेल; आणि हिंदुस्थानांतली ही जागृति वरवरची असून कांहीं थोड्या चळवळ्या लोकांपुरतीच आहे. खेडेगांवांतल्या लोकांना तिचें स्वप्न सुद्धां पडलेलें नाहीं अशा विलायतेंतल्या लोकांना थापा देऊन हिंदुस्थानाला स्वराज्याचे हक्क देण्यासारखी पात्रताच त्या लोकांचे अंगीं आलेली नाहीं असें भासविणारी लॉर्ड सिडन हामसारखी मंडळी विलायतच्या आपल्या देशबंधूंच्या डोळ्यांत कशी धूळ फेकीत आहे हें ही उद्या कलकत्त्याच्या कांग्रेस मंडपांत निरनिराळ्या प्रांतांतून आलेल्या प्रतिनिधींच्या मोठ्या संख्येवरून लोकांच्या निदर्शनास आल्यावांचून राहणार नाहीं. देशभक्तीचा व खऱ्या कळकळीचा अंतःकरणांत जोम असल्यावर बाह्य विरोध किती ही प्रबळ असला तरी त्याचें चालत नाहीं, अथवा मि. गांधी यांच्या शब्दांत बोलावयाचें ह्मणजे सत्याग्रहाचें किंवा अध्यात्मिक बळ हें शरीरिक किंवा अधिकार बळाहून श्रेष्ठ आहे हें उद्याच्या कांग्रेसच्या अध्यक्षांच्या भाषणांवरून १९१७ मधल्या होमरूल विषयक चळवळीच्या इतिहासावरून कोणाला ही दिसून येईल.

यंदाची कांग्रेस दुसऱ्या ही एका दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची गणिली जाईल. कांग्रेसचें अध्यक्षपद आजपर्यंत अनेकवेळां युरोपियन गृहस्थांनीं भूषित केलें आहे, आणि जरी हिंदुस्थानाविषयींची त्यांची कळकळ, प्रेम, आदर किंवा हितबुद्धि खुद्द हिंदीपुढाऱ्यांहून तिळमात्र कमी नव्हती, तरी ते सर्व हिंदुस्थानांत कांहीं काळपर्यंत वास करणारे वाटसरू होते. यंदाच्या अध्यक्ष बाई युरोपियन आहेत तरी त्यांच्यांत एक विशेष हा आहे कीं, त्यांनीं भारतवर्षाला आपला दत्तकपुत्र ह्मटलें आहे; अर्थात् स्वतःच्या पसंतीनें आणि केवळ प्रेमाखातर दत्तक घेतलेल्या पुत्राविषयींचे मातृवात्सल्याची सर कशाला ही यावयाची नाहीं. हें मातृवात्सल्य भारतवर्षा करितां त्यांनीं आजपर्यंत सोसलेले कष्ट, स्वकीय जनांकडून झालेला उपहास व छळ, आणि काळाचा, बुद्धीचा, शरीराचा, [illegible] व अन्य हितसंबंधाचा केवळ व द्रव्याचा वेगळी [illegible] भारतवर्षावरील प्रेमामुळें केलेला [illegible], गोष्टींवरून इतकें स्पष्ट झालें आहे कीं त्याचा नामनिर्देश करण्यापलीकडे अधिक कांहीं लिहिण्याची अवश्यकता नाहीं. या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे मिसेस बिझांट यांना 'भारत माता' हें नांव अन्वर्थक दिसतें, आणि यंदाच्या कांग्रेसनें त्यांना अध्यक्षपदाचा मान देण्यांत आपल्या अंतःकरणांत ओतप्रोत भरलेल्या कृतज्ञतेचें, व पूज्यबुद्धीचें व प्रेमाचें यत्किंचित् प्रकटीकरण केलें आहे, यापलीकडे ज्यास्त मानाची जागा देण्याचें त्यांचे हातांत असतें तर ती ही त्यांनीं दिली असती येवढें मात्र उत्कृष्ट प्रकारें व्यक्त होतें.

कांग्रेसच्या अध्यक्षपदावर स्त्री आरूढ होण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे या दृष्टीनें ही या गोष्टीला विशेष महत्त्व आहे. स्वार्थसाधु व मतलबी लेखकांनीं आणि सत्याग्रही मिशनरींनीं आपल्या कामाची नसती टिमकी वाजविण्यासाठीं विलायतेंतल्या लोकांचा असा गैरसमज करून दिला आहे कीं हिंदुस्थान देश अगदीं नादान, व सुधारणेच्या अगदीं खालच्या पायरीवर आहे. येथें स्त्रियांची योग्यता आणि केरसुणीची योग्यता सारखीच समजतात. तेथील पुरुष आपमतलबीपणानें सगळे हक्क बळकावून बसले आहेत, आणि इंग्रज

सरकार त्यांचा हात धरायला नसलें तर हे लोक बायकांची किती विटंबना करतील कोणास ठाऊक! ज्या हिंदुस्थानच्या लोकांची अशी बदनामी साऱ्या जगांत अगोदर या धूर्त व लबाड लोकांनीं करून ठेविली आहे ते हिंदुस्थानचे लोक मिसेस बिझांट बाई सारख्या स्त्रीला राष्ट्रीयसभेच्या उच्चासनावर बसवून तिच्या नियमनाखालीं राष्ट्रीय कार्य उत्तम रीतीनें पार पाडूं शकतात ही गोष्ट जेव्हां यंदाच्या काँग्रेसमुळें जगाच्या निदर्शनास येईल, तेव्हां लबाड लेखकांच्या व खोडसाळ मिशनरींच्या तोंडावर चांगले पायपोस पडून हिंदुस्थानच्या सुधारणेचें स्वरूप खरोखर किती उज्ज्वल आहे याची थोडीशी तरी कल्पना त्यांना करतां येईल.

कांग्रेसच्या आजपर्यंतच्या अध्यक्षांच्या मालिकेंत शोभण्याची पात्रता मिसेस बिझांट यांच्या ठायीं आहे याविषयींची शंका त्यांचे शत्रु सुद्धां कधीं घेणार नाहींत. किंबहुना एका बाबतींत त्या सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहेत असें ही बिनादिक्कत सर्वांना कबूल करावें लागेल; आणि ती गोष्ट ह्मणजे ही कीं आजपर्यंत झालेले अध्यक्ष राजकीय किंवा फार तर सामाजिक सुधारणेच्या बाबतींत हिंदुस्थानच्या उन्नतसाठीं झटणारे होते. पण धर्म, तत्त्वज्ञान, शिक्षण, समाज सुधारणा, वाङ्मय, इ. सर्व बाबतींत ज्यांचा बुद्धिप्रभाव सारखा दिसून आला व उन्नतीच्या या सगळ्या अंगांचा परिपोष ज्यांनीं एकसारखा अव्याहत रीतीनें केला असा एक ही मनुष्य कांग्रेसच्या पदाला आजपर्यंत लाभला नव्हता. ती उणीव मिसेस बिझांट यांनीं भरून काढली आहे. सारांश, विलक्षण बुद्धिमत्ता, अपूर्व चौरसपणा, अप्रतिम स्वार्थत्याग, पराकाष्ठेची कळकळ, अव्याहत उद्यमशीलता, अलौकिक वक्तृत्वशक्ति, असामान्य [illegible] अध्यात्मिक तेज व अमर्याद योगसामर्थ्य इ. गुण ज्यांचे ठायीं एकवटले आहेत अशीच व्यक्ति हिंदुस्थानच्या सर्वांगीन उन्नतीसाधनार्थ अवश्यक असेल तर ती मिसेस बिझांट यांच्या रूपानें हिंदुस्थानापुढें आहे, आणि कोणी तिला अवतारी किंवा देवांशसंभूत ह्मणोत किंवा न ह्मणोत, पण हिंदुस्थानच्या लोकांनीं तिला राष्ट्रीय सभेचें अध्यक्षपद देऊन तिचा जो बहुमान करण्याचें ठरविलें आहे त्याबद्दल सारें जग त्यांच्या गुणज्ञतेची तारीफच करीत राहील, व जे कोणी उद्यांचा हा बहुमान समारंभ प्रत्यक्ष अवलोकन करण्यास राष्ट्रीयसभेच्या मंडपांत हजर राहतील त्यांना आपण जन्मास येऊन एक अपूर्व गोष्ट पाहिली याबद्दल धन्यता वाटल्यावांचून राहणार नाहीं हें खास.

## सार्थ राष्ट्रीय संध्या.

**संकल्प—**

अस्माकं भारतीयानां क्षेमस्थैर्य विजयैश्वर्य-।
भिवृद्ध्यर्थं स्वराज्यमहामंत्रजपं करिष्ये ॥

( आह्मां भारतीयांच्या कल्याण, स्थिरता, विजय, ऐश्वर्य इ. च्या अभिवृद्धीसाठीं स्वराज्य संबंधीं महामंत्राचा जप करीन. )

**ध्यान—**

विश्वरूपं विश्वजन्म—स्थिति—संहारकारिणम् ।
भक्तानामिष्टदातारं नौमि विश्वेश्वरं विभुम् ॥

( विराट स्वरूपी, विश्वाला उत्पन्न करणारा, पाळणारा, आणि त्याचा संहार कर्ता, भक्तांच्या इच्छा पूर्ण करणारा, असा जो सर्व विश्वाचा स्वामी परमेश्वर त्याला माझा नमस्कार असो )

**मंत्र—**

ॐ नमो भगवते विश्वेश्वराय ।
स्वराज्यमस्माकं त्वं प्रयच्छ स्वाहा ॥

( ओं ही व्याहृति मंत्राच्या उच्चाराच्या प्रारंभीं ह्मणावयाची असते. विश्वाचा स्वामी जो परमेश्वर त्याला प्रणाम करून हेंच मागतों कीं आह्मांला स्वराज्य द्या. 'स्वाहा' हें पद मंत्राच्या शेवटीं लावण्याचा प्रघात आहे. )

**उपस्थान—**

धर्मार्थकाममोक्षा ये पुरुषार्थतया स्मृताः ।
अनुवर्तेम तान्नित्यं श्रेयोहेतून् सतां हितान् ॥
विश्वेश ! वर्णाश्चत्वारः परस्परहितैषिणः ॥
विशन्तु सर्वोद्यमेषु देशवृद्ध्यैकबुद्धया ॥

( प्राण्यांचें कल्याण करणारे धर्म, अर्थ, काम व मोक्ष असे जे चार पुरुषार्थ त्यांना आह्मी अनुसरूं. हे परमेश्वर ! चारी वर्ण परस्परांचें कल्याण चिंतून देशाच्या उत्कर्षासाठीं एकाचित्त होऊन आपापले उद्योग करीत राहोत. )

**श्रीपरमेश्वरार्पणमस्तु**

( या माझ्या कर्माचें फळ श्रीपरमेश्वराला मी अर्पण करतों. )

ही राष्ट्रीय संध्या प्रत्येक भारतीयानें ( मग तो वृद्ध, तरुण, बाल कोणी ही असो, स्त्री असो कीं पुरुष असो, ब्राह्मण क्षत्रिय, वैश्य असो कीं शूद्र, चांडाल, अस्पृश्य वर्गांतला असो ) प्रत्येकानें सकाळ संध्याकाळ नेमानें भक्तिपूर्वक ह्मणावी. तिचा परिणाम झाल्याशिवाय खास राहणार नाहीं.

## हिंदी सरकारी अधिकाऱ्यांचा संकुचित दृष्टि.

पंचवीस तीस वर्षांपूर्वीचे किंवा त्याच्या ही अगोदरचे सरकारी अधिकारी व हल्लींचे सरकारी अधिकारी यांची तुलना करून पाहिली तर तिच्यापासून निघणारा निष्कर्ष सध्याच्या अधिकाऱ्यांना विशेषसा भूषणावह होईल असें वाटत नाहीं. पंनास साठ वर्षांपूर्वी लॉर्ड मेकॉले यांनीं हिंदुस्थानच्या शिक्षणासंबंधानें काढलेले उद्गार घ्या, किंवा सर रिचर्ड गार्थ सारख्या नामांकित कायदेपंडित हायकोर्ट जज्जानें न्यायखातें व अंमल बजावणी हीं निराळीं काढण्याच्या अवश्यकते संबंधानें नमूद केलेले जोरदार विचार घ्या, आणि त्यांच्याशीं परवा मुंबईच्या कायदेकौंसिलांत सरकारचे ॲडव्होकेट जनरल किंवा ना. सर माधवराव चौबळ यांच्यासारख्या अधिकाऱ्यांनीं काढलेल्या उद्गारांची तुलना करा ह्मणजे पूर्वीच्या अधिकाऱ्यांची दृष्टि किती दूरदर्शी व उदारपणाची व हल्लींच्यांची किती संकुचित आहे याचा प्रत्यय आल्यावांचून राहणार नाहीं. हिंदुस्थानानें सुशिक्षित होऊन स्वतःचा कारभार दक्षतेनें चालविण्याची पात्रता संपादन केल्यावर आह्मां इंग्रजांना हिंदुस्थानांतून गाशा गुंडाळण्याचा प्रसंग आला तरी बेहत्तर आहे, पण हिंदी लोकांनीं सदैव अज्ञानांत व आमच्या गुलामगिरीत राहावें असें इंग्लंड कधीं इच्छिणार नाहीं असें धिटाईनें बोलून दाखविणारे मेकॉले साहेब कोणीकडे आणि आतां गांवोगांव सुशिक्षित हिंदी दिसूं लागले असतांही त्यांना ज्युरर होण्याचा अधिकार देण्यासही संकोच बाळगणारे व ज्युरी पद्धति जेथें आहे तेथें ही तिचा संकोच करूं इच्छिणारे सध्याचे अधिकारी कोणीकडे! हिंदी लोकांच्या वाढत्या आकांक्षाविषयीं मि. मांटेग्यु यांची पसंती दिसतांच त्यांच्या पुढें लोकांच्या खऱ्या प्रतिनिधींचे अर्ज जाऊं नयेत, हिंदी पुढाऱ्यांत नोकळेपणानें मि. मांटेग्यु साहेबांस मिसळतां येऊं नये, किंवा त्यांच्या विषयीं लोकांच्या मनांतली आदर बुद्धि स्वागताच्या व मानपत्राच्या रूपानें प्रकट होऊं देऊं नये ह्मणून अतिशय कडक निर्बंध घालणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांच्या संकुचित दृष्टीचा व विचाराचा निषेध करावा तेवढा थोडा आहे. मि. मांटेग्यु यांना कांग्रेससारखी राष्ट्रीय संस्था प्रत्यक्ष पाहण्याचा योग येऊं दिला असता तर प्रळय झाला असता काय? इंग्रजांचे राज्यास त्यापासून उलट बळकटीच आली असती. पण स्वार्थापलीकडे दृष्टिच जात नाहीं. केवढी शोचनीय अवनति!

## आतां पान्हा फुटला!

कांग्रेस— मॉस्लेम लीगनें तयार केलेल्या स्वराज्याच्या योजनेंत स्थानिक स्वराज्यासंबंधानें विशेषसा विचार केलेला नाहीं, तो अवश्य हवा होता, कारण स्थानिक [illegible] यांमध्ये खा[illegible] तर पूर्ण स्वराज्याधिकार प्राप्ती[illegible] पायरी आहे [illegible]हादुर [illegible]टीका हे अतीशय प्रमुख [illegible] आहे कीं चतुर माळ्याचे [illegible] पत्रकर्ते व मि. [illegible] कारणी पुरुष [illegible] पासून पुष्कळ फायदा [illegible] स्वराज्या[illegible] माळ्यानें आपल्या ( वऱ्हाडच्या ) [illegible] कैद [illegible] भागांत फिरून निरनिराळे मते कळकळ पाहून एखाद्यास असें वाटेल कीं हे लोक किती दूरदर्शी व हिंदुस्थानचे केवढे हितचिंतक आहेत! पण ज्याला स्थानिक स्वराज्याचा आतांपर्यंतचा इतिहास माहीत आहे व या टीकाकारांची कावेबाजपणा ओळखण्याची शक्ति आहे त्यांना या लोकांना अतांच स्थानिक स्वराज्याविषयींचा येवढा पान्हा फुटण्याचें खरें कारण तेव्हांच दिसून येईल. लॉर्ड रिपन यांचे वेळीं हिंदुस्थानांत स्थानिक स्वराज्याची स्थापना झाली, तेव्हांपासून ही पद्धती अयशस्वी ठरावी या दिशेनें सरकारी अधिकाऱ्यांचे प्रयत्न सारखे सुरू आहेत. सरकारी अधिकारी अधिकाऱ्यांना म्युनिसिपालिट्यांचे अध्यक्ष नेमून लोकनियुक्त मेंबरांच्या हातांत कांहीं अधिकार न ठेवणें, त्यांच्या सूचना सरकारनियुक्त मेंबरांच्या साह्यानें फेटाळून लावून लोकमताचा उपमर्द करणें, एखाद्या व्यक्तीच्या चुकीसाठीं सगळ्या संस्थेवर आग पाखडणें, म्युनिसिपाल्टीचे अधिकार मर्यादित ठेवून पुढें त्यांचा ही संकोच करणें, सारांश, हिंदी लोक स्थानिक स्वराज्याच्या अधिकाराला सुद्धां अपात्र आहेत असा बोभाटा करणें हें सरकारी अधिकाऱ्यांचें आतांपर्यंत धोरण चालत आलें आहे. एखाद्याचे हातपाय जखडून बांधून त्याला नदींत ढकलून द्यावयाचें आणि तो बुडूं लागला ह्मणजे तुला पोहतां येत नाहीं असा वर ठपका ठेवावयाचा हें अधिकाऱ्यांचें धोरण ओळखून हिंदी लोकांनीं जेव्हां पूर्ण स्वराज्याचे अधिकार प्राप्ती विषयींचे नेटाचे प्रयत्न सुरू केले, तेव्हां आतां स्थानिक स्वराज्याविषयीं या अधिकाऱ्यांना पान्हा फुटून लोकनियुक्त प्रेसिडेंट नेमण्याविषयींचीं फर्मानें सुटूं लागलीं आहेत! पण अधिकाऱ्यांचें हें औदार्य फार उशिरा प्रकट होत आहे. आतां असल्या निरुपायास्तव कुत्र्याच्या तोंडावर फेकलेल्या भाकरीच्या तुकड्या सारख्या क्षुद्र अधिकारदानानें लोक संतुष्ट होतील अशी उमेद सरकारी अधिकाऱ्यांनीं धरूं नये. लोकांची भूक फार वाढली आहे. तिची पूर्ण शांति होत नाहीं तोंपर्यंत लोकांची वृत्ति असमाधानाचीच राहणार! व लोकांना संतुष्ट ठेवण्याची अवश्यकता जोंपर्यंत सरकारी अधिकाऱ्यांना कळूं लागली नाहीं तोंपर्यंत लोकांची सहकारिता मिळून हिंदुस्थानच्या राज्य कारभाराचा गाडा आपण सुरळीतपणें चालवित आहों अशा समाधानाचें भाग्य सरकारला ही प्राप्त होणें अशक्य आहे.

## महायुद्धाची प्रगति

रशियाचा खेळखंडोबा झाल्या, आतां जर्मनी आपलें तिकडचें सैन्य पश्चिम रणक्षेत्रांत आणून मित्रराष्ट्रांना पुरेपुरेसे करून सोडील असा अंदाज सद्यःस्थितीचें यत्किंचित् ज्ञान असणारा ही सहज करूं शकेल, आणि जर्मन पत्रें ही असेंच ह्मणत आहेत. पण हीच गोष्ट लोकांचा अंदाज साफ चुकणार, आणि जर्मनी भलतेंच कांहीं करणार असें निश्चित मानण्यास पुरेशी आहे. माळ्याचेरण, जर्मन लोकांचे दाखवावयाचे दांत [illegible]ळे आणि खाण्याचे निराळे आहेत [illegible] आजपर्यंतचा अनुभव सांगत आला [illegible] आहे जर्मनपत्रें जाहिर करतील त्याहून कांहीं तरी निराळी वस्तुस्थिति बहुधा असते. मित्रराष्ट्रांना सध्या अनिष्ट ग्रह आलेले आहेत ही गोष्ट ब्रिटिश प्रधान मंत्री मि. लाईड जॉर्ज यांनीं ही कबूल केली आहे. पण निराशावादी न होतां या अनिष्ट ग्रहांनाच इष्ट करून घ्यावयाचें इतका जबरदस्त आशावाद ठेविल्याखेरिज निभाव लागावयाचा नाहीं हें त्यांचें ह्मणणें वाजवी आहे. सद्यःस्थितीचा रंग काळाकुट्ट आहे खरा; पण अमावास्येचा काळोखही तसाच असतो ह्मणून प्रतिपदा उजाडावयाची रहात नाहीं. आह्मीं मागच्या आठवड्यांत ह्मटल्याप्रमाणें अमेरिकन सैन्याच्या साह्यावर आतां मित्रराष्ट्रांची पुष्कळशी भिस्त आहे, आणि अमेरिकन लोक पक्की निकराची धरणार आणि देशाभिमानाचें वारें अंगांत संचरलेले आहेत. ते लोक मित्रराष्ट्रांना येऊन मिळाल्यावर युद्धाचा सगळाच रंग पालटेल हें जर्मनी जाणून आहे, ह्मणूनच ते येऊन पोंचण्याच्या आधीं 'पटं छिन्द्यात् घटं भिन्द्यात्' असें कांहीं तरी करून आपला शह युरोपवर ठेवावा अशी जर्मनीची उत्कट इच्छा असली पाहिजे. अमेरिकन सैन्य युरोपांत येऊं नये ह्मणून सबमरीनचा बागुलबोवा वाटेंत ठेवण्यास जर्मनी चुकावयाचा नाहीं. पण डा. विल्सन जर्मन चान्सेलरला शेरास सवा शेर भेटतील. तेव्हां जर्मनीला जी कांहीं धडपड

करावयाची असेल ती करण्यास आतांचीच वेळ आहे व तिला योग्य स्थळही पश्चिम रणक्षेत्र किंवा इटलीचें रणक्षेत्र हें आहे. पैकीं पश्चिम रणक्षेत्रांत इंग्रज व फ्रेंच यांनीं आपली सरशी कायम ठेविलेली जर्मनीच्या डोळ्यांत सलत असली पाहिजे हें ध्यानात घेतलें ह्मणजे पश्चिम रणक्षेत्रांतच आतां जर्मनी खेळ खेळणार हा लोकांचा अंदाज फारसा चुकणार नाहीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

## इटालियन रणक्षेत्र.

सध्या या क्षेत्रांत शत्रूला आल्प्स पर्वत ओलांडून मैदानांत जाऊं द्यावयाचें नाहीं, येवढी कामगिरी इंग्रज व फ्रेंच फौजांकडेस आहे. येवढें जर त्यांना करतां आलें आणि हिंवाळा सुरू होण्याचे पूर्वीं शत्रूचें पाऊल त्या मैदानांत पडलें नाहीं, ह्मणजे त्याला परत टेंटिनोकडे हटण्यास लावतां येईल, व लांबर्डीच्या मैदानांत उतरण्याचें त्याचे सारे बेत जागच्या जागीं रहतील. बासानोमधून रस्ता काढीत जाण्याचे पायीं किती ही प्राण खर्ची पडले तरी बेहतर आहे, पण तें केल्या शिवाय राहावयाचें नाहीं असा तूर्त शत्रूचा निश्चय दिसतो. या कामीं आतांपर्यंत शत्रूचे दीड लक्ष लोक मारले गेले आहेत असें रूटरचा बातमीदार ह्मणतो. शत्रूनें तोफखान्याची मजबुती उत्तम केली आहे. ३० मैलांच्या परिघांत २९०० तोफा त्यानें लावून ठेविल्या आहेत. जवळ जवळ इतक्याच तोफा ब्रेंटा व पियाव्हे यांच्या मधील रणक्षेत्रांत इटालियन लोकांपासून शत्रूनें घेतल्या होत्या. तेव्हां बहुधा या तोफा इटालियन लोकांच्या असून त्या आतां त्यांचेवरच रोख धरीत असल्या पाहिजेत. तोफखान्यावरच शत्रूची सध्या सारी भिस्त आहे, व शत्रूच्या जवळ इतक्या तोफा आहेत व आपल्या जवळ नाहींत हीच इटालियन लोकांना व मित्रांना सध्या मोठी अडचण आहे.

## रशिया.

रशियाच्या अंतःस्थितीवर रोजच्या येणाऱ्या नव्या नव्या बातम्यांनीं प्रकाश तर पडत नाहींच, पण उलट ज्यास्त घोटाळा मात्र उडतो. एक ठळक गोष्ट मात्र खरी दिसते आणि ती ही कीं रशिया व जर्मनी यांच्या मध्यें तह होण्यासाठीं लढाईची तहकुबी ठेवण्याच्या करारपत्रावर सह्या झाल्या. ही तहकुबी ता. १७ दिसेंबर पासून सुरू होऊन ता. १४ जानेवारीपर्यंत चालू राहील व कदाचित् पुढें ही तिची मुदत वाढेल. तहाचीं बोलणीं लागलीच सुरू होतील. खरोखर तह झालाच तर बोल्शेव्हिक लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकल्या खेरीज जर्मनी तो घडून येऊं देणार नाहीं हें निश्चित आहे. जर्मनी जें जें कांहीं ह्मणेल तें तें वाक्य मानण्या इतका भोळेपणा बोल्शेविकांच्या ठायीं आहे. उदाहरणार्थ, जर्मनीनें पूर्वेकडचें सैन्य हलवून पश्चिमेकडे हलवूं नये ही अट जर्मन वकीलांनीं कबूल केली आहे. पण या बातमीवर बोल्शेविकांनीं भरंवसा ठेविला

तरी तसें करण्याइतकें जग अद्याप खुळें झालेलें नाहीं. ह्मातारे कोतारे, जखमी झालेले वगैरे थोडेसे शिपाई तेथें ठेवून आपण तहाची अट पाळली असें जर्मनी सांगेल, पण बाकीचें सारें सैन्य पश्चिम रणक्षेत्रांत येऊन उतरेल. बोल्शेव्हिक यांना जर्मन एजंटांनीं किती भुलथापा किंवा द्रव्य देऊन वश करून घेतलें आहे तें या वरून दिसून येईल.

रशियाच्या दक्षिण भागांतून परस्पर विरोधी बातम्या रोज येत आहेत, व त्या इतक्या थोडक्या व संदिग्ध शब्दांनीं दिलेल्या असतात कीं खरा प्रकार काय आहे तें त्यांवरून मुळींच कळत नाहीं. आज अमुक रशियन सेनापति कैद केले गेले अशी बातमी येते तर उद्या तेच सोळा हजार पायदळ व तोफखाना घेऊन येत आहेत व लोकांना चिथावीत आहेत अशी ही बातमी पाठोपाठ येते. इस्माय लोवस्की व पेट्रोगाडस्की पलटणींच्या सभेंत असा ठराव झाला कीं माजी झारला क्रन्सडाटहून काढून सेंट पिटरच्या किंवा दुसऱ्या एखाद्या किल्ल्यांत अडकवून ठेवावें. ही बातमी येते न येते तों मागाहून दुसरी बातमी ठेवलेलीच कीं माजी झार पळाला. यांतलें खरें कोणतें तें परमेश्वर जाणे! पेट्रोग्राड येथील रूटरचा बातमीदार कळवितो कीं केरेन्झस्कीचा शोध फार बारकाईनें सुरू आहे. तो शहरांत कोठें तरी लपून बसलेला आहे अशी लोकांची समजूत आहे. बोलशेव्हिक लोक आपल्याहून भिन्न मताच्या लोकांशीं फार क्रूरतेनें वागत आहेत. राजधानींतल्या ब्यांकवाल्यांनीं संप केला आहे. त्यांची एक सभा भरविण्याच्या खटपटींत खजीनदार होते, त्यांना व ब्यांकेच्या म्यानेजराला बोलशेविकांनीं कैद केलें. जनरल कॅलेडिन यांना पकडल्याची बातमी खरी असल्याबद्दल अद्याप कांहीं पुरावा आलेला नाहीं.

## शेतकी परिषद्.

गेल्या १६ वे तारखेस आकोला येथें 'आवर डे' च्या रंगमंदिरांत ही परिषद् भरली होती. त्या वेळीं अध्यक्ष या नात्यानें राजश्री स्टांडन कमिशनर साहेब यांनीं प्रस्तुतच्या स्थितीचें सिंहावलोकन करितांना लोकांस भावी कार्यमालेचा उपदेश मोठ्या कळकळीनें केला. हा मराठी परिवेषांत येणें प्रमाणें आहेः—

" नेहमीच्या पद्धतिप्रमाणें गतवर्षींच्या कामाबद्दल कांहीं थोडेसे शब्द बोलून शेतकी खात्याच्या अधिकाऱ्यांनीं तुमच्या समोर मांडिलेल्या कार्यक्रमांतील अतीशय महत्वाच्या बाबी कोणत्या आहेत हें मी तुमच्या नजरेस आणितों. यंदाच्या वर्षीं शेतकी खात्यानें आपल्या पुढें दोन नव्या गोष्टी ठेविल्या आहेत. एक बोरगांव फार्ममध्यें तयार केलेले नवीन गोन्हे आणि दुसरी गोष्ट बाटली ह्मणजे आकोला फार्ममध्यें माळी शिकवून तयार करण्याचा नवीन वर्ग.

गोन्ह्यां संबंधानें ह्मणाल तर आपल्या पैकीं कांहीं खानदानीच्या व मोठ्या इस्टेटवाल्या गृहस्थांनीं गुरें तयार करण्याचें अगदीं अधुनिक पद्धतीवर एखादें खातें स्थापन करण्याच्या इराद्यानें हे गोन्हे विकत घेतल्यास फार चांगलें होईल असें मला वाटतें. हे गोन्हे नुसते गांवच्या गुरांच्या कळपांत ठेवून हलक्या दर्जाच्या गायांवर त्यांचा उपयोग केल्यानें कांहीं फायदा होणार नाहीं कारण याच गायांवर कळपांत फिरत असलेल्या इतर लहान गोन्ह्यांचा सुद्धां उपयोग केला जातो. गुरांमध्यें युरोपांत जी सुधारणा झाली आहे ती मुख्यत्वें करून श्रीमान व मोठ्या एस्टेटवाल्या कांहीं थोड्या घराण्यांच्याच श्रमानें झालेली आहे. एखादें विवक्षित घराणें विवक्षित प्रकारचीं गुरें सुधारण्या विषयींचा अभिमान बाळगतें व त्या सुधारणेचें काम बापाच्या मागून मुलगा करीत राहतो. अशा रीतीनें एक दोन पिढ्यांतच, जें दुसऱ्या कोणत्याही रीतीनें होणार नाहीं असें फार उपयुक्त कार्य घडून येतें.

माळी वर्गासंबंधानें ह्मणाल तर आपणास माहीत आहे कीं वऱ्हाडांत फळफळावळ आणि भाजीपाला यांची लागवड फारच थोड्या प्रमाणांवर करण्यांत येते. परंतु अनुभवावरून असें सिद्ध झालें आहे कीं वऱ्हाडांत देखील कांहीं जागीं उत्तम फळफळावळ होऊं शकते पुष्कळ वेळां अशी कुरकुर ऐकण्यांत येते कीं शिकविलेले माळी मिळत नाहींत मग बगीच्या लावण्याची खटपट करून काय उपयोग? कांहीं गृहस्थांनीं, आणि यांमध्यें खामगांवचे रावबहादुर देशमुख हे अतीशय प्रमुख होत, सांगितलेंच आहे कीं चतुर माळ्याच्या शिकवणी पासून पुष्कळ फायदा होतो. असल्या माळ्यानें आपल्या ( वऱ्हाडच्या ) भागांत फिरून निरनिराळे मळे पहावे ह्मणजे फार फायदा होईल. असला शिकलेला चतुर माळी हल्लीं या कामाकरितां नेमण्यांत आला आहे व तोच आकोला येथील माळी वर्गावर देखरेख करणार आहे. मला अशी आशा आहे कीं बगीच्यांचे मालक या माळ्याशीं पत्रव्यवहार करून त्याला आपले बगीचे पाहण्यास बोलावितील व त्याजकडून जरूर ती माहिती करून घेतील. शेतकी संबंधीं ज्यांना कळकळ आहे असे गृहस्थ आकोला येथील माळी वर्गांत विद्यार्थी पाठवितील अशी मला उमेद आहे. हल्लीं त्या वर्गांत एकच विद्यार्थी आहे व आणखी सात विद्यार्थ्यांची सोय करितां येईल. ज्यांना थोडें फार शिक्षण मिळालें आहे अशी मुलें अगर तरुण माणसें सदरहू वर्गासाठीं विशेषतः निवडली जातील; परंतु आऊतकरी असल्यास त्यांनाही शिक्षण देण्यांत येईल. त्याना आठ रुपये दरमहा प्रमाणें स्कालरशिप मिळेल आणि फार्मवरच त्यांचा राहण्या वगैरेची सोय होईल.

२ गतवर्षांच्या कान्फरन्स मध्यें जे कांहीं अतीशय महत्वाचे ठराव पास करण्यांत आले त्यांतील एक ठराव असा होता कीं जास्ती सीड फार्म व युनियन्स ( बियांची शेतें व संघ ) स्थापन करण्यास सरकारी अधिकाऱ्यांनीं मदत करावी. मे. डेपुटी डायरेक्टर साहेबांनीं वाचलेल्या रिपोर्टावरून आपणास असें दिसून आलेंच असेल कीं कीं या प्रयत्नाला फार यश आलें. सीड फार्म आणि रजिस्टर केलेले संघ यांची संख्या दुपटीपेक्षांही जास्त वाढली आणि वरेचसे रजिस्टर न केलेले संघही स्थापन करण्यांत आले. या वाढीबद्दल आपण आनंद मानून घेण्यास हरकत नाहीं. या संस्थांची प्रगति ज्या त्वरेनें झाली त्यावरून रोझीयम बियाण्याचे फायदे सर्व लोकांना कळले असावे असें दिसून येतें. परंतु सबडिव्हिजनल आफिसर किंवा तहशिल्दार यांच्या मदती शिवाय जर इतकी संख्या वाढली असती तर जास्त चांगलें झालें असतें हें मी सांगण्यास नको.

(अपूर्ण)

# वऱ्हाडवृत्त.

**ग्रामपंचाईत**—रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार व राजश्री विल्स या दोन सरकारी अधिकाऱ्यांबरोबर रावबहादुर केशव गोविंद दामले व रावबहादुर केशवराव जानराव देशमुख खामगांव या २ गृहस्थांची कमिटी नेमून कांहीं विशिष्ट गांवांत ग्राम पंचायती सुरू करण्याच्या इराद्यानें पूर्व चौकशी १९ जानेवारी पासून करण्याविषयीं हुकूम झाला आहे. तारीख १९ मार्च पर्यंत कमिटीचा रिपोर्ट तयार व्हावयाचा आहे. ही सर्व योजना फार समाधानकारक होईल असा भरंवसा वाटतो.

मराठा शिक्षण परिषदेला येत्या गुरुवार पासून श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या अध्यक्षते खालीं खामगांवास सुरवात व्हावयाची आहे. या परिषदेपुढें येणाऱ्या विषयांचा कच्चा खर्डा आह्माकडे आला आहे. त्यावरून पाहतां विषय नवीन व बहुत असून त्यांत मराठा ही जाती प्राधान्य करून वेगळी पाडण्याचा हेतू दिसतो. तसा मात्र प्रकार होऊं नये. लष्करी शाळा, हायस्कूल इत्यादि संस्था जरूर पाहिजे आहेत.

वार रिलीफ फंडाच्या वऱ्हाडच्या शाखेला अक्टोबर महिन्यामध्यें ११०९ रुपये वर्गणी मिळाली आणि ४७६६ रुपये सैन्याच्या निरनिराळ्या शाखांकडे खर्च करण्यांत आले. सुमारें ९३॥ हजार रुपये आजपर्यंतची शिल्लक आहे.

**टूम**—गेल्या १२ तारखेला केळीवेळी येथें कापडी हत्तीवर राजे साहेबांची मिरवणूक काढून ओवाळणी १७८२ जमा झाली. याचें श्रेय रावसाहेब सूर्यभान जानजी यांचे कडेस आहे.

आकोटचा एक होमरूलर राजश्री टिळक यांच्या स्वागताप्रीत्यर्थ जमा होणाऱ्या फंडाबद्दल कुरकुर करीत आहे. दिलपसंतीच्या गोष्टींत या रुसव्या पाढ्याला जागा नाहीं.

**हायस्कूल एन्ट्रन्स स्कॉलर्शिप परीक्षाः**—हा नवी परीक्षा सुरू करून आह्मी वेळोवेळ सुचविलेल्या विद्यार्थ्यांच्या मार्गांतील अडचणी दूर केल्याबद्दल आह्मी डायरेक्टर साहेबांचे ऋणी आहोंत.

**कापसाचा भाव**—या भावांत १० रु. मंदी होऊन परवाचा २१० रुपये खंडी

हा भाव होता. माल मात्र उत्तरोत्तर कमी येत चालला असून कापसाचा बाजार यंदा फार काळ टिकणार नाहीं.

**जाहिर सभा**—ता. २६ रोजीं येत्या बुधवारीं जेव्हां काँग्रेसच्या सभेला प्रारंभ होईल तेव्हां त्याच दिवशीं तालुका निहाय जाहिर सभा भरून श्रीमती बिझांट यांचा संदेश लोकांस कळविण्यांत येण्याचा चालू सालापासून नवीन उपक्रम होणार आहे.

**अभिनंदन**—गेल्या १२ व्या तारखेला 'अवरडे' मंडपांत राजश्री स्टँडन यांच्या हातानें खालील अधिकाऱ्यांचा बहुमान होऊन त्यांस त्यांच्या पैकीं हजर असलेल्या मंडळीस इनामें देण्यांत आलीं.

| रा. रा. | इनाम |
|---|---|
| इन्स्पेक्टर अबदुल गफूर सी. आय. डी.; सर्कल इन्स्पेक्टर भगवतीचरण सिंह; सब इन्स्पेक्टर रामचंद्र दुबे | प्रत्येकी रुपये २०० |
| प्रॉ. इन्स्पेक्टर रामचंद्र शर्मा | १०० |
| सर्कल इन्स्पेक्टर शमसुद्दीन अहमद; रूब इन्स्पेक्टर परमेश्वर दयाल; स. इ. वलायत अल्ली; " महमद दाऊत; " कालराम लाढ | ६० |
| मिरजा रहिमानबेग ऑनररी मॅजिस्ट्रेट | सनद |
| फकरुल्लाबेग स. इ.; अबदुल कादर "; प्रल्हाद सखडे " | ५० |

## नोटीस.

**नोटीस कलम ११ आक्ट ८ सन १८९० प्रमाणें.**

कि. मुकदमा नंबर १०९ सन १९१७ इ.
विद्यमान डिस्ट्रीक्ट जज साहेब यांचे कोर्ट मुक्काम आकोला पश्चिम वऱ्हाड
नांव रामु
बापाचें नांव विठोबा
जात कुणबी राहणार तुलंग खुर्द
तहसील बाळापूर जिल्हा आकोला
ज्या अल्पवयी तुकाराम
उमर वर्षे १२
राहणार तुलंग ता. बाळापूर तहसिलीचे (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालनकर्ता (१) नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं—

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं सदहू अर्जदारानें सदहू अल्पवयीचें (२) शरीर व इस्टेट रक्षण करण्यासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदहू अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख ९ माहे १ सन १९१८ इ. रोजी नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यात येत आहे कीं, सदहू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यांस जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालाचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे; आणि त्यांस असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख ७ माहे १२ सन १९१७ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशीं दिली

सही
W. R. Dhobley
डि. जज्ज
पश्चिम वऱ्हाड
नो. नं. ९१६ आकोला

## जाहिर नोटीस

परमपूज्य चंद्रभानजी उर्फ रामचंद्र सटवाजी राऊत राहणार मौजे कुत्याची पागरी प्रगणे शिरपूर तालुके वाशीम जि. आकोला.

यांसः——

खालीं सही करणार राहणार रिसोड तालुके वाशीम जिल्हा आकोला

इनकडूनः——

जाहीर नोटीस देण्यांत येते कीं, मी तुमची बायको आहे. लग्न होऊन गेल्यास अजमासें १२।१३ वर्षे झालीं. इतक्या काळांत तुम्ही कधीं ही माझी ने आण केली नाहीं. घर नाहीं, दार नाहीं, घरांत कोणी वडील धाकटें मनुष्य नाहीं. तुम्ही स्थाईक कोठें ही रहात नाहीं, परगावीं कोठें ही नोकऱ्याचें वगैरे गोष्टी करून तुम्ही आपले पेट भरून घेतां, परंतु माझे विषयीं तुम्हास कोणत ही प्रकार काळजी तर नाहींच. पण उलट माझा आपण तिरस्कार करित आहा मी एक दोन वेळा आले तर तुम्ही कोठें सांपडत ही नाहीं. तुम्ही माझ्या जिविताचा नाश करण्याच्या खटपटींत आहां. असें हीं मला परस्पें समजते. ज्या अर्थी मी तुम्हास नकोशी आहे, आणि ससारांत तर सर्व स्त्री पुरुषांस उघड रितीनें वागावें लागते. त्या अर्थी आण अशा स्थितींत इकडे १।२ गावीं नवऱ्यांनीं आपल्या बायका जिवें मारल्या आहेत असें समजते. तरी या भितीमुळें मजला धास्ती उत्पन्न झाली आहे. त्या धास्तीचें निवारणार्थ खात्री लायक योग्य दोन जामिनक्या माझे जिविताचें रक्षणार्थ तुम्ही लेहून द्यावे. व मजला अन्न वस्त्राच्य झालेल्या कर्जाचे पैसे सावकाराचे कढलेले देऊन टाकावे. मजला दोन तीन वर्षांपासून हिस्टेरियाची मानगी लागली आहे. त्यामुळें कर्ज काढून खाणें भाग झाले. वरील मुदतींत माझेकडस झालेल्या कर्जाची फेड तुम्ही न केल्यास त्या कर्जाचे फेडी करितां आणि माझे निर्वाहा करितां मजला दुसरा नवरा करावा लागेल. तरी त्याची पुढें जबाबदारी मजवर नसून तुमचेवर राहील. तरी ही नोटिस तुम्हास पोहोचल्या पासून आठ दिवसाचे आंत अजमासे रुपये २०० दोनशे सावकाराचे काढलेले देऊन मजला घेऊन जावे. या प्रमाणें वरील मुदतींत तुमचेकडून घडून न आल्यास निरुपायामुळें वर लिहिले प्रमाणें मजला दुसरा घरठाव करणें भाग होईल. मग माझेवर तुमचा नवरेपणाचा हक्क कोणते ही प्रकारें चालणार नाहीं. कळावें दस्तुर— रंगनाथ तुकाराम खडेंकर राहणार रिसोड

सही
तुळसाई जवजे चंद्रभान राऊत रा. रिसोड नि. खुद आंगठा
नो नं० ९१७

## नोटीस

श्रीमंत महाराज कमळजी तेली राहणार लोणार जि. बुलढाणा

यांसः——

कळविण्यांत येते कीं आपले येथील रा. निळकंठ बापूजी सोनार यांचे मधले भावास आमची मुलगी दिली. लग्न कार्यानंतर यांचे घरीं कांहीं दिवस रहाण्याचा मजला प्रसंग आला. तेव्हां यांचे घरचे वर्तन चुकीचें दिसलें तें दुरुस्त व्हावे झणून यास पत्रें लिहिलीं. याचा जबाब लेखी मिळावा झणून याचे एका वर्षेतील मूळ दोन वेळां परत केलें. तिसऱ्यांदा आपण यांस घेऊन आला. या वेळीं आपण चार चौघांत आमचा उभयतांकडून देवाची शपथ घेवविली कीं मागील सर्व विसरावे. व परस्पराचे मूळ परत करूं नये. माझे संशयावरून आपण याचे जमानतदार बनून बोलले होते कीं आपले मूळ परत करणार नाहीं. हे शब्द आपण दररोज ज्या पवित्र मनानें देवाची पूजा करितां तितक्या निष्ठेनें उच्चारिलें असें मी मानिलें. तोंडी बोलणें व लेखी लिहिणें सारखेंच असें मी समजतों. नंतर मी माझे मुलीस मूळ आलो असतां यानें मजला परत केले वरून हा देवाची शपथ घेऊन हा लबाड बोलणारा अशी खात्री झाली. यानें मुलीस तिचे मामाचे लग्नास पाठविलें नाहीं. मुलीनें वागविलेला तिचा महा वर्षाचा भाऊ मरण पावला तरी तिच्या आईच्या भेटीस आणिलें नाहीं. आमची आई स्वर्गवासी झाली तरी हा आमचे घरपर्यंत आला नाहीं. याचे मनाच सफाई करिता श्रीमंत महाराज यादवराव काळे वकील मेहकर याचे स्वदस्तुरचे पत्र दिलें तरी परिणाम झाला नाहीं. यानें आपल्या चार बहिणींचे प्रत्येकीं तानसें रुपये हुंडा घेऊन लग्नकार्यें केलीं, मी मुलीचा पैसा घर्णे निंद्य मानितों, प्रथमच पाठविलेल्या माझे अज्ञान मुलीस या चार वर्षांत मजला सहा सातवेळां परत केले. या अवधींत मी आपणास बरीच पत्रें लिहिलीं व रजिष्टर करून पत्रें ही पाठविलीं तरी एका ही पत्रास जबाब दिला नाहीं. यंदा दिपवाळीस मी मूळ आलो असतां वाटेल त्या शर्तीचा लेख लिहून देण्यास तयार होतो. व रा. गोविंद भट जोशी पारसकर हा वाटेल तसा बॉंड लिहून देण्यास तयार होता. या आपल्या अनोळखीच्या इसमाच्या लायकीबद्दल बाळापूरच्या कोणत्या ही सावकाराचा जबाबी तार आणवून देण्यास आम्ही तयार होतों. शिवाय आपले येथील रा. पांडुसा सोनार यानें मुलीस आणीन. अशी हमी घेतली होती तरी मुलीस तिचे चुलते काकाच्या आठ वर्षांच्या भेटीस आपण पाठविलें नाहीं. आपल्या श्रीमंतांकडे व दयाळू मनाकडे पाहून मी आजपर्यंत शांत राहिलो तर हीं नोटिस मिळाल्यापासून आठ दिवसांत आपण आमचे तर्फे कोणीं ही मूळ आलेतर मुलीस पाठवूं असें लेखी कळवावें नाहीं तर आपण आमचे मुलीस विकत घेतलेले जनावर मानतां व माझा विश्वासघात केला असें समजेन. कळावें. ता. ११-१२-१७

सही
राघव गंगाराम उज्जैनकर मास्तर रा. दहिहांडा जि. आकोला
नो० नं० ९१८


## ५०० फोटो १ रु. त!

निरनिराळ्या साधु-संतांचे, नांव गांवासह व पाहतांच ओळख पटण्या इतके हुबेहुब ३०० फोटोंचे; सुंदर **दहा चित्रपट!** किं० रुपये २॥; ।; व ४१० आणि लोकोत्तर चमत्कार, जगातील आश्चर्यें, चौऱ्यांशीं आसनें, सुंदर-सुंदर स्त्रिया आणि मनोविकार व प्रेम इ. २०० फोटोंचे **सहा चित्रपट!** किं० रु० १॥; ४१२ व ४६ (मोला चित्रपटांबर ५ हजार वर्षांचें **क्यालेंडर** बक्षीस!)

**श्री० व० नगरकर, नाशिक**
नो० नं० ४७८

# अमृतबहार.

**(२०० रोगांवर चालणारी एकच औषधी)**

ही हजारो लोकांनीं अनुभवलेली आहे. सदहू औषध घरांत असल्यास कोणत्या ही प्रकारें इतर औषधाची जरूर पडत नाहीं. खरूज, गजकर्ण, खोकला, ताप, महामारी, प्लेग, गरमी, परमा, डोकेंदुखणें, पोटदुखणें, दादखुजणें, वगैरे वर मूल्य १ बाटलीस रुपये १ ट. ख. निराळा जागोजागीं एजंट पाहिजेत.

पत्ता
भाई रामसिंग ॲंड सन्स मॅनेजर
अमृत बहार कंपनी मुजाबाद
जिल्हा मुलतान (पंजाब)
नो. नं. ४८९

## कागदी बादाम

सर्वोत्तम ४१० गिरी जर्दालू ४१, जर्दालु ४४ कागदी अक्रोड ४३, गरी अक्रोड ४४, अंगुरी हिंग रु. २। आणि शाहजिरें १। रत्तल, मुश्क कस्तुरी रु. ३१, सुर्मा ममीरा,१ पवित्र केशर १॥ आणि शुद्ध शिलाजित ४१ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५
नो. नं. ४७७


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd. No. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला--सोमवार तारीख ३१ माहे डिसेंबर सन १९१७ ई० [अंक ५२

## जाहिरात.

१ रिणमोचन तालुके व जिल्हा उमरावती येथील वार्षिक यात्रा रविवार तारीख १३ जानेवारी १९१८ इसवी रोजीं भरण्यास सुरुवात होऊन पुढें तारीख १० फेब्रुवारी सन १९१८ पर्यंत प्रत्येक रविवारीं भरेल. तसेच सोमवार तारीख ११ फेब्रुवारी १९१८ इसवी रोजीं अर्धोदय-पर्व असल्यामुळें त्या दिवशीं ही चांगली यात्रा भरेल. रिणमोचन हें ठिकाण जी. आय. पी. रेल्वेच्या माना व कुरुम या स्टेशनापासून सुमारें १० मैल आहे. व उमरावतीहून कच्या रस्त्यानें सुमारें २० मैल आहे.

२ रिणमोचन येथें रविवार व सोमवार तारीख १० व ११ फेब्रुवारी सन १९१८ इसवी रोजीं आकोला व उमरावती या दोन जिल्ह्याचें मिळून शेतकीचें पदार्थांचें व जनावराचें प्रदर्शन भरणार असून परीक्षक मंडळीनीं पसंत केलेल्या प्रदर्शनांतील शेतकीचे पदार्थ व जनावरें यांचे करितां नगदी रकमेचीं बक्षिसें वाटण्यांत येतील. तरी सदर्हू दोन्ही जिल्ह्यातील शेतकरी लोकांनीं आपले शेतींत पिकणारे उत्तम जिन्नस व आपले येथील उत्तम जनावरें सदर्हू प्रदर्शनांत आणावीं त.

३ शेतकी खात्याचे डेप्युटी डायरेक्टर हे उपयुक्त व सुधारलेलीं अशी कांहीं अवजारें आणतील व ता. १०।२।१९१८ इसवी रोजीं सकाळीं ८ ते ११ वाजेपर्यंत त्याचा प्रत्यक्ष उपयोग करून दाखविला जाईल.

४ तारीख १० फेब्रुवारी १९१८ इ. रोजीं दुपारीं २ ते ५ वाजेपर्यंत नांगराच्या व छकड्याच्या शर्यती होतील.

५ तारीख ११ फेब्रुवारी १९१८ इ. रोजीं दुपारीं २ ते ५ वाजेपर्यंत सभा भरून तेथें शेतकी व पतपेढ्या संबंधीं व तसेंच जनावरां संबंधीं व्याख्यानें दिलीं जातील. नंतर बक्षीस समारंभ होऊन सभा बरखास्त होईल.

६ प्रदर्शना करितां पाठविण्याच्या प्रत्येक जिन्नसा बरोबर जिन्नस पाठविणारे इसमानें खालीं दिलेल्या नमुन्या प्रमाणें दाखला देऊन त्याजवर सदर्हू इसम ज्या गांवीं राहत असेल तेथील पाटलाची सही घेतली पाहिजे. "मी असा दाखला देतो कीं, प्रदर्शनांत पाठविलेली जिन्नस माझे येथें तयार झालेली आहे."

सदर्हू जिन्नसा बरोबर दुसरा ही एक दाखला पाठवावा व त्यांत खालीं लिहिल्या प्रमाणें खुलासा करावा.

(अ) प्रदर्शनांत पाठविण्याची जिन्नस ज्या गांवांत तयार झाली असेल त्या गांवचें नांव

(ब) तालुक्याचें नांव

(क) जिन्नस पाठविणाराचें नांव, बापाचें नांव व धंदा

७ उमरावती व आकोला जिल्ह्यांतून प्रदर्शना करितां पाठविण्यांत येणाऱ्या सर्व जिनसा अनुक्रमें उमरावती व मुर्तिजापूर तहशीलदार यांजकडेस ता. ५-२-१९१८ इ. पर्यंत पोचतील अशा बेतानें पाठवाव्यात. फळफळावळ व भाजीपाला ता. ९ फेब्रुवारी १९१८ इ. रोजीं उमरावती तहशीलदार यांना रिणमोचन येथें मिळेल अशा बेतानें पाठवावा.

८ प्रदर्शना करितां पाठविण्याच्या जिन्नसांचा नमुना पांच पौंडा पेक्षां कमी नसावा.

९ यात्रेच्या जागीं डॉक्टर, व जनावरांचे डॉक्टर हे राहतील तसेंच प्रदर्शनाचे बंदोबस्ताकरितां पोलीस गार्ड ही राहील.

१० शनिवार व रविवार ता. ९ व १० फेब्रुवारी १९१८ इ. रोजीं प्रदर्शना-करितां आणलेल्या जनावरांस चारा बगैर मोफत दिला जाईल.

११ प्रदर्शनाकरितां येणाऱ्या शेतकऱ्यांपासून अगर प्रेक्षकांपासून प्रदर्शनांत पाठविलेल्या जिन्नसाबद्दल अगर जनावरांबद्दल कोणताही कर घेतला जाणार नाहीं.

१२ फक्त उमरावती व आकोला जिल्ह्यांतील शेतकरी लोकांनाच बक्षिसें देण्यांत येतील.

१३ यात्रेंतील जागेच्या स्वच्छते विषयीं व यात्रेंतील बंदोबस्तासंबंधीं जिल्ह्याचे अधिकारी वेळोवेळीं जे हुकूम फर्मावतील त्या प्रमाणें प्रेक्षकांनीं व व्यापाऱ्यांनीं वागलें पाहिजे.

### प्रदर्शनांत आणण्याच्या जिन्नसाबद्दलचें परिशिष्ट.

| अ नं. | प्रदर्शनांतील जिन्नसांचा तपशील | बक्षिसें | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १ लें | २ रें | ३ रें | ४ थें | |
| | भाग १ ला शेतकी— आणि बागाईतीच्या जिनसा | | | | | |
| १ | रोझीया कापूस | २० | १५ | १० | ५ | ५० |
| २ | जवारी | २० | १५ | १० | ५ | ५० |
| ३ | गहूं | १५ | १० | ५ | २ | ३० |
| ४ | भुइमुग | १५ | १० | ५ | ० | ३० |
| ५ | ऊंस | ५ | ३ | २ | ० | १० |
| ६ | फळें | १० | ५ | ३ | ० | १८ |
| ७ | भाजीपाला | ५ | ३ | २ | ० | १० |
| ८ | फुलझाडें | १० | ६ | ४ | २ | २२ |
| | | १०० | ६७ | ४१ | १२ | २२० |

### भाग २ रा— गुरें

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अवलादी सांड | २५ | १५ | १० | ० | ५० |
| २ | बैल जोडी | २० | १२ | ८ | ० | ४० |
| ३ | २॥ वर्षांचे आंतील दुध सुटलेली कालवड | १० | ८ | ६ | ० | २४ |
| ४ | ३ वर्षांचे आंतील दुध सुटलेले गोऱ्हे. | १० | ८ | ६ | ० | २४ |
| ५ | अवलादी गाई | २५ | १५ | १० | ० | ५० |
| ६ | दुभत्या म्हशी | २० | १५ | १० | ० | ४५ |
| ७ | दुभत्या बकऱ्या | ६ | ४ | २ | ० | १२ |
| | | ११६ | ७७ | ५२ | ० | २४५ |

### भाग ३ रा— किरकोळ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | छकड्याच्या शर्यती | २० | १५ | १० | ५ | ५० |
| २ | नांगराच्या शर्यती. | २० | १५ | १० | ५ | ५० |
| | | ४० | ३० | २० | १० | १०० |
| | एकूण | २५६ | १७४ | ११३ | २२ | ५६५ |

वरील बक्षीसा शिवाय आणखी कांहीं बक्षिसें द्यावीशीं वाटल्यास ३५ रुपया-पर्यंत देण्यांत येतील.

ई. डॅक्स
डेप्युटी कमिशनर.
जिल्हा उमरावती.

जो. नं. ४९६

## जाहिर नोटीस

अकोला 'अवर डे' उत्सवाची सीझन टिकिटें ज्यांनीं विकत घेतलेलीं आहेत त्यांना " लकी ब्याग " ( नशीबाची परीक्षा ) या खेळाचीं तिकिटें देण्यांत आलेलीं असून त्या तिकिटांचे नंबर त्यांच्या नांवे अवर डे कमिटीचे आफिसांत रजिष्टरीं नोंदलेले आहेत. लकी ब्यागचे तिकीट धारण करणारे प्रत्येक गृहस्थानें अकोला अवर डे कमिटीचे सेक्रेटरी यांना पत्र लिहून आपले नंबर मागवून घ्यावे—अगर आफिसांतील रजिष्टर पाहून टिपून घ्यावे. लकी ब्यागचे ड्रॉइंग तारीख ३ ते ९ ज्यानेवारी १९१८ याचे दरम्यान अकोला डिस्ट्रिक्ट बोर्ड हॉलमध्यें दिवसा १२ नंतर होईल. सर्वांनीं अवश्य येऊन पहावें. पाहण्यास सर्वांस परवानगी आहे.

K. G. Damle

प्रेसिडेंट

अकोला } लकी ब्यॉग सब कमीटी.
२६।१२।१७ } " अवर डे " अकोला.

नं० नं ९२७

---

## नोटीस

रा. रा. कृष्णराव उर्फ दादा साहेब हणमंतराव देशमुख रा. वडाळी ता आकोट

यांसः—

या जाहिर लेखानें कळविण्यांत येते कीं आपण सौम्यवृत्ती व शांतता सोडून मला नेहमीं त्रास देत असता. जोशीपणाची गांवची वृत्ती पडल्यामुळें मला ग्रामत्याग करतां येत नाहीं. पण आपल्या कारवाई-पुढें मी हल्लीं अगदीं थकलो आहे. २९-३० वर्षे अदावतीला होत आलीं. दिवाणी कोर्टांत हुकुमनामे मिळवावे लागले व जोशीपणाचा हक्क पुन्हा स्थापित करण्याचा मला खर्च ही फार आला. अतां मी दिवाणीलाही थकलों आहे. यापुढें मला कुभांडें भांडतां येत नाहींत व फौजदारी मुकदम्यांच्या कटकटी सहन करवत नाहींत आपण ईश्वराला जाणून माझा पिच्छा सोडाल तर उपकार होतील. कडबा कापल्याचें प्रकर्ण आपणास माहित आहेच. माझ्या शेतीच्या कामावरही कोणी फिरकूं नये असा परिणाम झाला आहे. ऑफिसर लोकांपर्यंत कागाळ्या जातात आणि आपला त्याच्या त्याच्यावर रोष चाललेला असतो. आपण आमच्या गांवचे पाचरूण आहांत तेव्हां कृपाकरून आज पर्यंतच्या नुकसानीचा कांहीं तरी मोबदला देण्याची कृपा करावी. तसें न घडल्यास कोर्टमार्फत दाद मागावी लागेल कळावें ता. १९-११-१९१७ इ.

सही

कोंडो विठ्ठल जोशी रा. वडाळी दस्तुर खुद

नं. नं. ९१९

---

## जाहिर नोटीस

नोटिस बेशमी शालिग्राम व बापुराव या नांवची दुकान मालक गोविंदा शिवाजी पाटील साहु दुकान बटवाडी बु॥ तालुके बाळापुर

यांजकडूनः—

सर्वत्र साहु सावकार व इतर लोकांस नोटिस देण्यांत येते कीं नथु निंबाजी व गणु निंबाजी गावंडे जात कुणबी उभयता राहणार बटवाडी बु॥ तालुके बाळापुर या उभयतानीं आमचे दुकानास रुपये १०२९ चे दोन दस्तैवज करून दिले आहेत. ती रकम व्याजा सुद्धां आह्मास त्यांचेकडुन घेणें असतां ती रकम बुडविण्याचे इरादानें वरील दोन्ही इसम आपले नातलगास किंवा इतर साहु सावकारास आपली स्थावर जंगम इस्टेट पोकळ खरेदी देण्याचे विचारांत आहे'. तरी या नोटिशीनें सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, त्यांची जिनगी कोणी गहाण खरेदी अगर पत्र्यानें घेतल्यास तो व्यवहार लबाडीचा असल्यामुळें निरर्थक होईल कळावें. ही नोटिस ता० २३-१२-१७

सही

गोविंदा शिवाजी पा. दुकान बटवाडी बु॥ निजबत शिवराम कर्णाजी पाटील दस्तुर खुद

नं० नं० ९२०

---

## नोटीस.

जाहिर नोटीस बेशमी अर्जुन्या वल्द अमन्या माहार रा० तीवसा ता. आकोला

यांसः—

खालीं सही करणार ह्यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं व सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं माझा नवरा अर्जुन्या वल्द अमन्या माहार हा चार वर्षापासून मंगरूळपीर येथें मुसलमान झाला आहे हा कोठें आहे याचा पत्ता नाहीं. तेव्हां पासून मी माहेरी आहे व त्याची वाट पाहिली व हिंदुधर्माप्रमाणें त्याचा आतां माझा कांहीं एक व्यवहार ठेवतां येत नाहीं व मला पुन्हां गंधर्व करण्याची मोकळीक आहे. तरी मी आतां गंधर्व करीन सही ता० २२।१२।१७

सही

रायजी मर्द अर्जुन्या माहार निशाणी डावा हातचा आंगठा असे

नं० नं० ९२१

---

## जाहिर नोटीस

रा. रा. गणपत आळेकर माळी रा० अरळ ता० दर्यापूर

यांसः—

अनेक आशिर्वाद माझी मुलगी नामे काशी ही तुमची गंधर्वाची बायको आहे. ती आठ दिवसापूर्वी माझे येथें परत आली. आपण उमरावतीस दवाखान्यांत औषध घेत आहा आणि तिला कां आणून घातले हे बरोबर समजत नाहीं. पण तिला सुखानें आणून घातलें नाहीं असें दिसतें. तिच्या गळ्यांतील गळसरी काढून घेतली आहे व पायांतील जोडवीं हीं तुह्मी काढून ठेवून घेतलीं आहेत. हे दोन्ही अलंकार सौभाग्याचे आहेत आणि ते काढून घेतल्यामुळें लोक तिला विधवे प्रमाणें आणून तुह्मी सोडलें असें ह्मणतात. आणि त्यामुळें आह्मी सर्व आप्त मंडळी फार दुःखी व कष्टी आहों.

नुकते २ महिने झाले ती ऋतुस्नात झाली आहे. सर्व पैसा अडका तुमच्याच स्वाधीन असतो अशा स्थितीत तिच्या अंगीं तुह्माला कोणताही दोष लावतां येत नाहीं. या रीतीनें माझ्या अबला मुलीला तुह्मी फसवून ईश्वराचा व राजाचा गुन्हा केला आहे. त्या पापाचा झाडा तुह्माला द्यावा लागेल. छोहाची आरी पत्नीवर चलविणें हा गुन्हा होतो, तेव्हां तिचा डाग माणसाच्या अंगावर देणें केव्हां ही कायदा मंजूर करणार नाहीं आपण चांगल्या तऱ्हेवर येऊन नीटपणें समजूत केली तर बोभाटा होणार नाहीं व आपल्या सद्गुणांचे भांडार सरकारापुढें उघडून दाखवावे लागणार नाहीं. आपण नेहमीं अपशब्द बोलतां व जिवाला धोका करण्याची धमकी देतां. पांढरीकर तुमचे श्वशुर यांची या कामांत तुह्माला मदत आहे असे गांवचे सर्व जग सांगते. आपण चार संभावीत लोकांची खात्री करून देऊन गोडीगुलाबीनें माझ्या मुलीला घेऊन जावें. तसें करण्यास आपण १ महिन्यापेक्षां अधिक विलंब लावाल तर सर्व प्रकार भलत्याच थरावर जाईल आणि ती गोष्ट उभयपक्षीं अकल्याणाची होईल. या नोटिशीचा खर्च तुह्मावर पडेल कळावें तारीख१९।११। १९१७ इ.

सही

गीरजाई मर्द गोविंदा धरमाळ राहणार सासन दस्तुर जयराम माखोजी

नं० नं० ९२२

---

## जाहिर नोटीस

खालीं सही करणार यांजकडून सर्वत्र लोकांस जाहिर नोटिस देण्यांत येते कीं, आमचे दुकानीं विठ्ठल हरबाजी कोष्टी रा कारंजा ता. मुर्तिजापूर हा आमचे दुकानीं मुखत्यार होता हल्लीं बरेंच दिवसापसून नोकरीवरून दूर केले आहे व त्यांचे मुखत्यारपत्र रद्द केलें आहे तरी त्या इसमाशी आमचे दुकानचा कोणतेच प्रकारचा व्यवहार करूं नये. केल्यास रद्द समजला जाईल. कळावें दस्तुर मारुती कोंडबा कोष्टी राहणार कारंजा तारीख २०-१२-१७ इ०

सही

मोतीलाल ओंकारसा चवरे तर्फे मु० मारुती कोंडबा कोष्टी द० खु०

नं० नं० ९२३

---

## नोटीस

नोटिस बेशमी विठ्ठल वा॥ हरबाजी कोष्टी राहणार कारंजा तालुके मुर्तिजापूर जिल्हा आकोला.

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी आमचे दुकानावर तारीख २८-९-१९१७ इसवी रोजीं पासून मुखत्यार होते व आतां तुह्मी सं १९७३ चे भाद्रपद शुद्ध ७ रोजीं कामावरून दूर केले आहे. तरी या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, तुह्मी आमचे नांवानें अगर आमचे तर्फे कोणतेच प्रकारचे काम करूं नये. केल्यास तुह्मी जबाबदार ठरले जाल. या नोटिशीवरून तुमचे मुखत्यारपत्र रद्द केले आहे. दस्तुर मारुती कोंडबा कोष्टी राहणार कारंजा तारीख २०-१२-१७ इ०

सही

मोतीलाल ओंकारसा चवरे तर्फे मुखत्यार मारुती कोंडबा द० खु०

नं० नं० ९२४

---

## नोटीस.

नोटिस बेशमी लक्ष्मी जवजे गोपाल भुसारी राहणार मळगांव ता. मलकापुर जि. बुलढाणा

हिलाः—

बळवंत व्यंकटेश भुसारी रा. हिरपूर यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मी तुला तारीख ८-३-१७ रोजीं जो मृत्युलेख करून दिला आहे तो तुझ्या अविश्वासानें मी रद्द केला आहे. तरी तूं त्या लेखाचे आधारानें त्यांत दाखविलेले सुनगांव येथील सर्वे नंबर ३४२ पो. हि. १ व ३६९ शेता संबंधीं कोणत्याच प्रकारें हक्क दाखऊ नये. कारण त्या लेखा प्रमाणें मला अगर माझे मुलास पैसे मिळाले नाहींत व मिळण्याची ही तुझ्या कृतीनें आशा राहिली नाहीं. करितां मी दिलेला लेख रद्द समजून तूं वरील शेताबद्दल कोणतेच प्रकारें हक्कदार राहिली नाहींस कळावें ता. २६-१२-१७

सही

बळवंत व्यंकटेश भुसारी राहणार हिरपूर द. खुद

नं० नं० ९२५

---

## नोटीस.

नोटिस बेशमी खालीं सही करणार शालिग्राम व बापुराव या नांवची दुकान मालक गोविंदा शिवाजी पाटील साहू दुकान बटवाडी बु॥ ता. बाळापूर

यांजकडूनः—

नथु वा॥ निंबाजी व गणु वा॥ निंबाजी जात कुणबी आडनांव गावंडे उभयता राहणार बटवाडी बु॥ तालुके बाळापूर

यांसः—

नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी आह्मास दस्तैवज दोन १०२९ रुपयाचे करून दिले असून त्या दस्तैवजाची मुदत भरणें राहिली आहे. परंतु अलीकडेस आह्मास इतर लोकांकडून समजण्यांत आले आहे कीं, तुह्मी आमचे कर्ज बुडविण्याचे इरादानें आपले नातलगास छुपावण्याचे इरादाने पोकळ खरीदीखत करून देण्याचे विचारांत आहां. नर तुह्मी आमचे रुपयाची आदाई न करतां लबाडीनें तुमचे नातलगास किंवा इतर साहू सावकारास तुह्मी आपली स्थावर जंगम जिनगी गहाण किंवा खरेदी दाल किंवा पत्र्यानें लावून काढाल तर ते व्यवहार कपटाचे असल्यामुळें निरुपयोगी व निरर्थक कोर्टमार्फत ठरले जातील. व त्याबद्दलचा खर्च तुह्मास सोसावा लागेल. कळावें ही नोटिस ता. २३-१२-१७

सही

गोविंदा शिवाजी पाटील बटवाडी बु॥ निसबत शिवराम कर्णाजी पाटील दस्तुर खुद

नं० नं० ९२६

## नोटीस

नोटिस बेशमी अंबू वा अप्पाजी जात लिंगाईत झाली राहणार कारंजा तालुके मुर्तिजापूर

यांसः—

खाली सही करणार हिजकडून कळविण्यांत येते कीं, तुह्मी तारीख २८-११-१७ रोजीं वऱ्हाड समाचारांत जाहीर नोटिस दिली ती खोटी आहे. कारण माझा नवरा नामें महादाजी यांनीं आपसांत वाटण्या झाल्या नंतर दुकान बांधिलें आहे. करितां त्याजवर तुमची बिलकूल मालकी नाहीं. करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, तुह्मी माझे व्यवहारांत बिलकूल हात घालूं नये. व आमचे भाडेवाल्यास धमकी वगैरे देऊं नये व आपले नांवची भाडे चिठी वगैरे करून घेऊं नये. अगर माझे कामांत अडथळा वगैरे करूं नये. केल्यास तुमचेवर कायद्याप्रमाणें तजवीज करण्यांत येईल. कळावें तारीख २७-१२-१९१७ इ.

सही

सहीची निशानी आंगठा तुळसाबाई

जवजे महादाप्पा लिंगाईत झाली

राहणार कारंजा हिचा खुद्द

नो० नं० ५२८

---

## नोटीस

रा. रा. देविदास बाळकृष्ण पटवारी ब्राह्मण रा. मुऱ्हा ता. दर्यापूर

यांसः—

या लेखानें कळविण्यांत येते कीं, आपले मोगलाईमुळें मी फार हैराण झालों. आणि घरची १०-१९ तिफणची जमीन असून ही मला माझा हा पिढिजात गांव सोडण्याला कारण झालें. मी हल्लीं कापुसतळणी येथें येऊन राहिलो आहे. तरी आपले तिकडील बातम्यामुळें माझा थरकाप होतो. ३ महिन्यापूर्वी आपण पोलिसांत रिपोर्ट केला व कांहीं तरी बहाणा करून २-३ इसमाकडून ओसरींत नेले. तेथें परमेश्वरी नोट ६०० सहाशें रुपयांची तुह्मी लिहून घेतली आहे अशी आतां गुणगुण कळते. ती नोट अर्थात खोटी आहे आणि पोलिसांत ही तुह्मी माझ्या नांवचा बभ्रा केला आहे. असो, तें कांहीं ही हातों आपण मुकाट्यानें ती प्रॉमिसरी नोट ४ पंचासमक्ष परत करावी. नाहीं तर मला योग्य ती कारवाई आपल्यावर चालवावी लागेल. या गोष्टीला मी ८ दिवसांची मुदत दिली आहे, या नोटिशीचा खर्च तुह्मावर पडेल व आपल्या आगळिकीमुळें माझे जें नुकसान होईल तें आपल्याकडून भरून घेतल्या जाईल कळावें ता. २१-१२-१७

सही

तुकाराम गणाजी दसुर खुद्द

नो. नं. ५२९

---

वऱ्हाडसमाचार

मार्गशीर्ष वद्य ३ पिंगल संवत्सर १८३९

## राष्ट्राची गायत्री.

लोकांची अनभिषिक्त महाराज्ञी—श्रीमती बिझांट देवी यांनीं इंडियन राष्ट्राला आपला हार्दिक व प्रेमळ निरोप पाठविला आहे. हा निरोप ह्मणजे यंदाच्या ३२ व्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांनीं राष्ट्राला केलेला उपदेशच होय. चक्रवर्ती बादशहांच्या जाहिरनाम्याला जें पवित्र उच्चस्थान लोकांच्या हृदयांत मिळत असते, त्याच प्रतीचें स्थान श्रीमती बिझांटदेवींच्या अमृतस्रावी या जाहिरनाम्याला मिळेल हा जाहिनामा गेल्या २६ व्या तारखेला राष्ट्रीय सभेच्या बैठकीच्या दिवशीं गांवोगांव जाहिरसभा भरून स्त्री पुरुषांच्या समुदायांना वाचून दाखविण्यांत आला. हा जाहिरनामा अध्यक्षांच्या प्रास्ताविक संभाषणाचा पहिला 'श्रीग'च होय आणि संक्षेपानें जीं सूत्रें या जाहिरपत्रकांत ग्रथित केलीं आहेत त्यांचा उहापोह विस्तारानें समग्र अध्यक्षांच्या भाषणांत पहावयास मिळेल. मातृभूमीच्या यज्ञस्थंडिलावर आपलें सर्वस्व अर्पण करणाऱ्या आणि आंग्ल व हिंदी जनतेचा एकजीव करणाऱ्या या थोर विभूतीच्या हे अंतःकरणांतील उद्गार सर्वांनीं गायत्रीतुल्य जपण्यासारखे आहेत.

"बंधुभगिनींनो ज्या कालांत सर्व जगभर मोठाल्या घडामोडी होत आहेत अशा कालांत आज आपण आहों. आणि ह्मणूनच जुन्या कालच्या लोकांनीं राष्ट्रीय उद्योगाचे जे धीरोदात्त पण साधे व सरळ असे मार्ग अवलंबिले त्याच मार्गानें आपणांस जावयाचें आहे 'हिंदी राज्यकारभारांत सहानुभूतीचा अभाव आहे' अशा अर्थाचे आपल्या बादशहांनीं पूर्वीं उद्गार काढले ते आपल्या डोळ्यांपुढें ठेवून परमपूज्य बादशहांचे प्रतिनिधी, आपल्या एकांतवासाच्या ठिकाणाहून बाहेर पडून, प्राचीन कालांतील एखाद्या राजाप्रमाणें, लोकांच्या गरजा काय आहेत हें स्वतः समजून घेण्याकरितां या अवाढव्य राज्यांत फिरत आहेत. आणि त्यांच्याबरोबर फार लांबवरून, ह्मणजे विलायतेंतून बादशहांच्या प्रधानांपैकीं एक ह्मणजे हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी हे आपल्या बादशहांच्या मनांतील आमच्याविषयीं असलेलें प्रेम व न्यायबुद्धि दर्शविण्याकरितां स्वतः आले आहेत. हिंदी लोकांनीं आजपर्यंत जीं दुःखें भोगलीं त्यांचा त्यांना बादशहाच्या प्रेमानें विसर पडेल; व उदात्त धर्म न पाळणाऱ्या बुद्धिहीन अशा राज्यकर्त्यांच्या वज्र मुठींतून इतर राष्ट्रांतील लोकांना प्रजेचे जे न्याय्य हक्क बळजबरीनें हिसकून घ्यावे लागले, ते आपणांस बादशहांची न्यायबुद्धि खास देऊं करील.

हे न्याय्य हक्क दिल्यानें सुशिक्षित हिंदी लोकांना काय मिळेल? तर राष्ट्रीय सभेमध्यें आज तेहतीस वर्षें हिंदी सुशिक्षित लोक जे ठराव पसार करीत आले आहेत ते ठराव प्रत्यक्ष अमलांत आणण्याची सत्ता त्यांच्या हातीं येईल. जपानच्या बादशहांनीं झटल्याप्रमाणें, ज्यामुळें एकाहि कुटुंबांत एकहि मनुष्य निरक्षर राहणार नाहीं व एकहि खेड्यांत निरक्षर कुटुंब राहणार नाहीं असें जें प्राथमिक शिक्षण, त्या शिक्षणाचा कायदा ते पसार करतील. हिंदी लोकांची सांपत्तिक सुधारणा होण्याकरितां ज्या संपत्तीची गरज हिंदुस्थानास आहे ती संपत्ति परदेशांतून आणतां येईल. अशा तऱ्हेनें हिंदुस्थानांतील जकातीचा प्रश्न ते सोडवतील. कारण, उन्हानें करपलेल्या भूमीवर पर्जन्यवृष्टि झाल्याप्रमाणें स्वतः निसर्ग देवतेनें हिंदला दिलेल्या साधनांचा फायदा हिंदी लोकांसच मिळाला पाहिजे. लोकांची भाषा, रूढि, चालीरीती वगैरे बाबतींत सर्वस्वी परकी अशा अधिकारी वर्गाच्या अमलामध्यें घडणाऱ्या अपरिहार्य अशा चुका व सदोष राज्यपद्धति यामुळें उत्पन्न होणारा सात्त्विक असंतोष, व त्या असंतोषामुळें निघणारे उद्गार दडपून टाकण्यासाठीं जे कडक कायदे उत्पन्न केले गेले ते कायदे हिंदी सुशिक्षित लोक रद्द करतील. हे न्याय हक्क दिल्यानें सुशिक्षित हिंदी लोकावर मोठी जबाबदारी पडेल व त्यांना अत्यंत परिश्रम करावे लागतील. पण त्याबरोबरच, अनंतकाळपर्यंत त्यांची प्राचीन घराणीं ज्या हजारों लाखों खेड्यांतून राहिलीं, त्या खेड्यांतील आपल्या आप्तेष्टांना व ज्या लोकांत त्यांचा जन्म झाला अशा लोकांना सुखी व समृद्ध करण्यानें उत्पन्न होणारा आनंदहि सुशिक्षित लोकांना होईल. ज्या राष्ट्रांत ते जन्मले त्या राष्ट्राची सेवा ते कां करणार नाहींत? कारण, पाश्चिमात्य देशांतल्याप्रमाणें किल्ल्यावर राहणारा राव व झोंपडींत राहणारा रंक, अशा तऱ्हेच्या कायमच्या भेदामुळें एकमेकांपासून भिन्न राहणारे वर्ग हिंदुस्थानांत नाहींत.

उद्योगी असून रानावनांत काम करणारे व गरीबीमुळें हल्लीं सैन्यांत व पोलिसांत शिरणारे, जन्मतः क्षात्रिय असल्यामुळें आपल्या पराक्रमी सामर्थ्यास कर्तव्याचा वाव शोधण्याकरितां धडपडत असंतुष्ट मनानें असणारे गरीब लोक आणि आपल्या पराक्रमाचें तेज पूर्णपणें पाडण्याची संधि मिळाली तर लष्करांत जाऊं इच्छिणारे श्रीमंत लोक हिंदुस्थानांत आहेत, त्यांचा हे न्याय्य हक्क मिळाल्यानें कोणता फायदा होईल? कुटुंबामध्यें उनाड व खोडकर ह्मणून संबोधल्या जाणाऱ्या या वर्गाला हिंदी लोकांनीं उभारलेल्या व हिंदी अधिकारी असलेल्या अशा हिंदी लष्करांत, हिंदी आरमारांत व हिंदी पोलिसामध्यें, त्यांच्या पराक्रमानें अनुरूप कार्यक्षेत्र मिळेल; आणि त्यांच्यापैकीं, रणांगणावर शौर्य दाखविणाऱ्या, लष्करी शिस्त राखण्यांत तरबेज असणाऱ्या, पुढारीपणाचे गुण अंगीं असणाऱ्या लोकांना सेनानायकाच्या वरिष्ठ जागा मिळतील. सद्यःस्थितींत देशांत असंतोष उत्पन्न होण्यास कारणीभूत होणाऱ्या या गुणांचा मातृभूमीच्या सेवेसाठीं उपयोग केल्यास हेच गुण परकीय शत्रूंपासून मातृभूमीचें रक्षण करतील, व देशांतील शांततेचा भंग होणार नाहीं अशी खबरदारी घेतील.

हे न्याय्य हक्क मिळाल्यानें व्यापारीवर्गाचाहि फायदा होईल. हिंदी व्यापाऱ्यांना परदेशांतीच बाजार खुले होतील, उद्योगाची भरपाई संपत्तीनें होईल, व लक्ष्मीदेवी व ऋद्धि-सिद्धि या देवता आपल्या भक्तांच्या श्रमाचें चीज संपत्तिदानानें करतील. देशांत नवीन उद्योग धंदे सुरू करणें व ते वाढविणें, देशांत तयार होणारा माल एकत्र करणें व तो हिंदुस्थानांत व जगभर पसरविणें, हें काम व्यापारीवर्गाचें आहे. सध्यांच्या परिस्थितींत या वर्गांतील सूक्ष्म बुद्धीचे व अक्कलहुषारीचे लोक, भिकार कोंदणांत बसविलेल्या रत्नाप्रमाणें, हिंदुस्थानांत पसरले आहेत. परंतु हे हक्क मिळाल्यावर हेच लोक, राष्ट्रांतील संपत्तीचें रक्षण करणारे, तिचा योग्य विनिमय करणारे व देशाच्या वैभवाचे खरे आधारस्तंभ होतील. राष्ट्राची समृद्धि ज्यावर सर्वांपेक्षां विशेष अवलंबून आहे, अशा राष्ट्रसेवेच्या या मोठ्या कार्यांत जन्मतःच बुद्धिसामर्थ्यानें जे लोक योग्य आहेत ते सर्व सामील होतील.

जो असंख्य हिंदीसमाज निराशायुक्त अंतःकरणानें आज काबाडकष्ट करीत आहे व कधीं काळीं आपल्या हाल अपेष्टा संपतील असें यत्किंचित वाटत नसतांहि त्या सोशीत आहे; जे लोक दुसऱ्याच्या उपभोगाकरितांच काबाडकष्ट करीत आहेत; जे संपत्ति उत्पन्न करतात, पण ज्यांचीं बायकामुलें भुकेलीं राहून त्यांच्या डोळ्यादेखत सर्व धान्य देशाबाहेर जातें; व ज्यांच्या झोंपडींत सुखसोईचा एकहि जिन्नस नसतांना त्यांच्या हातांनीं तयार केलेल्या सर्व जिनसांचा फायदा दुसरे लोक घेतात अशा या समाजास हे न्याय्य हक्क मिळाल्यास कोणते फायदे होतील? हे हक्क मिळाल्यानें आपल्या श्रमानें उत्पन्न केलेल्या धान्यांतून प्रथम त्यांच्या पोटास लागणारें पुरेसें धान्य व पुढील सालीं पुरेल इतकें बीं त्यांना हक्कानें राखून ठेवतां येईल. ग्रामपंचायती स्थापन करण्यांत येतील व खेड्यांतील लोकांना आपल्या खेड्याचा कारभार पाहतां येईल. गांव कामगार हे गांवचे जुलमी धनी न होतां गांवचे नोकर होतील. आपल्या मुलामुलींना खेडेगांवांतील आपला उद्योगधंदा अधिक दक्षतेनें व अधिक हुषारीनें करतां येईल अशा तऱ्हेनें शिक्षण देणाऱ्या शाळा खेडेगांवांतून उघडण्यांत येतील, व त्यांतील विशेष बुद्धिमान् मुलाला अगर मुलीला उच्च प्रतीच्या शाळांत अगर विश्वविद्यालयांत उच्च शिक्षण घेण्यास जावयाचा मार्ग सध्यापेक्षां कमी त्रासाचा व कमी खडतर होईल.

न्याय्य हक्क देणें ह्मणजे काय? तर प्रत्येक मनुष्यास त्याचे जन्मसिद्ध हक्क देणें हें होय! व हे जन्मसिद्ध हक्क ह्मणजेच स्वातंत्र्य, स्वराज्य व होमरूल होय!

मित्रहो, हिंदुस्थानच्या मर्यादेंतच हिंदुस्थानाला सुखाची प्राप्ति करून देणारें, व बाजारील सर्व राष्ट्रांत हिंदुस्थानचा मान ...

मिळवून देणारें हें होमरूल मिळविण्याकरितां माझ्याबरोबर व माझ्या सहकारी मित्रांबरोबर काम करण्यास तुह्मी तयार नाहीं काय? परमेश्वराच्या तदिच्छेनें हिंदुस्थानचा ग्रेटब्रिटनशीं संबंध जडलेला असून सर्व जगाच्या कल्याणाकरितां पूर्व व पश्चिम यांना एकसूत्रित करण्याचें परमेश्वराच्या मनांत आहे. हें सूत्र हल्लीं जबरदस्तीचें आहे. पण यापुढें तें प्रेमाचें व्हावें अशी आमची इच्छा आहे. पण हें प्रेमसूत्र उत्पन्न होण्यास हिंदुस्थान स्वतंत्र झाला पाहिजे. ब्रिटिश साम्राज्यांत परायत्त ह्मणून नव्हे, तर साम्राज्यांत एक स्वतंत्र व आपखुषीनें राहणारा जोडीदार ह्मणून त्याला राहतां आलें पाहिजे. यास्तव धिटाईनें मर्दासारखे सरकारापुढें उभे रहा; व तुह्माला काय पाहिजे तें मर्दासारखें स्पष्टपणें सांगा, तरच तुमचा आवाज साता समुद्रापलीकडे जाऊन ग्रेटब्रिटनला ऐकूं जाईल. पश्चिमखंडांतील स्वातंत्र्याची जन्मदात्री ब्रिटानिया ही, पूर्वखंडांत जिच्या पोटीं स्वतंत्र संस्था पूर्वी जन्मलेल्या आहेत अशा हिंदभूचें भगिनीप्रमाणें स्वागत करील. स्वातंत्र्याच्या कल्पनेचा प्रसार करण्याकरितां हिंदभूमीनेंच पाश्चात्य देशांत आपले सुपुत्र व सुकन्या पूर्वी पाठविल्या होत्या, तेव्हां आतां या दोघी बहिणी हातांत हात घालून, एक होऊन स्वतंत्र राष्ट्रांचें एक साम्राज्य जगांत स्थापन करून मानवजातीचें कल्याण करतील!

**आनी बेझंट.**

## रशियानें केलेला घोटाळा.

रशियाची सध्याची अंतःस्थिति मित्रराष्ट्रांना अत्यंत निराशाजनक झाली आहे हें सांगावयास नकोच. मूळ युद्ध उपस्थित करण्यास रशियानें सर्वियाचा पक्ष उचलला हें एक मोठें कारण झालें असें मि. लॉइड जॉर्ज यांनीं परवा आपल्या भाषणांत सांगितलें. युद्धाचा अखेरचा व कायमचा निकाल लागेपर्यंत मित्रराष्ट्रांपैकीं कोणीही स्वतंत्र रीतीनें शत्रूशीं तह करावयाचा नाहीं असे आपसांत करारमदार झाले होते असें असतां आज तोच रशिया आपण होऊन शत्रूशीं तह करण्यास इच्छितो, अशी अवनत स्थिति रशियाला प्राप्त झाली आहे. याचें कारण तत्त्वज्ञांनीं विचार करण्यासारखें आहे. रशियांत अनेक जातीचे लोक असल्यामुळें त्या देशच्या लोकांत एक राष्ट्रत्वाची भावना नाहीं. झारच्या एकतंत्री अमलाच्या कच्चा सुताच्या बंधनानें रशियासारखा विस्तीर्ण प्रदेश बांधला गेला होता, आणि आतां तर तें ही बंधन राहिलेलें नाहीं. झारचा अंमल नाहींसा केल्यांनें देशांत शांति, सुख, व समाधान नांदतील अशी लोकांची भ्रामक समजूत होती पण जेथें उच्च प्रकारच्या मनोवृत्ति नाहींत तेथें या गोष्टी कशा नांदाव्या हा विचार त्यावेळीं कोणाच्या ही डोक्यांत आला नाहीं. अशा स्थितींत बिघडलेलं घडी पुनः नीट बसण्यास कालावधि लागत असतो. त्यावांचून मॉ० केरेंझस्की सारख्यांचें शहाणपण तरी काय करणार? खजिन्यांत पैसा नाहीं, लोकांत एकी नाहीं, लढाईमुळें उद्योगधंदे बुडून लोक बेकार झालेले, शत्रु तर घरांत घुसलेले, सेनापति एका मागून एक भुर्रकन उडून गेले, अशा स्थितींत दातीं तृण घेऊन दंड नको, मुलुख नको, मोबदला नको, पण एकदाचा तह होऊं द्या असें ह्मणणाऱ्या लोकांची मागणी शत्रु मुकाट्यानें कबूल करील हें शक्य तरी कसें वाटलें? रशियांत सगळी अराजकता माजली आहे. तह करण्याच्या आतुरतेनें रशियन लोक दुखोनीन सारख्या सेनापतीचा खून करण्यास सुद्धां प्रवृत्त झाले. त्या लोकांना कोणत्याच गोष्टीचें बंधन पवित्र वाटेनासें झालें. निरनिराळ्या जाती स्वतंत्र होण्याची संधी पाहूं लागल्या आहेत. तह करण्याविषयीं तरी सर्वांची एकवाक्यता कोठें आहे? कोसाक व युक्रेनियन लढाई चालू ठेवा ह्मणत आहेत, तर बाकीचे याच्या उलट ह्मणत आहेत. पण तह केला समजा, तरी तहाच्या शर्ती पाळण्याबद्दल शत्रु कोणाला जबाबदार धरणार? हें तुह्मी काय मांडलें आहे? तुमच्यावर आज कोणता बिकट प्रसंग येऊन बेतला आहे तो जरा पहा, असें मित्रराष्ट्रें सांगूं लागलीं तर मॉ. ट्रॉस्की सारखे त्यांना साफ जबाब देतात कीं आमच्या घरच्या कारभारांत पडण्याचा तुह्माला काय अधिकार आहे? ‘पण तह होऊं शकत नाहीं तर लढा तरी’ असें ही ह्मणण्याची सोय नाहीं. जर्मनीनें ही सगळी स्थिति पाहून रशियापासून आपणास आतां भय नाहीं असें मनाशीं ठरवून तिकडचें आपलें सैन्य हलवून पश्चिम रणक्षेत्रावर आणण्याचा उपक्रम केला आहे. कांब्रे येथें इंग्रजांनीं मिळविलेल्या अपूर्व विजयानंतर लागलीच युद्धाचा रंग पालटला आणि जर्मनीनें उचल खाल्ली यांतलें इंगित हेंच आहे. फ्रान्स थकला आहे, अमेरिकन सैन्य अद्याप शिक्षणच घेत आहे, अशा वेळीं ब्रिटिश असहाय आहेत असें पाहून जोराचा तडाखा मारण्यास कंबर बांधली आहे. जर्मनीचें सैन्य आतां पश्चिम रणक्षेत्रावर दहा लाख उतरलें आहे. इंग्रजांचें सैन्य मूळचेंच कमी होतें, त्यांतून इटलीचे साह्यार्थ कांहीं पाठविण्यांत आलें. येवढा सगळा घोटाळा रशियामुळें उत्पन्न झाला आहे. अशावेळीं इंग्लंडला हिंदुस्थान किंवा अमेरिका यांच्यावांचून तरणोपाय नाहीं. अमेरिकन सैन्य तयार झालेलें नाहीं, आणि हिंदुस्थानच्या लोकांविषयीं सरकारानें जो विश्वास आरंभापासून बाळगावयास पाहिजे होता तो त्यांनीं बाळगला नाहीं. अजून सरकारचे डोळे उघडत नाहींत व हिंदुस्थानाला निःशस्त्र व हतवीर्य करणारा हत्यारांचा कायदा रद्द करण्याची बुद्धि त्यांना होत नाहीं हें पाहून हिंदुस्थानचें मन अतिशय तळमळतें आणि ब्रिटिश सार्वभौम सरकारास अशावेळीं मदत करण्यास धावून जाण्याची उत्कंठा त्याला निरुपायानें दाबून ठेवावी लागते ही केवढी शोचनीय गोष्ट ह्मटली पाहिजे!

## दिव्य रथ.

### ( स्वराज्याचा ओं )

स्वराज्य केव्हांहि मिळो आणि ब्रिटिश साम्राज्याचें स्वतंत्र अंग ह्मणून इंडिया केव्हांहि गणला जावो पण गेल्या सप्ताहांत कलकत्याला विचार सागराचे जें दैवी मंथन झालें आहे त्यावरून पाहतां इंडिया आपल्या मनोभूमींत स्वातंत्र्य व स्वराज्य एव्हांपासूनच उपभोगूं लागला आहे. इतके उत्कृष्ट राजकीय विचार इतक्या सुंदर व तेजस्वी शब्दांमध्यें क्वचितच ऐकण्यास मिळाले असतील. मनाचें सौंदर्य, भाषा सौंदर्य व आकांक्षा सौंदर्य या तिन्हींच्या लाटा कलकत्त्यास इतक्या उंच उसळल्या आहेत कीं सर्व हिंदी राष्ट्रच आपलीं राजकीय विचार रत्नें अंतःकरणाच्या गर्भांतून वर काढून श्रीमंत चक्रवर्ती बादशहास अर्पण करीत आहेत असा क्षणभर आल्हादमय भास होतो. श्रीमती बिझांट देवी यांचें अध्यक्ष या नात्यानें झालेलें संभाषण ह्मणजे आजपर्यंतच्या हिंदुस्थानच्या इतिहासाचें सर्वोत्कृष्ट सिंहावलोकन असून पुढील पिढ्यांना येथें भावी कार्यशक्तीचीं स्फूर्ती उत्पन्न होईल, संस्कृतीसाठीं तरुण पिढ्या सर्व प्रकारचा त्याग करून मोठ्या ईर्षेनें देशकार्यास तन तन मन धन अर्पण करूं लागतील आणि गेल्या राष्ट्रीय सभेंत हिंदुस्थानच्या ब्रिटिश साम्राज्याबरोबर ईशकृपेनें घडून आलेला हा लोकोत्तर संबंध महायुद्ध प्रशांत करून जगाला किती मंगलकारक व रामराज्य आणणारा असा होणारा आहे हें हृदयंगम रितीनें येथें ध्वनित झालेलें आहे.

### अपूर्व उत्साह

कलकत्यास यंदा जितके प्रतिनिधी एकत्र जमा झाले तितके गेल्या ३२ वर्षांत कधींच जमले नव्हते. पांच हजारावर प्रतिनिधी जमले आहेत. त्याची प्रांतवारी जवळ जवळ अशी होईल कीं १७०० बंगाल, मुंबई व सिंध ९३० संयुक्तप्रांत ६५० मद्रास १५०० बिहार ४२० मध्यप्रांत १९२ पंजाब ११४, बरमा ४२ व वऱ्हाड १५४, एवढा प्रतिनिधींचा समूह कोणत्या ही सुधारलेल्या राष्ट्रामध्यें क्वचितच पाहण्यास मिळेल. त्या शिवाय प्रेक्षकांची संख्या इतकी वाढत चालली कीं १० रुपयांचें तिकीट त्याच्या दुप्पट तिप्पट किंमतीला ही मिळनासें झालें. पहिले दिवशीं तर सुमारें १५ हजारांपासून १८ हजारापर्यंत एकंदर लोकसमूह कांग्रेसच्या मंडपांत जमला होता. त्या शिवाय हजारो लोक जागा नसल्यामुळें मैदानांत इतके जमले कीं तेथें ही कांग्रेसच्याच बरोबरीनें स्वराज्यावर राजश्री वाडिया, खपर्डे, श्रीमती सौ. सरोजिनी नायडू यांनीं आपापल्या व्याख्यानांनीं उतावीळ झालेला लोकसमूह थोडा बहुत शांत केला. हा उत्साह वीरश्री व कार्योत्सुक्य हीं इतकीं अवर्णनीय आहेत कीं तीं जर एका अंतःकरणाच्या प्रवाहानें लढाईकडे वळतील तर सर्व जगांतली अद्भुत अशी गोष्ट निदर्शनास येईल. ब्रिटिश साम्राज्य खरोखर पामर, कीं त्यांच्या मुत्सद्यांनीं या एवढ्या रत्नमय खजिन्याकडे डोळे बांधून आंधळी दृष्टी करून घेतली. कविश्रेष्ठ सर **रवींद्रनाथ टागोर** यांनीं जें प्रारंभीं ईशस्तवन केलें, त्यांमध्यें प्रस्तुतच्या इंडियन जागृतीला उद्देशून असा उद्गार काढला आहे कीं या इंडियाच्या स्वराज्याच्या समरभूमीवर भीतीला दूर फेकून द्या. जें मार्गें पडतील त्यांच्यासाठीं आपण थांबू नका आणि शंका व संशय यांनीं हीं अंतःकरणाचीं घड्याळें बंद पडूं देऊं नका. परमेश्वर कालनेमी आहे. त्याला जगाचा संसार आनंददायी करावयाचा आहे. येथें मृत्यु आणि जीवित हे सारखेच परमेश्वराचे श्वास असून ते या जीविताच्या सागरावर सारखे आंदोलन करीत आहेत. क्षुद्र मदतीकडे आपलें अंतःकरण वळूं देऊं नका आणि आपले शत्रु मित्र कोण याचाही विचार करूं नका. आमचा हा आत्मप्रत्यय आहे कीं—आणि हाच आमचा निर्वाणीचा सिद्धांत—कीं ईश्वर आह्मांला सन्मुख आहे आणि आह्मी सदैव त्याच्या छत्राखालीं आहों.

### महायुद्धाची समाप्ती

अध्यक्षांनीं आपल्या भविष्यांत असें वर्तविलें आहे कीं ज्या स्वातंत्र्यासाठीं आज एवढें अक्राळ विक्राळ महायुद्ध चालू आहे तें हिंदुस्थानाला पराजित स्थितींत असेच ठेवणाऱ्या ब्रिटिश साम्राज्याला कधींच मिटवितां येणार नाहीं. जर्मन रावणशाही पादाक्रांत करण्यासाठीं जो कोट्यवधि रुपयांचा फन्ना पडत आहे व सहस्रावधि लोक धारातीर्थीं जो प्राणत्याग करीत आहे तो सर्व निष्फळच राहील आणि ज्या दैवी योगानें ही जगाची घडामोड नवी जुनी होत चालली आहे तोच दैवी योग असें सांगत आहे कीं, स्वातंत्र्य व स्वराज्य यांची विजयध्वजा ब्रिटिश साम्राज्याच्या हातीं फडकूं लागण्यापूर्वीं मानव जातीचे ते जन्मसिद्ध हक्क हिंदुस्थानास अवश्यमेव द्यावे लागतील.

### विलक्षण लाट

राष्ट्रीय सभेबरोबर दुसऱ्या इतक्या परिषदा कलकत्यास एकसारख्या गेल्या सप्ताहांत भरल्या होत्या कीं तेथें गेलेला गृहस्थ क्षणभर घाबरून घोटाळून गेल्यावांचून राहणार नाहीं. थि ऑसाफिकल परिषद, औद्योगिक परिषद, सामाजिक परिषद् इ. इ. सभाच्या सभा जिकडे तिकडे भरलेल्या होत्या. अशा या विचारसमुद्रांत कांहीं काल पोहून निरनिराळी मंडळी पुढील वर्षासाठीं आपापल्या प्रांताची कार्यमाला निश्चित करून घेतील तेव्हां निःसंशय १९१८ साल राष्ट्राच्या कृतीमध्यें सर्वांगसुंदर होईल असा पूर्ण भरंवसा वाटतो.

## मध्यप्रांताचें कायदेकौन्सिल.

या कौन्सिलाची नुकती झालेली बैठक तीनच तासांची होती, पण तेवढ्यांत बऱ्याच महत्त्वाच्या प्रकरणांचा निकाल लागला, व एक विद्यार्थ्यांची बाब खेरीज करून एकंदरीनें सदर निकाल समाधानकारक होता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. विद्यार्थ्यांच्या बाबतींत सरकार हट्टास पेटलें आहे याबद्दल वाईट वाटतें. या प्रश्नाचा निकाल सरकारी व बिनसरकारी मेंबरांची एक कमिटी नेमून तिच्या मार्फतीनें करून घेण्यास विद्यार्थ्यांचे पालक तयार असतां सरकार त्या गोष्टीस कबूल नसावें, यावरून सरकारी अधिकाऱ्यांचा दुराग्रह आहे असाच समज कोणाचा ही होईल. विद्यार्थ्यांच्या शिस्तीबद्दल शिक्षणाधिकाऱ्यांनीं योग्य

खबरदारी घेणें अवश्य आहे; पण या खबरदारीची कांहीं तरी मर्यादा ठरली पाहिजे. सरकारी अधिकारी सगळे अधिकार आपल्या हातीं ठेवून पालकांवर फक्त मुलांच्या पोषणाची जबाबदारी टाकूं पाहील तर तो पालकांविषयीं धडधडीत अन्याय झाला पाहिजे. ना. मि. ठाकर यांच्या प्रश्नास ना. मि. मेहू यांनीं दिलेल्या उत्तरावरून मध्यप्रांताचे अधिकारी व पालक यांच्यामध्यें आपसांत हें प्रकरण मिटवण्याचा संभव दिसत नाहीं. तेव्हां आतां एकच उपाय राहिला. तो हा कीं हजारों पालकांच्या वतीनें निवडक गृहस्थांचें एक डेप्युटेशन व्हाइसराय साहेबांकडे जावें व हिंदुस्थान सरकारच्या मध्यस्थीनें शिस्तीच्या बाबतींत शिक्षणाधिकारी व पालक यांच्या अधिकारांच्या मर्यादा त्यानें ठरवून आणाव्या. हा अखेरचा उपाय सरकारी रीतीनें करण्यांत अनेक अडचणी आहेत. यासाठीं खाजगी रीतीनें व्हाइसराय साहेबांशीं चर्चा करून इष्ट कार्य सिद्ध करून घ्यावें अशी आमची सूचना आहे.

स्थानिक संस्थांच्या शिल्लकी रकमा ब्यांकेंत ठेवण्यास सरकारानें परवानगी द्यावी अशा मागणीला सरकारी मेंबराकडून असें उत्तर देण्यांत आलें कीं अशी परवानगी सरहा देतां येत नाहीं. शिल्लकी रकमाचे जो आंकडे गेल्या पांच सालाबद्दल देण्यांत आले त्यांवरून दरसाल २९ पासून ३० लक्ष रुपयांपर्यंत सगळीं डिस्ट्रिक्ट कौन्सिलें, लोकल बोर्डें व म्युनिसिपालिट्या मिळून शिल्लक राहते असें दिसतें. या स्थानिक संस्थांची संख्या लक्षांत घेतली तर ही शिल्लक फार आहे असें नाहीं, आणि ही शिल्लक टाकल्याबद्दल सरकारी अधिकाऱ्यांकडून सदर संस्थांवर उत्साहाचा व व्यवहार ज्ञानाचा अभाव यांचा जो आरोप करण्यांत आला आहे तो ही आमच्या मतें निष्कारण आहे. कर्झनशाहींत खुद्द हिंदुस्थान सरकारच्या तिजोरींत दरसाल शिल्लकी रकमांची रास पडत होती तेव्हां प० वा ना. गोखले यांनीं आपल्या बजेटावरील टीकात्मक भाषणांत जी चरचरीत टीका केली होती, तिचाच अहेर या वेळीं आमच्या सरकारी अधिकाऱ्यांनीं जनतेस परत केला असा या आरोपावरून लोकांचा समज होईल. पण हल्लींचा काळ व तो काळ यांच्यांतलें अंतर व स्थानिक संस्थांच्या वाढत्या जबाबदाऱ्या लक्षांत घेतल्या तर अशा शिल्लका सध्याचे काळीं टाकिल्याबद्दल वस्तुतः सरकारनें या संस्थांना शाबासकी दिली पाहिजे. अवश्य कामें योग्य रीतीनें करून या शिल्लका टाकिल्या असतील तर त्यांत कांहीं गैरवाजवी नाहीं. पण लोकांचे हाल कायम ठेवून हा संचय केला असेल तर योग्य कामांकडे त्या खर्च करण्यास लावणें हें सरकारचें कर्तव्य आहे पण सरकारची हरकत शिल्लक ठेवण्यास विशेषशीं दिसत नाहीं; तर ती गव्हर्नमेंट सिक्युरिटीजमध्यें न गुंतविता ब्यांकेंत ठेवण्याला मुख्यतः दिसते. ब्यांका सरक्षित नसतील तर सरकारची ही हरकत बरोबर आहे, पण मुंबई ब्यांकेसारख्या सुरक्षित बँकेंत रकम ठेवण्याला सरकारनें कां हरकत घ्यावी तें आम्हांस कळत नाहीं

लोकांना आरोग्याचें शिक्षण देण्याची सध्या अत्यंत अवश्यकता आहे आणि ही सरकारवरची जबाबदारी ओळखून म्याजिकल्यांटर्नच्या द्वारें व देशी भाषांत लिहिलेल्या हस्तपत्रकांच्या द्वारें या शिक्षणाचा प्रसार करण्याच्या तजविजींत सरकार आहे हें ऐकून लोकांस निःसंशय आनंद होईल. मुंबई इलाख्यांत ही व्यवस्था आज सात आठ वर्षांपासून चालत आली आहे. मध्यप्रांतांचें सरकार उशीरानें कां होईना पण जागें झालें आहे यांतच संतोष मानिला पाहिजे

मिसेस मोडकांचा हक्क मारून मिस पास्कल यांना उमरावतीच्या मुलींच्या हायस्कुलांतील फर्स्ट असिस्टंटची जागा देण्याचे बाबतींत नां. मि. गोळवलकरांनीं विचारलेल्या प्रश्नास ना. मि. मेहू यांनीं दिलेलें उत्तर कोणाच्याही समाधानकारक वाटणार नाहीं. मिसेस मोडक या हॉस्टेलमध्यें राहण्यास तयार नव्हत्या, तर तेवढें काम मिस पास्कल यांस देऊन त्याबद्दल त्यांना अलाउन्स देतां आला असता; पण तसें न करतां त्यांना मिसेस मोडक यांच्यावर नंबर देऊन फर्स्ट असिस्टंट करण्याची व्यवस्था केल्यानें सरकार देशी स्त्रियांची लायकी व हक्क यांकडे न पाहतां काळे इच्छ्या रंगाकडे पाहतें असा लोकांचा ग्रह होईल मिस पास्कल यांना शिक्षणाचे कामाचा फार मूल्यवान् अनुभव आहे असें सांगण्यांत आलें, पण हा अनुभव कोठला व कशा प्रकारचा आहे याचा खुलासा केला असता ह्मणजे शंकेला जागा राहिली नसती. ही गोष्ट येवढें गुलदस्तांत ठेवण्यांत काय प्रयोजन होतें तें आम्हांस कळत नाहीं.

# वऱ्हाडवृत्त.

**ग्राम पंचाईत:—** वऱ्हाडांत ही जुनी संस्था नव्या ब्रिटिश वेषानें सुरू करण्याकरितां सरकारी कमिशन लौकरच बसणार आहे, आणि त्या कमिशनावर राजश्री बापू साहेब जठार हे मुख्य आहेत. तेव्हां त्यांनीं आपल्या मसुद्यांतील ग्राम पंचायत विषरून खरी सत्ता लोकांच्या हातीं राहील असें धोरण ठेवावें अशी आह्मी मुद्दाम शिफारस करितो. ग्रामसंस्था ही स्वराज्याची पाहिली पायरीच होय.

रा. रा. काशिनाथ श्रीराम जठार हे येत्या १९ व्या तारखेपूर्वी आपल्या डेप्युटि कमिशनरचा चार्ज देऊन ग्रामपंचायतीच्या कामाला लागतील.

रा. रा. सयद महमद अब्दुल रहिमान सब डिव्हीजनल मॅजिस्ट्रेट आकोला हे तूर्ततूर्त आफि. डेप्युटि कमिशनर होणार आहेत, आणि त्यांच्या या अभ्युत्थान बद्दल आह्मी त्यांचें अभिनंदन करितों.

तारीख २२ डिसेंबर अखेर १।। लक्ष कपाशीची गाडी वऱ्हाडप्रांतीं बाजारांत आली. हाच आंकडा गुरस्साली २२९,००० जवळ होता.

श्रीमती सौभाग्यवती मोडक अमरावती मुलीचे हायस्कूलच्या शिक्षकीण यांनीं अखेर राजीनामा दिला आणि श्रीमती कुमारी पास्कलबाई यांना किंवा कुमारी थॉमसनबाई मुख्य अध्यापक यांना मराठी येत नसून ही त्यांचे घोडे चालते, आणि विद्याविभूषित स्त्रियां शिक्षकाच्याजागीं लाभत नाहींत यांतली खरी गोम काय?

**रिक्रूट—**मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून गेल्या जुलैपासून सप्टेंबर अखेर ७६८ लोक धाडण्यांत आले. त्यापैकीं बहुतेक वऱ्हाडचे असून लढवय्ये आहेत. योग्य परिस्थितीला रिक्रूटची अडचण पडणार नाहीं.

**अंधार—**उमरावतीच्या फिमेल नॉर्मल स्कूलमध्यें मराठींत अभ्यास चालतात. पण तेथें मराठीचें ज्ञान नसलेल्या सुपरिंटेंडेंट व फर्स्ट असिस्टंट बाई यांचें साम्राज्य चालतें!

**न्यक्कार—**अँग्लो इंडियनासाठीं जो तिसऱ्या वर्गाचा डबा राखून ठेवण्यांत येतो त्याच्यांतून हिंदी लोकांना जातां यावें ह्मणून स्थानिक कायदे कौन्सिलांत प्रश्न केला होता. तेव्हां स्थानिक सरकार ह्मणते कीं 'रेल्वेनें केलेल्या या उतारूंच्या सुखसोईसंबंधानें निर्णय देण्यास सरकार तयार नाहीं.' स्वराज्याशिवाय ही तयारी होणें शक्यच नाहीं.

मराठाशिक्षण परिषदेला सुरुवात **श्रीमान शाहू छत्रपती** यांच्या यशस्वी हातानें करण्यांत आली. पण कार्य बाहुल्यामुळें श्रीमंतांस दुसऱ्या दिवशींची बैठक दुसऱ्या अध्यक्षाच्या स्वाधीन करावी लागली. श्री शिवाजीचें स्मारक आणि मराठा हायस्कूल या दोन गोष्टी परिषदेनें मोठ्या नेटानें हातीं घेतल्या आहेत ही आनंदाची गोष्ट होय.

**दर्शनलाभः— लोकमान्य टिळक** यांस आकोल्यास येण्याविषयीं विज्ञप्ति करण्यांत आली आहे. लोकांचा मनोरथ पुढील महिन्यांत सफळ होऊन स्वराज्य-फंडाकडे तुळशीपत्र ह्मणून एक मोहरांची थैली मानपत्रासह अर्पण करण्याचा संकल्प आहे

मॉस्लेम लीगच्या परिषदेच्या प्रेसिडेंटच्या जागीं छिंदवाड्याचे राजकीय कैदी राजश्री महमदअली यांच्या मातुश्री श्रीमती आबदी बानो सहाबा बेगम या विराजमान होत्या. राजकीय कार्यापुढें सर्व बंधनें तुच्छ होऊन लोकांच्या इच्छा त्या स्त्रीदेहामध्यें मूर्तिमान झाल्या आहेत.

## जाहिर लीलाव

खामगांव येथील 'गणेशदास नरसिंगदास' नांवाच्या दुकानाचे मालक अमृतलाल वल्लभदास आणि ओंकारदास गणेशदास हे उभयतां नादार असून खालील वर्णनाच्या जिनगींतील त्यांच्या हक्क, मालकी व हितसंबंध हीं जळूलुप्यांत त्याच स्थळीं तारीख ९ जानेवारी १९१८ रोजीं दिवसा १ वाजतां जाहिर लीलावानें विकण्यांत येतील. ज्यांना खरेदी घ्यावयाची असेल त्यांनीं तेथें हजर असावें.

विशेष माहिती पाहिजे असल्यास खालीं सही करणाऱ्यांकडे मिळेल.

जिनगीचें वर्णनः—

१ खामगांव येथील जठाळ पुऱ्यांतील दुकान ६ लागून असलेल्या पैकी ५ कवेलूच्या एक टिनची मागील साहा कोठड्या सह जागी पु० फूट ९७ द० उ० ८० फूट वापर दक्षीण व ३० आहे चतुःसिमा पु० रस्ता पश्चीमेस गणेशदास द्वारकादास याचें दुकान द० कमेटीची जागा उ० सडक या सहा दुकानाची कोठड्यासह.

२ मुल्तानचंद गांधी याचे वाली जागा घर १ तीन मजली उ० दोन मजले द० वर कवेलू दर्शनी भाग पुर्वेस. पु० प० फूट ७१ द० उ० फूट ६१।। आंगणा सुद्धा. यांत एक झाड आहे. चतुःसिमा पु० रस्ता प० बकतावरमल जयनारायण याचें मकान द० गल्ली. उ० देवचंदलाला खत्री यांची जागा यांत हिस्सा ४२ ४८ पैचा एकत्र आहे.

३ इसबअली जाफरअली बोहरी याचें कंपौंडात असलेली वखड जागा पु० प० फुट १८८।। द० उ० फुट ६० यांची चतुःसिमा पु० इसबअली जाफरअली यांची जागा प० रस्ता द० इसबअली जाफरअली यांचा जीन उ० रस्ता यातील हिस्सा ९/१६

४ ढोबाड वेसी बाहेरील दुसरी वखार टिनची एक मजली लांब फूट ६६ रूंदी फुट ४५ वापर पु० प० चतुःसिमा पु० सडक प० गल्ली द० दुसरी वखार द० निंबाजी हवालदार यांची जागा या जागेंत ४१० ४८ पैचा हिस्सा

सही
M. M. Khan
Date 30-12-17 Pleader
आफिशिअल रिसिव्हर
आकोला

नो. नं. ५३०

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं आमचे कुलमुखत्यार रा. रा. रामराव गोपाळ देशपांडे रा० आकोला यास आह्मी कुलमुखत्यारी वरून कमी केलें आहे. ता. १-११-१९१९ रोजीचें मुखत्यारपत्र या जाहिर लेखानें रद्द असे. यापुढें जो कोणी त्यांच्या बरोबर आमच्या संबंधानें देवघेव किंवा अन्य व्यवहार करील तो स्वतःच्या व मुखत्याराच्या जबाबदारीवर करील त्याची जबाबदारी आह्मावर किंवा आमच्या जिनगीवर कोणत्याही प्रकारें चालणार नाहीं. ता. ३० डिसेंबर सन १९१७ इ.

सही
रामेश्वर सुरजमल द. खु.

नो. नं. ५३१

## नोटीस

रा. रा. रामराव गोपाळ देशपांडे रा. आकोला

यांसः—

या पूर्वी आह्मी तुह्मास तोंडी व या जाहीर लेखानें आमच्या कुलमुखत्यारीच्या कामावरून दूर केल्याचें कळविलेंच आहे. या पुढें तुमचा पगार बंद आहे. तुह्माजवळ असलेलें ता० १-११-१९१९ रोजीचें मुखत्यारपत्र रद्द असे. कळावें ता० ३० माहे डिसेंबर १९१७ इ०

सही
रामेश्वर सुरजमलजी द० खुद
नो० नं० ५३२

## जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

ता. १ जुलै पासून पुढें आणखी प्रसिद्ध होईपर्यंत व्याज दरसाल दर शेकडां ४ रुपये याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।१।०९ — Lyon Scott एजंट

नो नं १

---

४० रोगावर एकच जालीम औषध

## सुधासंजीवनी



यानें अजीर्ण, खोकला, दमा, संधीवात, प्रमेह, प्रदर, धुपणी, संग्रहणी, अतीसार वगैरेवर तात्काल गुण येतो.

याची एक बाटली जवळ ठेवणारास वैद्याची गरज राहणार नाहीं. एकदाच खातरी करा किंमत रु. १ टपाल खर्च निराळा. नमुना -॥- अनुपान पत्रकासोबत. गांवोगांव एजंट पाहिजेत. भरपूर कमीशन. आजच पत्र लिहा.

संजीवनी ऑफिस
खामगांव (वऱ्हाड)

---

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

---

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनखी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला नें. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H. L. Batliwala Sons & Co. Ltd.**

N. N. 6 Dadar Bombay

---

## कागदी बादाम

सर्वोतम ८१० गिरी जर्दालू ८९, जर्दालु ८४ कागदी अक्रोड ८३, गरी अक्रोट ८४, अंगुरी हिंग रु. २। आणे शाहजिरें १। रत्तल, सुखे कस्तुरी रु. ३९, सुर्मा मर्मीरा,३ पवित्र केशर १॥ आणि शुद्धशिलाजित ८९ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९

नो. नं. ७

---

## ५०० फोटो १ रु. त!

निरनिराळ्या साधु- संतांचे, नांव गांवासह व पाहतांच ओळख पटण्या इतके हुबेहुब ३०० फोटोंचे; सुंदर **दहा चित्रपट!** किं० रुपये २॥; १।; व ८१० आणि लोकोत्तर चमत्कार, जगातील आश्चर्यें, चौऱ्यांशीं आसनें, सुंदर-सुंदर स्त्रिया आणि मनोविकार व प्रेम इ. २०० फोटोंचे **सहा चित्रपट!** किं० रु० १॥; ८१२ व ८६ (सोळा चित्रपटांवर ९ हजार वर्षांचें **क्यालेंडर** बक्षीस!)

**श्री० व० नगरकर, दीकना**

नो० नं० ४७८

---

## रोल्डगोल्ड सोन्याचे

**कधींच काळे न पडणारे दागिने**

चंद्रहार किं. रु. ३-४; गोट जोडी २-२॥; पाटल्या जडी २-२॥; वजटीका ३-४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनें बांधलेली ४-५. शिंपाचें मोती लहान मोठें वाटेल तसें. सगळी २-३-४ अंगठी १; सले अट्पैलू जोडी १॥ बागड्या जोडी २-२॥. सरी ४

**केंस काळे करण्याचा साबण.**

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाक्सची किं. १॥ रु.

पत्ता- **मगनलाल के. आणि कंपनी**

गिरगांव- मुंबई

नो० नं० ९

---

# अमृतबहार.

**(२०० रोगांवर चालणारी एकच औषधी)**

ही हजारो लोकांनीं अनुभवलेली आहे. सदहू औषध घरांत असल्यास कोणत्या ही प्रकारें इतर औषधाची जरूर पडत नाहीं. खरूज, गजकर्ण, खोकला, ताप, महामारी, प्लेग, गरमी, परमा, डोकेंदुखणें, पोटदुखणें, दाढदुखणें, वगैरे वर मूल्य १ बाटलीस रुपये २ ट. ख. निराळा. जागोजागीं एजंट पाहिजेत.

पत्ता
भाई रामसिंग अँन्ड सन्स मॅनेजर
अमृत बहार कंपनी मुजाबाद
जिल्हा मुलतान (पंजाब)

नो. नं. ४८१

---

## लक्षांत ठेवा

कीं येथें आमचेकडे कमिशनचें (अडतीचें) काम चालत असून आह्मी येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान, दळण्याच्या गिरण्या **जीन व प्रेसचें सामान** वैगरे वगैरे सर्व प्रकारचा माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठवितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारे सर्व सामान मोटारचें व घोडे गाडीचें गाद्यांचें कापड, व दुसरे लागणारे सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरे विजेचे सामान, स्यांपस् वगैरे तेल पुरवितो. एकवेळ आरडर देऊन कामाचे चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स

पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट
मुंबई नंबर २

नो. नं. ३९८

---

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिवृद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलत गर्भसंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यात उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारावर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटां मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७२ गो० २ रु० १६९ गो० ४ रु० २७६ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तीडक, मुत्रांचा काला, संकोच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत त दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्ही० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, यथोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० स० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमा कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो० हर्णै, जिल्हा रत्नागिरी

नो० नं० २२


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.